म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ७०७८.

# बेकारी व समाजस्वास्थ्य.

REFBK-0005424

अनुवादक.
र. म. लकडे.

किंमत १२ आणे.

सं. नि.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५८३५
ठाणे

# बेकारी व समाजस्वास्थ्य.

[redacted]

REFBK-0005424

[redacted]

अनुवादक.

र. म. लकडे. बी. ए. एलएल. बी.

किंमत १२ आणे.

प्रकाशक,
र. म. लकडे,
सांगली.

सर्व हक्क लेखकांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक,
महादेव हरी कुलकर्णी,
महाराष्ट्र प्रिंटिंग वर्क्स,
सांगली.

# अनुक्रमणिका.


| विषय | पानें |
| --- | --- |
| १ स्वानुभव. | १ |
| २ विषमता. | २३ |
| ३ पैसा. | ४१ |
| ४ शासनसंस्था | ६१ |
| ५ मास्कोंतील एक दृश्य. | ७३ |
| ६ अपराधी कोण ? | ८० |
| ७ आत्मसमर्थन. | १०२ |
| ८ सुधारणेचा मनु. | ११६ |
| ९ श्रमविभाग. | १२१ |
| १० आतां काय केलें पाहिजे. | १३२ |
| ११ स्त्रियांचें कर्तव्य. | १४५ |

# — निवेदन —



टॉलस्टॉयच्या चरित्राचे प्रकाशन मी पुर्वी केलेलेच आहे. हा अनुवाद मी चार वर्षांपूर्वी लिहिला व त्यांतील कांहीं भाग पूर्वी प्रसिद्धही केला आहे. परन्तु पुस्तक रूपानें तो सर्व वांचकांपुढें ठेवण्याची संधि मला आज मिळत आहे What then shall we do हे टॉलस्टॉयचे पुस्तक ज्यावेळीं माझे वाचनांत आल त्याच वेळीं हें विचार मराठी वाचकांपुढें आल्यास त्याचा बराच फायदा होईल असे मला वाटले व हे काम मी हातीं घेतलें वाङ्मयोत्कर्षाच्या दृष्टींनें मराठींत इतर भाषेंतील नामांकित ग्रंथाचे भाषांतर होणे जरूर आहे ह्मणून, डेक्कन व्ह. ट्रा. सोसायटी पुणें, यानीं केसरीत जाहिरात देऊन, या पुस्तकाचा शब्दशः अनुवादही मागितला, यावरून या पुस्तकाचें महत्व किती आहे हे वाचकांस कळून येईलच.

आज समाजांत जी बेकारीं वाढत आहे त्यांस मुख्यतः कारण ह्मणजे संपत्तीचें योग्य प्रमाणांत विभक्तिकरण होत नाहीं हेंच होय. भांडवलशाहीच्या आहारीं आज मजूर व शेतकरीवर्ग गेला आहे. श्रीमान लोक आपल्या अगणित संपत्तीच्या जोरावर आपल्या चैनी चालूं शकतात. परन्तु ही गोष्ट आजच्या परिस्थितींत फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं

श्रीमंत गरीब हा भेदाभेद न राहतां प्रत्येकानें स्वतःच्या श्रमानें आपले अन्न आणि मिळविले पाहिजे. ऐदखाऊपणा ही शरमेची गोष्ट आहे हे संपन्न लोकांना पटले पाहिजे, व त्यांनीं आपली संपत्ती न सांठवतां गरीबांच्या कारणी लावली पाहिजे; तरच ही नांदत असलेली विषमता नाहीशीं होईल. जर आहे हीच स्थिती चालूं राहील तर बेकारीचे भूत समाजास स्वस्थ बसूं देणार नाहीं.

या पुस्तकांत आलेले विवेचन फारच मोलाचे आहे त्यांतील सर्वच विचार वाचकांस पटतील असें नाहीं, तथापि चालू परिस्थितीत मात्र हे विचार मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहींत, असें वाटतें.

या मूळ पुस्तकाचीं एकंदर चाळीस प्रकरणें आहेत. अर्थात सारांश रूपानेच त्यांतील महत्वाचे विचार या लहान पुस्तकांत ग्रथित केलेले आहेत.

या पुस्तकाचें कामीं ज्यानीं ज्यानीं मला साह्य केले आहे त्या सर्वांचा मी अभारी आहे. विशेषतः श्री. **शंकरराव जावडेकर** संपादक **लोकशक्ति** यानीं माझें विनंतीस मान देऊन या पुस्तकांस प्रस्तावना दिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. त्याचप्रमाणें महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. **माधवराव कुलकर्णी** यानीं शक्य ते श्रम घेऊन मुद्रणाचें काम पार पाडले, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझ्या या अनुवादात पुष्कळ उणीवा वाचकांस भासतील परन्तु वाचक उदार असल्यानें ते मला माफ करतील अशी आशा आहे. परमेश्वरचरणीं ही अल्पसेवा सादर करून मी आपलेपुढें हे पुस्तक ठेवित आहे.

आपला,

ता. २०।४।३६. र. म. लकडे.

# प्रस्तावना.

प्रस्तावना लेखकाचें कार्य ग्रंथावर अभिप्राय देणें हें नसून त्याचा परिचय करून देणें हे आहे सदर पुस्तक हें टॉलस्टॉयच्या "तर मग आह्मी काय करावें?" (What then shall we do?) या पुस्तकाच्या आधारें लिहिलें आहे तो त्या ग्रंथाचा गोषवाराच आहे. मूळ ग्रंथ हा टॉलस्टॉयच्या तत्वज्ञानाचा एक प्रातिनिधिक ग्रंथ असा समजला जातो. त्यांत आधुनिक भांडवलशाही समाजावर आणि अधिभौतिक संस्कृतीवर मूलग्राही टीका केलेली आहे. आधुनिक भौतिक विद्या, सामाज शास्त्रें आणि नानाविध कला या समाजाच्या हिताला पोषक न होता केवळ उच्चवर्गाच्या विलासना व नैतिक अधःपाताला कारण होत असून त्यांच्या वृद्धीबरोबर मानव संस्कृतीतील अन्याय, विषमता व जुलूम यांचीही वाढ होत आहे. शास्त्रें व कला या समाजहितासाठीं असून हें समाजहित ह्मणजे एका विषिष्ट वर्गाचें हित नसून समाजातील सर्व लोकांचे हित हें आहे. आजच्या समाजांत अनेकांना मुळींच कष्ट न करतां वाटेल तितकी सत्ता व संपत्ती उपभोगता येते. तसेच अनेक बुद्धिजीवीवर्गांना बिनकष्टाचे थोडे श्रम करून चैनींत राहतां येते. या सर्वव्यवहाराचें समर्थन श्रमविभागाच्या व अर्थशास्त्रांतील इतर सिद्धांताच्या आधरें केलें जातें

पण हा सर्व भ्रामक युक्तिवाद असून असलें अर्थशास्त्रही समाजाला हानिकारक आहे असा टॉलस्टॉयचा सिद्धांत आहे.

टॉलस्टॉयनें सध्याच्या सामाजिक अन्यायावर केलेली टीका व त्यांचें केलेलें आविष्करण मान्य करूनही त्यांचा प्रतिकार करण्याचा त्याचा मार्ग आणि भावी समाजरचनेसंबंधीं त्याचे विचार हे आज वादग्रस्त विषय होऊन बसले आहेत. सधन वर्गांतील व्यक्तींनीं अनुतापानें दग्ध होऊन आपली सर्व संपत्ती समाजाच्या हवाली करावी आणि स्वत: शेतकऱ्याप्रमाणें शरीरकष्ट करून जगूं लागावें हा त्याचा हे अन्याय निवारण्याचा मार्ग आहे. सर्व सधन लोक असें करणार नाहींत हें तितकेंच खरें आहे, यासाठीं दारिद्र्यांत व दास्यांत रखडणाऱ्या लोकांनीं सध्याचे अन्याय्य समाजयंत्र आम्ही चालूं देणार नाहीं, असें सांगितलें पाहिजे व तसें वर्तन केलें पाहिजे. म. गांधी हे टॉलस्टॉयचे अनुयायी असले तरी ते या दुसऱ्या उपायाचा उपयोग करण्याचें एक सामुदायिक सत्याग्रहाच्या रूपानें शास्त्र बनवीत आहेत. समाजयंत्र व त्यांतील सत्ताधारी राज्ययंत्र यांना लोकांतील न्यायबुद्धीचा आधार घ्यावा लागतो, पण पुष्कळ वेळां चालू सामाजिक व राजकीय व्यवहार हे अन्यायी असले तरी लोकांना ते न्यायाचेच वाटत असतात. कारण लोकांची न्यायबुद्धि स्वार्थ, भीति, आणि आलस्य यांनीं विकृत बनलेली असते. जनतेच्या न्यायबुद्धीवरील हें तमोगुणांचे आवरण नाहीसें झालें, न्यायबुद्धि प्रज्वलित झाली आणि ती संघटित होऊन तिनें अन्यायी समाजयंत्राशीं अनत्याचारी असहकार केला कीं, कोणतेंही अन्यायी समाजयंत्र चालू शकणार नाहीं व त्यांत अनत्याचारी

मार्गानें सुधारणा होत जातील. लोकांतील न्यायबुद्धिरूप हें आत्मबल संघटित व प्रभावी करण्यास पूर्वीच्या ऋषि किंवा श्रमणवर्गासारखा समाजांतील सत्ता व संपत्ति यांपासून अलिप्त राहाणारा अपरिग्रही, सत्याग्रही व अहिंसावादी आश्रमवासीवर्ग समाजांत असला पाहिजे; पण या वर्गानें केवळ आश्रमांत राहून आपल्या उदाहरणानें सर्व लोक शहाणे होऊन सुधारतील असें न मानतां समाजांतील दरिद्री व पीडित जनतेला संघटित प्रतिकाराचें शास्त्र शिकविलें पाहिजे. या शास्त्रांत म. गांधींनीं टॉलस्टॉयच्या पुढें बरीच प्रगति केली आहे.

ही प्रगती लक्षांत घेऊनही असें ह्मणतां येईलकीं हल्लींच्या विषम आणि अन्यायी समाजांतील वरीष्ट वर्गानें पीडित व दरिद्री जनतेशीं समरस न होता तिच्या उद्धाराला आड येण्याचाच प्रयत्न चालविला तर समाजांत अत्याचारी क्रांति होणेंहा अशक्य नाहीं. कारण सध्याच्या आर्थिक व बौद्धिक विषमतेला आज कोणतेंही समर्थन नाहीं अशा असमर्थनीय अन्यायांतून जनता आपली सुटका करून घेतल्या-खेरीज राहणार नाहीं. टॉलस्टायनेंही हें लिहिलें आहे, म. गांधीही आज तेंच सांगत आहेत. तथापि आह्मी औद्योगिक सुधारणेच्या नांवानें भांडवलशाही घरांत घेत आहों व साम्राज्यशाहीच्या अन्यायाशी स्वार्थानें, भीतीनें अथवा अज्ञानानें सहकार्य करीत आहे. या आमच्या कृतींतच सर्व बेकारीचें, दारिद्र्याचे व सामाजिक अस्वास्थ्याचें बीज आहे. आह्मांला जर बेकारीचें निवारण करावयाचें असेल व समाजस्वास्थ्य हवें असेल तर समाजांत आमूलाग्र परिवर्तन केलें पाहिजे, निदान तसें करणारांना अडथळा न करतां साहाय्यच केलें पाहिजे येवढा

जरी या पुस्तकाच्या वाचनानें लोकांनी बोध घेतला आणि सधन व मध्यम वर्गांतील कांहीं व्यक्ती जरी या सामाजिक मूलग्राही परिवर्तनांत पुढाकार घेण्यास पुढें सरसावल्या तरी टॉलस्टॉय किंवा म. गांधी यांच्या उपदेशाचें बरेंच कार्य झालें म्हणतां असें येईल.

टॉलस्टॉय किंवा गांधीजी हे कांहीं लोक मानतात त्याप्रमाणें शास्त्रें किंवा कला यांचे विरोधक नसून शास्त्रासाठीं शास्त्र किंवा कले-साठीं कला या मतांचे ते विरोधक आहेत. शास्त्र व कला यांच्यामुळें सामाजिक स्वास्थ्य व उन्नती यांचा लाभ झाला पाहिजे तरच तें शास्त्र किंवा ती कला, असें त्यांचें मत आहे. हाच न्याय यंत्रकलेसही लागू आहे. या सर्व विषयांचें विवेचन या पुस्तकांत आलेलें असल्यानें तें मार्गदर्शक होईल.

**शां. द. जावडेकर;**
संपादक, ‘ **लोकशक्ति** ’

# बेकारी व समाजस्वास्थ्य.

## 'स्वानुभव'

माझें आयुष्य बरेंचसें खेडेगांवीं गेलें. मी सन १८८१ सालीं मास्कोस रहाणें करितां आलों. मला शहरा संबंधीं कल्पना नव्हती. तथील दारिद्र्य पाहून मी चकीत झालों. खेडेगांवातील गरिबी मी जाणत होतों. शहरांतील मला नवीन होती, व विचार करूनही त्याची मला बरोबर कल्पना येईना. या शहरांतील कोणत्याही रस्त्यानें फिरावयास गेले तर भिक्षेकरी तुम्हांस भेटतील पण खेड्यांतील भिक्षेकरी व शहरांतील भिक्षेकरी यांमध्यें मला फार फरक घाटला. उजळ माथ्यानें परमेश्वराचें नांव घेऊन भिक्षा मागणारा अगर काखेंत झोळी घालून, कोणीच तुम्हांस दिसणार नाहीं. ज्या वेळीं तुमच्याजवळ भिक्षेकरी येतात त्यावेळीं तुमचें ओझरतें अवलोकन करितात, व जर त्यांच्या मनाची खात्री झाली तरच ते तुमच्यापुढें येऊन भिक्षा मागतील. जर त्यांना तुमच्यासंबंधीं शंका आली तर तुम्हांस पैसेही न मागतां ते तुम्हांस चुकवून पुढें जातील. याचा अर्थ प्रथम मला कळेना. उघडपणें भिक्षा मागण्यांत काय न्यूनता आहे, याची कल्पना मला आली नाहीं.

एकदां असाच शहराच्या एका भागांतून हिंडतांना मला एक पोलीस भेटला. तो एका भिकार इसमास गाडींत ढकलीत होता. त्याच्या

सर्वांगास उदरामुळें सूज आलेली दिसत होती. त्याला कां नेतां असें पोलिसास विचारतां 'भिक्षा मागतो म्हणून नेतों.' असें त्यानें उत्तर दिलें. 'त्यास भिक्षा मागण्यास प्रतिबंध आहे काय' असें विचारतां 'होय असें दिसतें' असें त्या पोलीसानें मला उत्तर दिलें.

मी त्यांच्या मागोमाग जाऊं लागलों, मला भिक्षेस खरोखरीं बंदी आहे काय व ती तशी कां असावी याची चौकशी करावयाची होती गरजू माणसानें आपल्या शेजाऱ्यास मदत कां मागूं नये याचा अर्थच मला समजेना भिक्षेस बंदी असेल या गोष्टीवर विश्वास बसेना, कारण मास्को शहरांत जिकडे तिकडे भिक्षेकरीच दिसत होते. शेवटीं आम्ही पोलीस कचेरींत गेलों. तेथें एक अधिकारी हातांत तलवार व पिस्तूल घेऊन बसलेला दिसला. त्याला मी या भिक्षेकऱ्यास कां अटक केलीत असें विचारतांच "आपणांस याची चौकशी कशाला" असें त्यानें उत्तर दिलें; परंतु काय वाटलें कोणास ठाऊक त्यानेंच मागाहून वरिष्ठ अधिकारी अशा लोकांना अटकेंत ठेवण्यास सांगतात सबब याला पकडलें असें सांगितलें. मी बाहेर आलों व ज्यानें त्यांस धरून आणलें त्यास "परमेश्वराचे नांवावर भिक्षा मागण्यास बंदी आहे काय?" असा प्रश्न करतांच त्यानें कपाळास आठ्या चढवून "अधिकारी हुकूम सोडतात त्यावरून तसें असावें" असें मोघमच उत्तर दिलें, व तो पोलीस पुन्हां आपल्या उद्योगास लागला.

बाहेर गाडीवान उभा होता. मला पाहतांच "काय झालें" असा प्रश्न साहजिकच त्यानें केला; त्यालाही त्यांत उत्सुकता होती. "भीक त्याच्या पकडलें' असें मी सांगितलें. त्यानें ना पसंती द...

विषी " अनाथ, हीं परमेश्वराचीं लेकरें त्यांना भिक्षेस बंदी कां " असें मी म्हणालों " असा अलीकडे कायदा झाला आहे. " त्यानें उत्तर दिलें.

हा भिक्षेकऱ्यास बंदीचा प्रकार पुढें बराच वेळ पाहिला. शिपायांच्या पाहाऱ्यांत भिक्षेकऱ्यांच्या टोळया पुढें अटक करून नेतांना दिसत. व हा सर्व प्रकार कशाकरतां तर भिक्षेकरतां ! अर्थातच असें ठरलें कीं, या शहरीं भिक्षा मागणें हा गुन्हा आहे

कांहींनाच कां अटक होते व बाकीचे मोकळे कां हा प्रश्न मला सुटेना. कांहीं कायदेशीर व कांहीं बेकायदेशीर तरी असले पाहिजेत अगर भिकारीच इतके असले पाहिजेत कीं, त्यांना सर्वांना अटक करणें अशक्य झालें आहे याशिवाय त्याला दुसरें उत्तर नाहीं. किंवा पकडल्याबरोबर ते नवें निर्माण होत असले पाहिजेत. सर्व प्रकारचे भिक्षेकरी येथें पाहण्यास मिळतात. कित्येक आपला चरितार्थ त्याजवर धंदा या दृष्टीनें चालवितात. तर कित्येक शहरांत उद्योगाकरतां येऊन खरोखरच उपाशी मरणारे आहेत. दुसऱ्या प्रकारांत खरोखरी निरपराधी शेतकरी व त्यांच्या बायका दृष्टीस पडतात. मी कित्येकांच्या भेटी घेतल्या. कित्येक अजारी पडून श्रम करण्यास असमर्थ स्थितींत दिसले. कांहीं दारूच्या नादीं लागून हीन दशेस आलेले तर कांहीं गलेलठ्ठ व ऐतखाऊ, कांहीं दैवीआपत्तींत सांपडून दीन झालेले तर कांहीं पोराबाळांच्या जोजाराामुळें क्षीण झालेले, असे अनेक प्रकार मला पहावयास मिळाले.

मला या धडधाकट भिक्षेकऱ्याबद्दल अचंबा वाटला. त्यांचेच सारखे [illegible] दोन सोबती रोजीं १०।११ आणे मिळवत

असलेले मी पहात असतां, यांनीं भिक्षा कां मागावी हेंच मला कळेना ! यांनीं भिक्षा कां मागावी व त्यांनीं श्रम कां करावें याचें कोडें उलगडेना.

अशाप्रकारचे भिक्षेकरी भेटतांना साहाजिकच मी त्यांना त्यांची हकीगत विचारली. एकदां एक मध्यम वयाचा व सुदृढ सशक्त भिकारी मला दिसला. त्यास कोठून व कां आलास असें विचारलें. त्यानेंही सर्व हकीगत प्रांजलपणें सांगितली. आपण पोटाकरतां येथें आलों. प्रथम पोट भरण्यापुरतें पुरेसें काम आपणास मिळे. पण मागाहून काम धंदा लागेना. होते तें गांठीचें संपलें व आतां उदरनिर्वाहास दुसरें साधन नसल्यानें आपणांस हा उद्योग नाइलाजानें करावा लागतो अशी त्यानें माझी समजूत घातली. मलाही त्याचेबद्दल कळवळा आला, व मी तुला उद्योग देतो व हें खर्चास पैसे घे व उद्यां माझ्या सोबत्याकडे कामास जा असें सांगून त्यास पैसे देऊन वाटेस लावला. जातांना " मी खास कामास येतों. आपण मुळींच शंका घेऊं नका. कोणास भिक्षेंत समाधान वाटेल !' असें सांगून तो कृतार्थ अंतःकरणानें गेला. मला त्याच्या बोलण्यावरून व कळकळीवरून तो खास येईल असें वाटलेंही.

दुसरें दिवशीं मी आपल्या सोबत्यास तो भिक्षेकरी आला होता काय ? असा प्रश्न केला. पण त्यांचा नकार ऐकतांच मला आश्चर्य वाटलें. असा प्रकार मला किती तरी वेळा आढळला. कित्येकांनीं गांवीं जाण्यास पुरेसे पैसे नाहींत, असें कनवाळूपणानें पैसे मागितले. मी दिले. पण तेच लोक गांवांतून उजळ माथ्यानें हिंडतांना पाहून मला काय वाटलें असेल ! कित्येक वेळां त्यांच्या मी माहितीचा नसल्यानें त्यांनीं

सं. ता.

पुनः पुनः ह्याच प्रकार मजजवळ व्यक्त केला. कित्येक मला पाहून तोंड चुकवीत. ह्या सर्व प्रकारांवरून भिक्षेकऱ्यांतही लुच्चे लोक आहेत अशी माझी खात्री झाली. त्यांच्याबद्दल मला खरोखरीच अत्यंत वाईट वाटलें; कारण दारिद्र्यानें गांजलेलें, अर्धनग्न, अर्धपोटी, केवळ हाडाचीं काडें उरलेले व रोगी, ज्यांच्यापैकीं रोज थंडीनें गोठून मरतात, व जे गळफांस लावून आत्महत्त्या करून घेतात, अशा लोकांचा भरणा यांत होता.

या संबंधीं मी ज्या वेळीं तेथील रहिवाशांना हकीगत विचारली त्यावेळीं मी पाहिला हा प्रकार कांहींच नव्हे असें समजलें. शहरांतील ठिकाणीं जाऊन पाहिल्यास त्यांची 'सोनेरी ग्यांग' (खरी स्थिती पाहण्यास मिळेल व संख्या कळेल) असें सांगण्यांत आलें. थट्टा करीत एक म्हणाला कीं, "हीं सोनेरी टोळी नसून त्यांची संख्या एका पलटणीच्या भरतीची झाली आहे." खरोखरीच ही स्थिती प्रत्यक्ष पाहतां, त्यांची संख्या पन्नास हजारांवर गेलेली दिसली. म्हातारीं माणसें, तेथील रहिवाशी याचा उल्लेख गंमत म्हणून करतांना आढळत, तर कित्येक अभिमानानें आपली माहिती म्हणून त्याचा उल्लेख करीत. लंडनमध्यें असतांनाही ह्याच प्रकार मला दिसला. या दारिद्र्याबद्दल प्रत्यक्ष माहिती मला पाहिजे होती. कित्येक वेळां या बेकारांच्या ठिकाणीं जावेसें वाटें; पण माझें मन कच खाई. मनासही दिलगिरी वाटें. लोकांचे हाल, मूर्तिमंत दारिद्र्य पाहणें कोणास आनंददायक वाटेल ? पण पुनः असें वाटें, जर मी शहरांतील चैनीच्या व शोकाच्या गोष्टी पाहतों. तर ही गोष्ट तरी पाहण्यास मला काय हरकत आहे. या द्वंद्वांत शेवटीं मी एक दिवस

जाण्याचें ठरविलें. रस्त्यानें जातांना लोकांचे जमाव, चमत्कारिक कपडे घातलेले, व पायांत त्याहूनही विपरीत जोडे वापरलेलें असें दिसूं लागलें. अंगकांति रोगी व प्रत्येकजण बेफिकिरी वृत्तींत दिसून येत होता. सर्वजण एकाच दिशेनें चाललेले दिसत होते. मला मार्ग माहीत नसल्यानें मी त्यांचे पाठोपाठ चाललों होतों. शेवटीं एकदां प्रत्यक्ष बेकारांच्या जागीं आलों. येथें स्त्रियांही पुरुषांप्रमाणेंच, लक्तरें अंगावर घेतलेल्या, निरनिराळ्या रंगाचें झगे व टोप्या घातलेल्या व आपल्या करुणजनक व मनास तिटकारा वाटणाऱ्या स्थितीबद्दल बेफिकीर अशा दिसल्या. लहानथोर सर्व इकडे तिकडे हिंडत असलेलें, एकमेकांस आणा-शपथा घालीत असलेलें व तंटा करीत बसलेलें दिसत होतें. प्रत्यक्ष बाजारांत व्यापारी असें कोणी फारसें दिसत नव्हतें. बाजार ओलांडून पुढें तसाच रस्त्यानें मी चाललों. दोन बायका, एक तरुण व एक म्हातारी, फाटके व मळके कपडे घातलेल्या कांहीं गोष्टी बोलत चालत असलेल्या आढळल्या. त्यांच्या भाषणांत प्रत्येक शब्दागणिक एक शिवी व अपशब्द उच्चारला जात होता.

प्रथम त्या दारू प्यालेल्या आहेत कीं काय असें वाटलें, पण तसा प्रकार मुळींच नव्हता. रस्त्यानें जाणारें येणारें व पुढें मागें चालणारें लोकही त्याकडे लक्ष देत नव्हतें. मला मात्र हा प्रकार पाहून चमत्कारिक वाटलें ! लोकांचे वागणुकीवरून हें नित्याचें आहे असें दिसत होतें. बाजारांतील डावे जागेंत कांहीं खाजगीं बेकार गृहें होतीं. तेथ कांहीं लोक भिक्षा घेत व पुढें चालूं लागत. पुढें चढाव चढलेवर, कोपऱ्यावरच एक मोठें घर लागलें. तेथें

बराच मोठा जमाव जमलेला दिसला. फरसबंदीवर व भररस्त्यांत बर्फांत लोक बसलेलें दिसत होतें. या गृहाचें नांव लीयाविन गृह व येथें रात्रींचा आश्रय लोकांना मोफत मिळे. सायंकाळीं पांच वाजण्याचें सुमारास दरवाजे उघडले व लोकांना आंत घेणेंत आलें. मी शेवटीं उभा होतों. माझें जवळचें लोक मजकडे टकमक पाहूं लागले. सर्वांच्या दृष्टीनें एकच कुतुहल दिसत होतें व तें ह्मणजे मी दुसऱ्या निराळ्या परिस्थितींतला मी येथें कां? असाच प्रश्न साऱ्यांचा दिसत होता. स्वतःसिद्ध, सधन मनुष्य, आमचें हाल व दारिद्र्य पहाणेस व आमच्या दुःखाची मजा करणेस आलेला कीं, जी गोष्ट शक्य नाहीं ती ह्मणजे आमची कींव करणेस आलेला आहेस? असेंच मला त्यांची दृष्टि विचारीत होती! त्यांची माझी दृष्टादृष्ट होई, पण बोलण्याचा धीर होईना. बरेच वेळानें आम्हांस एकमेकांबद्दल आपलेपणा व विश्वास उत्पन्न झाला व बोलणें म्हणजे माणसकी सोडणें असें मनांत वाटूं लागलें व शेवटीं जवळ उभा असलेल्यास त्यांची हकीकत विचारली. त्यानें आपलें नांवगांव सांगितलें व आपण उद्योग मिळेल या आशेनें येथें आलों, परंतु धंदा नाहीं. गेले दोन दिवस मी उपाशीं आहे असें त्यानें मला सांगितलें. बोलतांना भीति व लाज यांच्या छटा त्याचें चेहऱ्यावर दिसत होत्या. त्याचा चेहरा सुजलेला होता. पायांत चिंध्या झालेलें फाटकें बूट होतें. जवळच दारूची विक्री करणारा उभा होता, त्यास मी ती देण्यास सांगितलें. त्यानें ग्लासांत ओततांच क्षणही न जाऊं देतां दोन्ही हातांनीं तो कांचेचा पेला घट्ट धरिला, त्याच्या उष्णतेनें त्यानें आपलें हात शेकले व सर्व दारू गट्ट केली. हें करीत असतांना तो आपली हकीगत मला सांगीत होता. आपणांस

प्रथम काम मिळालें, पुढें मिळेना. पुढें त्याचें पैसे पासपोर्ट वगैरे या घरांत चोरीस गेलें व आतां त्यास शहर सोडून जाणें अशक्य होऊन बसलें. दिवसा दारूच्या दुकानांतून व मिळेल तेथून मागून आपली उपजीविका चालवितो व रात्रीं येथें विश्रांतीस येतो व फुकट व्यवस्था केली जाते. तो आतां फक्त पोलीस तपासाची वाट पहात होता. कारण पासपोर्ट नाहीं. असें समजल्याबरोबर त्यास तुरुंगांत जावयास मिळालें असतें व त्याला शिक्षा म्हणून पायीं त्याच्या देशास पोंचतें केलें असतें. तुरुंग व पोलीस ताबा हीं त्याला स्वर्गाप्रमाणें प्रिय वाटत होतीं. ही आमची भाषा चालली होती, तोंपर्यंत दुसरा इसम तेथें आला. त्याच्या पाठोपाठ तिसरा असें तेथें लोक जमले व त्यांनीं याच गोष्टींची पुनरावृत्ति केली. किडकिडीत, नाक वर निघालेला, चेहरा फिका व वस्त्रहीन असा तेथें आला. त्याचें अंग थंडीनें कापत होतें. त्याची इच्छा मी त्याच्याकडे पहावें व त्यांस अनुकूलता दाखवावी. त्यालाही मी खावयास दिलें, व तो पिण्याकरितां दारूचा प्याला तोंडास लावतोय तोंच दुसरा एक दांडगा, लांब नाकाचा, बोडका व मळके कपडे घातलेला तेथें आला. त्यानें त्या मुलास ढकलून बाजूस सारलें व कांहीं पोटास मागूं लागला असें होतां होतां, माझें सभोंवतीं बरीच गर्दी जमली. जिकडे तिकडे अव्यवस्था व खेचलेची सुरू झाली. ओरडून त्यांना बाजूस होणेंबद्दल दरडावीत बिचारे त्याचा हुकूम पाळण्यकरितां बाजूस होत. त्यांतील व्यवस्था करणाऱ्या लोकांनीं मला आपले रक्षणांत घेतलें. पण जमाव माझें भोंवतीं जमा होऊं लागला व मला पोटास देण्याबद्दल याचना करून विनवूं लागला. पूर्वीपेक्षाही त्यांचे चेहरे अधिक दीन, केविलवाणे व लीन

दिसत होतें. मी मजजवळचे सर्व द्रव्य दिलें. अर्थातच तें पुरें पडलें नाहीं. त्या जमावाबरोबर मी वसतिगृहांत गेलों. फारच भव्य प्रमाणांत तें बांधलेलें होतें. त्याचे चार भाग करून, वरील मजल्यावर पुरुषांची व खालील मजल्यावर बायकांची व्यवस्था केली होती. रेल्वेंतील तिसऱ्या वर्गाच्या उतारुंची जी सोय असते, तोच नमुना येथेंही होता. जिकडे तिकडे दीन तोंडें, कपड्यांचीं लक्तरें, फिके व निस्तेज चेहरे, पसरलले दिसत होते. त्यांतच मी ज्यास मदत केली होती तो इसम दिसला. त्याला पाहून माझे अंगावर शहारे आले. मी अपराधी आहे असें मला वाटून मी झटदिशी बाहेर पडलों व थेट माझ्या बिऱ्हाडीं आलों. चटई अंथरलेले जिने चढून सुंदर सजविलेल्या माझ्या जागेंत मी आलों पंचपक्वान्नाचें जेवण दोघां बावर्चीच्या देखरेखीखालीं केलें.

मला तीस वर्षांपूर्वीच्या प्रसंगाची आठवण झाली. पॅरीस शहरांत फांशीची शिक्षा देतांना मी पाहिली होती. शिक्षा झालेला इसम मोठा गुन्हेगार होता, हें मला माहीत होतें. तशी शिक्षा मुद्दाम जाणून बुजून देणेंत आली होती व त्या शिक्षेचें समर्थनही मी ऐकलें होतें. पण धडापासून ज्या वेळीं डोकें वेगळें झालें, त्या वेळीं मला भोंवळ आली; माझ्या नसांनसांतून त्या कृत्याच्या वाईटपणाच्या निषेधाचा ध्वनि उमटूं लागला व खून कितीही भयंकर असला तरी खून तो खूनच राहणार. मात्र या खुनास खून करणेचे नीच कृत्यांस आम्ही स्वस्थ बसून पाहून हातभार लावला याबद्दल मात्र जीवास तळमळ लागली. त्यांतलाच प्रकार मला आज आठवला. हजारों लोक उपाशीं मरत असतां, हजारों लोक अर्धनग्न स्थितींत बेकार होऊन भटकत असतां व हजारों लोक अन्नान्न म्हणून प्राण

सोडीत असतां आम्ही दररोज पंचपक्कानाचें जेवण ओकारी येईपर्यंत जेवावें, आणि लोंकरी व रेशमी कपड्यालत्त्याचा ऐषआराम करावा. आम्ही आपल्या ज्ञातिबांधवाबद्दल यत्किंचितही गैरसोय सोसूं नये, हा खरोखरीच गुन्हा आहे असें मला वाटूं लागलें. हा गुन्हा सतत अव्याहत चालूं आहे. माझ्या मतें दोन्हींत फरक एवढाच कीं, फांशीचें वेळीं मी ओरडून सांगूं शकलों असतों कीं, हें अत्यंत निंद्य कृत्य करूं नका; तेथें माझ्या सांगण्याचा कांहीं उपयोग झाला नसता. पण येथें मात्र मला माझ्या जवळ असलेलें सर्व वित्त, कापड-चोपड या तळमळणाऱ्या जीवांना देतां आलें असतें. जोंपर्यंत मी मजजवळ जादा असलेलें अन्न व कापडचोपड दुसऱ्या नडलेल्या माणसांस देत नाहीं तोंपर्यंत मी निःसंशय गुन्हेगारच आहे. ही भावना माझी झाली आहे व अखेरपर्यंत तशीच राहणार.

त्याच दिवशीं सायंकाळीं मी आपल्या मित्रांना पाहिलेला प्रकार निवेदन केला. त्यानें तो शहरांतच राहणारा असल्यानें यांत कांहीं विशेष नाहीं, असें प्रकार चालणारच अशी माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. सुधारणेच्या युगांत ह्या गोष्टी अपरिहार्य आहेत लंडनमध्यें यापेक्षां शोचनीय परिस्थिति आहे. त्यांत काय आहे? अशा प्रकारानें मनावर मुळींच परिणाम होऊं नयेत वगैरे तो सांगूं लागला. मला तें सहन होईना. आवेशानें मी त्याचा प्रतिकार करूं लागलों. मग भान मुळींच राहिलें नाहीं. हा प्रकार पाहून घरांतील मंडळी तेथें जमा झाली. परंतु मला राहवेना. माझा कंठ सद्गदित झाला व म्हणालों, ' असें करून चालणार नाहीं. " जमलेल्या मंडळींनीं या अनवश्यक कळकळीबद्दल माझी नालस्ती केली.

सं. ...... ता. ......

अन्यायांवर व्यापार करून गांवांतील लोकांच्या स्नेहाकरितां घरची मंडळी दुखवावयाची काय? जरूर. असें त्यांनी मला बजाविलें. मलाही त्यांत प्रथम तथ्य वाटलें. पण माझा अंतरात्मा मला बसूं देईना. मी करीत आहे तेंच बरोबर आहे, असें खास वाटूं लागलें व माझी तळमळ राहीना.

शहरांतील जीवन प्रथम मला नवें ( नाविन्यपूर्ण ) व अपरिचित होतें. पण अनुभवानें मला तें त्याज्य व नकोसें वाटूं लागलें. मला या चैनी व डामडौलाच्या राहणीचा वीट येऊं लागला त्यामुळें माझ्या अंतःकरणांत वेदना उत्पन्न होऊं लागल्या. मी करी; पण ज्या ज्या वेळीं भव्य शृंगारलेले दिवाणखाने, गाडया-घोडी, नाटकगृह व नाच हे माझ्या दृष्टीस पडत त्या वेळीं मी नियाविन गृहांत पाहिलेला देखाव मूर्तिमंत दारिद्र्य माझ्या डोळ्यापुढें दत्त म्हणून उभें राही! दोन्ही गोष्टींचा अन्योन्य संबंध खास असला पाहिजे अशी माझी खात्री झाली व मी अपराधी आहें ही भावना दृढ होत चालली. पण दुसऱ्या कल्पनेनें लवकरच ही माझी भावना अस्पष्ट होऊं लागली. ज्या ज्या वेळीं माझे हे मत मी माझ्या स्नेह्यांना सांगत असें त्या वेळीं मी मनाचा मऊ व कनवाळू असल्यानें दुसऱ्यांच्या हालांचा परिणाम माझे मनावर अधिक होतो अशी माझी समजूत ते घालीत. अर्थातच मला माझ्या या गुणाबद्दल समाधान व अभिमान वाटें व जी लाज व जो पश्चात्ताप प्रथम मला होई तो नाहींसा झाला. मला माझ्या औदार्याबद्दल व त्याचें प्रदर्शन करण्यांत समाधान वाटूं लागलें. चूक घडती आहे ती माझ्या ऐषआरामांत नसून परिस्थितीच तशी विचित्र झाली आहे. माझी राहणी बदलून

जगास तर उपयोग नाहींच, पण माझ्या आप्तेष्टांना व भाईबंदांना त्यामुळें वाईट वाटणार असें मला वाटूं लागलें. साहजिकच शक्य ती मदत गरजूंना करणें व त्यांची परिस्थिति सुधारणें हा एकच मार्ग मला दिसूं लागला मला जग उदार, कनवाळू व आर्तितांस मदत देणारा म्हणूं लागलें. पण खरोखर माझ्या मनाचें त्यामुळें समाधान होईना! विचार व कल्पना यांचा पगडा बरेंच वेळां सद्सद्विवेक बुद्धीवर बसतो, त्यांतलाच हा प्रकार असें मला वाटूं लागलें.

त्या वेळीं सेनसस् चालू होतें. या गोष्टीचा फायदा करून घेणेचा विचार मी केला. श्रीमंत लोकांच्या भेटी घेऊन या दारिद्र्या-बद्दल त्यांच्या मनांत करुणा उत्पन्न करावयाची व त्यांच्या मदतीन घरोघर हिंडून, त्यांची कोणाची काय स्थिति आहे व कोणास काय गरज आहे याची चौकशी करून पैशाची व काम पुरविण्याची मदत त्यांना देण्याचा मी संकल्प केला. कायमचीच एक संस्था या कामा-करितां निर्माण करणें व भागवरानें त्यांच्याकडे कामगिऱ्या देऊन दारिद्र्याचा पाया मुळांतच काढून टाकण्याची तजवीज अधिक श्रेय-स्कर आहे असें ठरविलें. नंतर या मनाच्या टोंचण्या नाहींशा झाल्या-वर कुणालाही सुखानें गाडीघोडी उडवितां येतील असा स्वतःशा मी बेत केला.

ही कल्पना लोकांच्या पुढें लेखरूपानें मांडण्याचा विचार मी केला. परंतु प्रसिद्धीपूर्वी मी श्रीमंत लोकांना गांठून त्यांच्यापुढें मी माझे विचार मांडले. पण औपचारिक सहानुभूति शिवाय त्यांची याबद्दल अधिक जिज्ञासा दिसली नाहीं. 'आपले विचार मला पटले पण आपल्या लोकांना त्याची किंमत नाहीं,' असेंही ते बोलून दाखवीत.

बहुतेक लोक अशाच प्रकारची पोकळ सहानुभूति दाखवीत. त्यांना विचार पटत नव्हते अगर त्यांची स्वतःची इच्छा तशी नव्हती असें नसून कांहीं तरी आगंतुक कारणें त्यांना या गोष्टी-पासून परावृत्त करीत होती. ज्यांनीं मला मदत देण्याचें कबूल केलें, त्यांनीं प्रत्यक्ष मदत देतांना उडवाउडवी केलीच. मनुष्यांस एखादी गोष्ट मनापासून पाहिजे असली म्हणजे तो जसा चटकन् खिशांत हात घालतो व विचाराची सबब न सांगतां चटकन् पैसे खर्च करतो तो प्रकार मला या कामीं कोठेंच आढळला नाहीं. थिएटर-मध्यें नाटकाचीं तिकिटें आठ आठ दिवस आगाऊ काढून ठेवलेलीं व शेंकडों मैलांवरून धांवत येणारी मंडळी नित्यशः दिसतात. पण मला या कामीं हा उत्साह कोठेंच आढळला नाहीं. हिंडतां हिंडतां मी शेवटीं एका घराजवळ आलों. दाराशीं रस्त्यावर गाड्याघोड्यांची गर्दी व शिपाईप्याद्यांचा जमाव दिसून आला. घरांतील मुख्य दिवाण-खान्यांत पुरुष व बायका रेशमी व लोंकरींच्या कपड्यांनीं सजलेली, अंगावर जडजवाहीर घालून मिरवत असलेली मला दिसली. चहा, साखर, बिस्किटें वगैरे खाद्य-पेयांची लूट चालली होती. हजारों रुप-यांचा चुराडा चालला होता. लाखों रुपये त्यांच्या इतमामाकरितां खर्च होत होतें. पण ज्या कामाकरितां तें जमलें होतें त्या मानानें कित्येक पट हा खर्च होत होता. मला हा सर्व प्रकार पाहून विषाद वाटला. मला माझें काम करावयाचें होतें, पण मला त्यांत विशेष उत्साह वाटला नाहीं, तथापि मी उपक्रम सुरू केला. तेथील मंडळी-पैकीं कोणी पैशाची मदत नाकारली तर कोणी गरीब लोकांतून हिंडणें हें आपणांस कमीपणाचें वाटतें असें सांगितलें. एवंच

ज्यानें त्यानें आपापल्या परीनें नम्राचा पाढा वाचला. कांहीं जबाबदार लोकांनीं या शहरांत श्रीमंत लोकांनीं आधींच मदत केली आहे, आतां नवीन पैसा मिळणें शक्य नाहीं असें सांगितलें. माझें काम कल्पनेप्रमाणेंच झालें. शेवटीं मी घरीं जड अंतःकरणानें परत आलों, व निजणार तोंवर माझें मन मला खाऊं लागलें. मी कांहीं तरी वाईट गोष्ट करीत आहे असें मला वाटूं लागलें. पण मी या गोष्टीस आरंभच केला असल्यानें लाजेखातर तरी मला हें चालविणें भाग होतें. मी या माझ्या मनाच्या वोचणीस न जुमानतां माझें काम चालू ठेवलें.

माझा लेख मी प्रसिद्धीकरितां पाठविला. मला तो वाचून असमाधान उत्पन्न झालें व माझ्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. ज्यांनीं वाचला त्यांच्या मनास हूरहूर लागली. मी खानेसुमारीच्या कार्यकारी लोकांना याबद्दल विचारलें; पण कोणाचीही काम करण्याचा अगर मदत देण्याची तयारी दिसली नाहीं. त्यांनीं माझ्या कार्याबद्दल सहानुभूति व्यक्त केली व माझ्या चुका मला दाखवून माझ्या कार्याचें अशक्यत्व दाखवून दिलें. कित्येकांनीं असंतोष व्यक्त केला व प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हा अव्यापारेषु व्यापाराबद्दल आपली चांगली हजेरी घेणें जरूर आहे अशीच भावना दिसून आली. एकदोघांनीं नैतिकदृष्ट्या ही गोष्ट केली पाहिजे अशी कबुलीही दिली. खानेसुमारीत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मी हाच प्रश्न विचारला व त्यांच्याकडूनही असेंच उत्तर आलें. माझ्या लेखाचाही तोच प्रकार झाला. प्रत्येकास विचार पटत; पण जो तो त्याची निरर्थकता व आवश्यकता पुढें करी. जो तो समाजांत वावरत असलेली एकमेकां-

बद्दलची बेफिकीरीबद्दल कसून टीका करी, मात्र स्वतःबद्दल कोणीच विचार करीत नसे. माझ्या अंतःकरणांत मात्र एकंदरींत हें बरें नव्हे असें वाटें व हा आपला उद्योग निरर्थक आहे अशी मनाची समजूत झाली. पण मी लेख लिहून माझा उद्योग आधींच सुरू केला होता. अर्थातच त्याला धरून पुढें चालणें मला भाग होते

माझ्या विनंतीस मान देऊन शहरांतील एक भाग मला खानेसुमारी करितां म्हणून दिला, पूर्वी हा भाग एका व्यापाऱ्याचा होता. परंतु हल्लीं त्यांची मालकी राहिली नव्हती. हा भाग म्हणजे दारिद्र्याचें माहेरघर होतें. एवढेंच नव्हे तर दुर्गुणांनीं पूर्ण भरलेला होता; म्हणून मी हा भाग मुद्दाम मागून घेतला होता. प्रत्यक्ष सेनससपूर्वी मी त्या भागाची पूर्ण तपासणी करण्याकरितां गेलों. प्रथम मला तेथें दोन मुलें बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळत असलेलीं दिसलीं. अंगावर चिंध्या होत्या व शहरांतील मुलांप्रमाणें चलाख व जरा कर्मटही होती पुढें च कोंपऱ्यावर एक बाई तोंड सुजलेली, खोकत चाललेली व छातींत घरघर आवाज करीत असलेली आढळली. मला पाहतांच तीं पैशाचीच मदत मागावयाची; पण या वेळीं ती मुलांकडे बोट दाखवून "पहा काय उपद्व्याप चालविला आहे तो. केवळ खट्याळपणा करण्याची वृत्ती" असें म्हणाली. हें बोलणें त्यांना ऐकूं गेलें असावें. त्यांनींही तिची हजेरी घेतली. तिनें बूट चोरलें होतें असें त्यानें सांगितलें. बाईनेंही लाखोलीं वाहिली. अशाच तऱ्हेचें रिकामपणचें उपद्व्याप व प्रकार मला बरेंच पहावयास मिळालें. ह्या भागांत आंतील बाजूस ज्या वेळीं मी गेलों त्या वेळीं तेथें मनस्वी घाण दिसून आली. जिकडे तिकडे अस्वच्छता व घाण. हा

प्रकार पहात उभा आहे तोंवरच एक मुलगी अंगानें सडपातळ व भिकार कपडे घातलेली पळत आली. तिच्या मागोमाग एक मुलगाही तिचा पाठलाग करीत येत होता. त्यानें तिला पकडलें व "आतां तुझी सुटका कशी होत पाहूं" असें तो तिला हांसत म्हणाला. तिनेंही उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. परंतु मी दृष्टीस पडताच मला तिनें "कोण पाहिजे" असा सवाल केला. अर्थातच मला कोणी नको होते मी आपला गोंधळून पुढें चालूं लागलो. ह्या प्रकारांत कांहीं विशेष होते असें नाहीं; परंतु त्याना मदत करून त्यांचे हाल कमी करावें म्हणून उद्योगास प्रवृत्त झालेल्या मला आतां निराळीच दिशा दिसूं लागली. यांचा वेळ बराच रिकामा असतो. खाणेंपिणें व कपडालत्ता देणें यावरच माझी जबाबदारी संपली नसून **त्यांच्या आयुष्याचा काळ कांहींतरी उपयुक्त कामांत त्यांचें कल्याण होईल अशा तऱ्हेनें घालवावयास पाहिजे.** त्यानाही आपल्याप्रमाणेंच मनोविकार आहेत,आमच्याप्रमाणेच संसारीक प्रश्न आहेत. याची पूर्ण जाणीव मला आली अर्थातच मला माझ्या अंगीकृत कार्याचे महत्त्व व अवघडपणा व त्या मानानें अत्यंत अल्प असें माझें सामर्थ्य प्रत्ययास आलें.

या अभागी लोकांचे वर्गीकरण करणेचें झाल्यास त्यांत तीन प्रकार होतील. पहिला वर्ग ज्या लोकांची पुर्वीची चांगली स्थिती गेली आहे पण ती परत येण्याची अपेक्षा करीत आहेत,अशांचा दुसरा वर्ग, निराश्रित बायका यांची संख्या बरीच दिसली. तिसरा वर्ग मुलांचा सर्वांत पहिल्या वर्गाचे लोक मला अधिक आढळले बहुतेक घरांतून मला या चाळीच्या मालकानें माहिती करून देतांना "तुमच्या मदतीची

येथें अपेक्षां मुळींच नाहीं. फक्त एक दिवस दारूचें व्यसन यानें सोडलें म्हणजे झालें " असें सांगितलें. प्रत्येकांची स्थिती खालावलेली दिसत होती. ज्या वेळीं मालक हांक मारी त्यावेळीं पूर्वाश्रमीचा संपन्न असा कोणी तरी मनुष्य झिंगलेल्या स्थितींत हळूंच येई. जर तो शुद्धीवर असेल तर त्यास सांगितलेलें काम तो स्वखुषीनें करी. आपली माहिती करून देणारें पत्र तो मोठ्या डौलानें पुढें करी. व औपचारिक आदरातिथ्याच्या प्रसंगीं पोक्तपणा व विद्वत्ता दाखवी. आजूबाजूचें लोक नेहमीं त्याची टवाळी करीत पण या प्रसंगीं आपलें शिक्षण आपले विचार किती थोर आहेत व इतरापेक्षां आपण कसें प्रबुद्ध आहोत याचें प्रदर्शन तो चांगलें प्रकारें करी. त्याला आपल्या पूर्वाश्रमांतील लोकांमध्यें मिसळण्याची हौस वाटे व ज्या ज्या वेळीं मी त्यांना त्यांच्या आयुष्याबद्दल हकीगत विचारी त्यावेळीं मोठ्या उत्सुकतेनें ते सर्व हकीगत सांगत. आलेल्या संकटपरंपरेची वर्णनें देत व पुन: गतवैभव आपलें होतें व तें मिळेल अशी अपेक्षा दाखवीत. अशाच लोकांचा भरणा चहूंकडे दिसे. एक चाळ तर या सर्व लोकांनीं भरलेली दिसली. आदमासें चाळीस लोक घरांत स्वस्थ पडून होते याच्या इतकी हलाखीची स्थिती दुसरीकडे कोठेंच दिसून आली नाहीं. प्रत्येकजण चांगल्या खानदानीच्या घराण्यांतला असे. कोणाचा बाप, तर कोणाचा काका, कोणी स्वत: तर कोणाचा भाऊ संपन्न स्थितींत होते. परंतु स्वत:च्या बेपर्वाईनें, दुसऱ्याच्या असहिष्णुतेनें किंवा दैवदुर्विपाकानें यांची स्थिती खालावलेली होती. वृद्ध पोटास भरपूर नसल्यामुळें हातापायांत निर्जीव असे दिसत. तरुण फिके चेहरे करून हिरमुसल्या तोंडानें आपण भिक्षेची याचना करीत

आहोंत असें दर्शवीत. प्रत्येकांत फक्त प्रमाणांचाच फरक, स्थिती मात्र एकच.

आजच्या परिस्थितींत त्याना या गलिच्छ, हीन, नादान लोकांशीं प्रसंग काढावा लागत होता व्यसनांत सांपडलेलें, दारिद्र्यानें गांजलेले, अर्धपोटी व अर्धनग्न स्थितींत, त्यांना पूर्वाश्रमींची आठवण होई व सर्व विचार व कल्पना गत आयुष्याकडेच धांव घेत चालू स्थिती त्यांना असमाधानकारक, निंद्य व अस्वाभाविक अशी वाटे

प्रत्येकाला भूतकाल व भविष्यकाल यासंबंधीच मनोराज्यें निर्माण करण्यांत आनंद वाटत होता. पण वर्तमानकाळ सुधारण्यांस लागणारीं साधी तरतूद मात्र त्याना करतां येत नसे. हीं मनोराज्यें करण्यांत कोणाची पांच तर कोणाचीं दहा तर कोणाची तीस अशी आयुष्याची वर्षें फुकट गेलेलीं होतीं व जात होती.

कोणी म्हणे कीं जर माझें गहाण मला सोडवतां आलें तर काय मजा होईल ! दुसरा म्हणे कीं, मला फक्त उंची पोषाख मिळण्याची फुरसत कीं अमक्या तमक्याच्या वशिल्यानें नोकरी काढतोच. तिसरा ह्मणे कीं माझ्या असलेल्य मिळकतीबद्दल दावा लावून जर कबजा घेतां येईल तर किती बरें होईल. असें एक ना दोन अनेक प्रकार ऐकण्यास मिळत. प्रत्येकाला कांहीं तरी दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा असे व ती जर मिळेल तर आपण सुखानें कालक्रमणा करूं असें त्यास वाटे.

मी लोककल्याण करणारा या अभिमानानें चहूंकडें पहात होतो. या अभिमानाचा पडदा माझ्या दृष्टीवर जर नसतां तर या लोकांची ही परिस्थिती, हा असंतोष बाहेरील मदतीनें सुधारणार

नाहीं, त्यांनीं आपली रहणी व आयुष्याचा मार्ग बदलणें जरूर आहे, हें माझ्या तेव्हांच लक्षांत आलें असतें. त्यांची कोणत्याही रीतीनें असामान्य व अगदीं निराळीं स्थिती नसून इतर लोकांच्या प्रमाणें, तुमच्या आमच्या परिस्थितींत तें होतें. मला माझेंच प्रतिबिंब या लोकांत दिसून आलें मी स्वतःच जर आपल्या जीवनक्रमाचा विचार केला असतां व तें या लोकांच्याशीं तुलनात्मक विचारानें पाहिलें असते तर मला दोहींमध्यें अंतर कांहींच आढळलें नसतें.

माझे स्नेही सोबती जरी आरामशीर बंगल्यांतून व ऐष-आरामांत रहात होते तरी त्यांची स्थितीही या लोकांच्या प्रमाणेंच असंतोषाचीच होती. प्रत्येकास आहे ही स्थिती नको होती व तेही वरील लोकांप्रमाणें भविष्यकाळाच्या मनोराज्यांत दंग होते. त्यानांही आपणांस कष्ट न करतां व्यवस्थित रहावयास मिळावें असें वाटत होतें. आपण श्रम कमी करून दुसऱ्यास आपल्याकरितां श्रम अधिक पडावें हीच प्रत्येकांची मनीषा. मी जर पूर्ण विचार केला असतां तर ही गोष्ट मला प्रथमच करावयास पाहिजे होती. दुसऱ्यास मदत देण्याच्या हेतूनें मी त्यांच्याकडे जाऊन विचारपूस केली, त्यांची परिस्थिती अवलोकन केली व मला हेंच आढळून आलें कीं, त्यांनीं, आपल्या आयुष्याचा मार्ग बदलल्याशिवाय ते सुखी होणार नाहींत, दुसऱ्यास उपदेश करणारानें आपण तसें स्वतः झालें पाहिजे व तसें करण्यास मला माझी स्वतःची रहाणी बदलणें भाग होतें.

या लोकांना पौष्टिक अन्नाच्या जरुरीपेक्षां जिव्हालौल्याची अपेक्षा अधिक होती व सना वाढविण्याच्या बाबतींत,या लोकांना मदत पाहिजे होती. मला खरोखर अशीं मदत कोणासच करितां आली

नाहीं.ए. दोघांना मदत करून पाहिली, पण त्यामुळें त्यांची स्थिती समाधानकारक तर झाली नाहीं पण उलट ते फिकीरींत पडले बुडत्याचा पाय खोलांत ह्मणतात तो असा.

दुसरा अभागी वर्ग ह्मणजे चारित्र्यहीन स्त्रियांचा यांचा भरणा बराच दिसून आला. यांना मदत करण्याचा माझा प्रथम इरादा होता. आमच्या सोयीसाठीं आम्ही आमचा कामाचा क्रम आंखून घेतला. घरांत जातांच आम्ही प्रथम तेथील पालकाची चौकशी करीत होतो. दुसरा इसम ठिकठिकाणीं जाऊन जरूर ती माहिती गोळा करी याप्रमाणें आह्मी एका घरांत शिरलो. बरोबरचा विद्यार्थी मालकाच्या शोधास लागला. मी तेथे बसलेल्यांना माहिती विचारण्यास सुरवात केली. तेथें बसलेल्या वृद्ध गृहस्थांस व बाईस मी हकीगत विचारण्यास सुरवात केली. तो मनुष्य सध्या रिकामा होता. बाई स्वयंपाक्याची बायको होती. पुढें मी तिसऱ्या खोलींत शिरलों. तेथें एक बाई होती. तिला समोरच निजलेल्या मनुष्याबद्दल विचारलें. तिनें तो 'पाहुणा' आहे असें सांगितलें. तिनें आपण एक शेतकरीण असल्याचें सांगितलें. मी तिला धंदा काय असें विचारिलें. तिनें हंसण्यास सुरवात केली. पण माझें उत्तर न मिळाल्यामुळें मी पुन्हा सरळ तोच प्रश्न केला. 'मी घरीं असतें' असा तिनें जबाब दिला मला बोध झाला नाहीं. मी पुन्हा आपला चरितार्थ कसा चालतो असा प्रश्न केला. तिनें उत्तर न देतांच हंसण्यास सुरवात केली. आमची भाषा चालली. शेजारील खोलींत ऐकूं जात असावी, कारण तेथूनही बायकांचा आवाज तोही आमच्यां भाषणाबद्दल हंसण्याचा मला ऐकूं आला. इतक्यांत तेथील मालक तेथें आला. त्यानें माझें प्रश्न व त्या

# विषमता.

शहरांतील वरील लोकांची स्थिती सुधारण्याचें प्रयत्न मी करीत होतो. एका बुडत्यानें दुसऱ्यांस वाचविण्यापैकींच हा प्रकार होता. माझीच आधी धडगत नव्हती. मी ज्या पायावर उभा होतो तोच मुळांत कच्चा होता. त्याला घर नसल्यानें माझ्या खालील जमीन जात चालली होती. मग मी दुसऱ्यांस वांचविणार कसा ? बाह्य साधनांनीं त्यांची स्थिती सुधारण्याचा मी प्रयत्न करीत होतो.

मला माझ्या आयुष्याची दिशा चुकलेली व ती तशी असून भागणार नाहीं हें कळून चुकलें होतें. परंतु त्यामुळें स्वतःमधें, स्वतःच्या राहणीमधें व आचार विचारांमधें फेरफार करण्याचें बाजूस ठेवून मी दुसऱ्यांची स्थिती सुधारण्याच्या मार्गास लागलो. मी शहरांत रहात होतो. अर्थांत तेथील लोकांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न मी करून पाहिला परंतु मला ते या परिस्थितींत अशक्य वाटले, व शहरांतील आयुष्य व तेथील दारिद्र्य या संबंधी मी विचार चालविला. ' शहरांतील राहणी व तेथील दारिद्र्य ' याचा अर्थ काय ? मला शहरांतील लोकांना मदत कां करतां येऊ नये ? याचा विचार मी केला. मला त्यांना कांहीच मदत करतां येत नाहीं कारण एक तर त्यांची संख्या अत्यंत मोठी व दुसरे त्यांची स्थिती खेडेगावांतील गरीब लोकांच्यापेक्षां भिन्न. शहरांतच त्यांची संख्या मोठ्या प्रमाणांत कां ? व त्यांची स्थितीही भिन्न कां ? दोन्हींचे उत्तर तेंच, येथें शहरांत उपाशी मरणारे लोक खेडेगावांतून येऊन

येथील श्रीमंत व संपन्न लोकांभोंवती अन्नाच्या आशेनें गोळा झालें, त्यांचे वैशिष्टच ह्मणजे खेड्यांतून तें किंवा त्यांचे वाडवडील अन्ना-करितां शहरांत आले. ‘ उपजिविकेकरितां आलें ’ याचा अर्थ काय ? याचा आपण खोल विचार केलांत तर खरोखरीच आपणांस हसूं येईल इतकी विचित्र गोष्ट आहे. जेथें सभोंवार झाडी आहे, लाकूड फाटा आहे, मुबलक धान्यधून्य व दाणागोटा आहे, स्वच्छ हवा पाणी आहे, जनावरांना चरण्याची व दूधदुपत्याची वाण नाहीं अशा खेड्यांतून निघून शहरांत—जेथें झाडेंझुडें, गवत, कडबा येवढेच नव्हे तर पेराऊं रानही मिळण्यांचा संभव कमी, जेथें रस्त्याची धूळ व गिरण्याचा धूर यांचा सुकाळ, तेथें अन्नाकरितां—पोटाकरितां जमलेंत ? याचा, या पोटभरण्याचा अर्थ तरी काय ? जे भरतात व जे भरवितात त्यांना तो कळला आहे काय ?

हजारो लोकांशी, श्रीमंत गरीब सर्व दर्जाच्या लोकांशीं मला विचार विनिमय करण्याचा प्रसंग आला. याबद्दल मी त्यांना विचारले पण सर्वांचें उत्तर एकच. ‘ मास्को हें संपत्तीचें आगर आहे. येथें सर्व कांहीं मिळूं शकतें. येथें आमच्या निर्वाहास लागणारी सर्व साधनें, धान्यधून्य, कापडलत्ता, जनावरें, गाडीघोडे काय पाहिजे तें मिळते.’ पण या सर्वांची उत्पत्ती कोठें ? खेडेंगांवीच हीं निर्माण होतात व खरें संपत्तीचें उत्पत्ती स्थान तेंच. असें असतां हा द्राविडी प्राणायाम कां ? व शहरांतील लोकांच्याकरितां खेड्यांची लूट कां ह्मणून ?

या संबंधी मी पुष्कळ विचार विनिमय केला. मला याच्या मुळाशी दोन कारणें दिसली. एक खेड्यांतील लोकांना आपला

माल शहरांत विकण्याकरितां येणें भाग पडते व दुसरें शहरांतील चैनी व मिजाशी, खेड्यांतील लोकांना चैनीकरितां इकडे यावयास लावतात. धान्यधून्य खरेदी-विक्रीकरतां शहरांशी खेड्यांतील लोकांचा संबंध येतो हें खरें. पण तितकेंच खरें हें आहे कीं, शहरांत कमी श्रमानें पैसा मिळतो व येथील डामडौल, छानछोकी व चवचालपणा यांनीं त्याचें चित्त मोहून जाते. तेथें त्याला चैन करतां येते. दिवसांतून तीन तीन वेळां चहा घेणेंस सांपडतो. प्रसंगी उपवास काढूनही दारू झोकतां येते ? नाटक सिनेमा करतां येतात ! हीं खेडेगांवांत कोठून मिळणार !

सर्वांच्या मुळांशी कारण एकच. 'धनोत्पानदन करणारे निराळे व धनसंचय करणारे निराळे.' पहिल्यांच्या हांतून दुसऱ्या वर्गात संपत्ती चालली आहे. धान्यधून्य सर्व प्रकारचा दाणागोटा, गाई, म्हशीं, बकरीं, मेंढ्या अंडीं, भाजीपाला बटाटे वगैरे नानातऱ्हेच्या जिनसा, संपत्तीची विविध रूपें, खेड्यांतच निर्माण करावयाची व त्या सर्वांची मालकी, व सर्वांचा प्रसार शहरांतून करावयाचा. लक्षाधीशांच्या स्वाधीन करून त्यांनीं तो दुसऱ्या मोठ्या ठिकाणीं पाठवावयाचा. हें सर्व कशांकरतां ? तर शहरांतील सुखसाधनें, चैन पाहिजे म्हणून. प्रसंगी जरूर ते सर्व विकून शहरांत जावयाचे व तेथें त्या ठिकाणीं मिळालेल्या पैशांतून पुन्हां निर्वाहाची साधनें परत खरेदी करावयाची व मनांस भुरळ पाडणारी, मोह पाडणारी शहरांतील राहणी अनुभवावयाचीं.

सर्व ठिकाणीं, जगभर आज हा प्रकार दिसतो ! शेतकऱ्याची संपत्ती दलाल, खरेदीदार, व्यापारी, अधिकारी वगैरे लोकांच्या हातीं

ही खेळते त्यांना तिचा उपयोग पाहिजे असतो अर्थातच शहराशिवाय ही गोष्ट शक्य नसते. खेडगांवी ते दूर असल्यानें, संपत्तीनें मिळणारीं सर्व चैनीचीं साधनें मिळत नाहींत हें एक व दुसरें संपत्तीचे खरें सुख जें आहे तें मिरवण्यांत, लोकांच्या दृष्टींस पडण्यांत, मी इतरापेक्षां अधिक संपन्न, अधिक सुखी आहे, हें मिरविण्यांत आहे.

पोट भरण्यांस आलेला मजूर आपल्या भोंवती हा सर्व चैनीचा, प्रकार पाहून मनांशी काय विचार करत असेल ? आपणच इतके श्रम कां करावेत ? त्यापेक्षां व्यापारउदीम, अडतपणा, दलाली, प्रसंगी लुच्चेगिरी करूनही 'थोड्या श्रमांत जर हजारों रुपये मिळून चैन करावयांस मिळेल तर ते आधिक बरें' असें त्यांस वाटल्यांस नवल काय?

शहरांत चालू असलेल्या या लुटीस जबाबदार कोण ? आह्मीच ना ! ही राहणी आमच्या इतकी अंगवळणी पडलेली आहे कीं, शेकडों रुपये अनाठाईं उडवणें हे आपणांस नित्याचे होऊन बसले आहे. शेजारी भुकेनें व तापत्र्यानें होरपळत असतां आपली जरूर ह्मणून हजारों रुपये नाचाकरितां व जलशाकरितां उडविणारें हरीचे लाल आज आपण पहात नाहीं कां ? ज्यांना ५-४ रुपये आपल्या निर्वाहाच्या साधनांस, जगण्यांस पाहिजे असतां ते मिळत नाहींत, त्यांच्याच दृष्टीपुढें हा पैशाचा चुराडा होत आहे ! ज्याला कराच्या ओझ्याखालीं राबावे लागते, प्रसंगी आपल्या जिवापेक्षांही प्यार असें कोकरूं, मेंढरू विकून सरकारची भर करावी लागते, त्याला दारूच्या व सोडावॉटरच्या शेंकडों बाटल्या फुटतांना दिसाव्यात व पाण्यासारखा पैसा उधळलेला पहावयाचा प्रसंग यावा हें उचित आहे काय ? तो जरी गरीब असला तरी मनुष्यच आहे. त्याला

सं. नं. ता.

विचारशक्ति आहे. जर एखाद्यानें अनाठाई पैसा खर्च केला तर आपण त्याला ' काय मूर्ख आहे याच रकमेंत मी कशी छान सोय केली असती ' असें ह्मणतों. मग बिचारा मजूर, लाखों रुपयांचा, चैनींत चक्का चूर उडतांना पाहून व त्याला जरूरीच्या जिनसा मिळविण्यासही साधन नाहीं, हें जाणून तो स्वस्थ कसा राहील ? ही गोष्ट आपण डोळ्याआड करून चालणार नाहीं.

**एकानें चैन करावी व दुसऱ्यानें उपाशी मरावें**, हें त्यांना खपत नाहीं. प्रथम त्यांना त्याची चीड येते. संवयीनें पुढें तें अंगवळणी पडते. ते तेंच करूं लागतात. ज्यांना जमतें ते ऐदखाऊ होतात. ज्यांना साधत नाहीं ते मग कुंटिणखाने व देकार घरांची भरती करून आपला जीवनक्रम चालवितात.

दोन वर्षांपूर्वीं मी एक छोकरा खेडेगांवांतून नोकरीकरितां आणला. त्याचे इतर लोकांशीं जमेना ह्मणून त्याला नोकरीवरून दूर केला. पुढें तो एका व्यापाऱ्याचे एथें राहिला. तेथें चित्रविचित्र पोषाख करून व कंबरेस एक सांखळी बांधून तो त्याच्या मालाची जाहिरात करीत हिंडे. दुसरा नोकर त्याच्या जागीं ठेविला. तो दारूबाज निघाला. तिसरा ठेविला, त्याचाही तोंच प्रकार. दारूनें झिंगून, कपडे धुळींत मळवून देकार घरांसी तो बसूं लागला.

चवथा एक नोकर ठेविला तो दारू पिवून अजारी पडूं लागला. अशी अनेक उदाहरणें नित्यशः शहरतूंन दिसतात. चैनीचे पदार्थ, ह्या तेथें नित्याच्या जरूर गोष्टी होऊन बसतात. घडाळाकरितां सायकलीकरितां पैसे मागणारे लोक आपणांस भेटतील. असाच प्रकार माझें प्रत्यक्ष अनुभवास आला. एकदां तर एका बाईनें वाईट संबंध

नोकराशींच ठेविला. शेवटीं त्याला दूर करणें भाग आले. हीच स्थिती एका मोलकरीण तरूण मुलीची झाली. तिला दूर करतांच तिनें सरळ कुंटणिखान्याचा मार्ग धरिला व दुकान लावून धंद्यास सुरवात केली. हा सर्व कशाचा परिणाम ?

आम्ही आपली दृष्टीं सभोंवार टाकली नाहीं. आपल्या आचरणानें, आपल्या राहणीनें कोणते जंतू समाजांत पसरवित आहोंत याचा विचार करीत नाहीं. आमच्या चैनीनें व वागणुकीनें, या लोकांची ही स्थिती निर्माण करीत असतो व मागाहुन तीं सुधारण्याचा विचार करूं लागतो. अशा तऱ्हेनें, मला शहरांतील दारिद्र्य दूर करणें कां अशक्य आहे हे समजले. प्रथम **ज्या गोष्टींची गरज खेडेगावांतील लोकांना आहे त्या वस्तु मी माझेबरोबर शहरांत आणतो.** दुसरे असें कीं त्या **सहाय्यानें मी त्यांना लुबाडून त्यांच्या जिवावर चैन चालवितो.** ही गोष्ट त्यांच्या दृष्टींसमोर घडत असल्यानें, तें हलक्या व अनैतिक मार्गाचा अवलंब करून, ही लूट परत घेणेंचा मार्ग चालू लागतात.

दुसऱ्या तऱ्हेनें विचार करतां हेंच तत्व मला दिसले. शहरांतील माझे माहितीचे गरीब व अनाथ लोक होते. पण त्यांच्यांत सचोटी कमी होती, निष्कपटता मुळींच नव्हती. सर्वजण मला मनुष्य समजतनसून मी एक त्यांच्या मदतीचें साधन ह्मणून ते मजकडे पहात. मला त्यांच्याशीं सहकार्य करितां येईना, त्यांच्यांत मिसळणें शक्य नव्हतें अर्थांतच ज्याची खरी परिस्थिती माहीत नाहीं त्यांस मदत कोण व कशी करणार !

प्रथम प्रथम मीं याबद्दल त्यांना दोष देत होतो, परंतु

माझ्या स्नेह्यानें माझी चूक मला दाखविली. एके दिवशीं मी माझ्या बहिणीसी गप्पागोष्टी करीत बसलों होतों, तिनें मला माझ्या कामगिरीबद्दल विचारिलें. मी मोठ्या आनंदानें व अभिमानानें माहिती देत होतो. अनाथांचें रक्षण कसे होईल, पोरकी पोरे कशी सांभाळता येतील वगैरे बद्दल भाषा चालू होती. माझी बहीण मला माझ्या या कामगिरी बद्दल सहानुभूती दाखवीत होती. हा प्रकार माझा स्नेही पहात होता. मला त्याच्या मदतीची अपेक्षा वाटू लागली. मी मुद्दाम त्याला या बद्दल काय वाटते ह्मणून विचारले.

'सर्व निरुपयोगी आहे' तो ह्मणाला. 'कां?' असें मी विचारले. 'आपण करीत असलेला मार्ग चुकीचा आहे. त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं' असें त्यानें सांगितलें.

'हजारों निराश्रितांना मदत निरुपयोगी? निराश्रितांना आश्रय, क्षुधितांना अन्न व नग्नाना वस्त्र देणें निरुपयोगी? मग जगांत उपयोगाचे काय?' असें मी विचारले.

'हें सर्व समजलें! परंतु आपण योग्य मार्गानें जात नाहीं. मदत करण्याची ही पद्धती नव्हे. रस्त्यानें हिंडतांना लोक तुह्मांस मदत मागतात, तुम्ही देता. हा काय धर्म? आत्मिक उन्नतीची त्यांस मदत करा. त्याला शिक्षण द्या. केवळ त्याची बोळवण करण्याचा मार्ग सोडा' तो म्हणाला.

'हजारों लोक दुःखांत अन्न वस्त्राविणें तळमळत आहेत. हे आपणांस माहीत नाहीं काय? एका मास्को शहरांत वीस हजार लोक आहेत हे आपण विसरतां वाटते! त्यांना मदत न देणें, खुशाल मरूं देणें शहाणपणाचें होईल?' असा मी प्रश्न केला. त्यानें स्मित

केले. ' वीस हजार ! एका रशीयांत घरें किती आहेत ' एक लाख ' असे तो म्हणाला ' पण त्याचें काय ? मी विचारले 'त्याचे काय '? असा प्रश्न करून सतेज नेत्रांनीं तो मजकडे पाहूं लागला. प्रत्येकजण त्यांतील लोक वाटून घेऊ म्हणजे झाले. मी गरीब असलो तरी दोघां निराश्रितांचा सांभाळ करीन. या प्रमाणें प्रत्येक करीत गेल्यांस या सर्वांची सोय लागेल. तुम्ही एक घ्या. मी एक घेतो. आपण सर्व मिळून काम करूं. तो मनुष्य मी कसे श्रम करतो हे पाहील. तुम्ही कसें राबतां हे बघेल. आणि कसें जगतां येतें तें तो शिकेल. टेबला भोंवती आपण बसलो म्हणजे तुमच्या आमच्या पासून तो धडे घेईल. **हा धर्म होय** तुमच्या उपायांत कांहीं अर्थ नाहीं ' असें तो म्हणाला.

मला ही साधी गोष्ट पटली. त्याची प्रचीती क्षणोक्षणी मला आली. म्या उंची कपडे वापरावे, गाडी घोड्यांतून हिंडावे, दुमजली चौमजली घरे बांधावी व प्रसंग विशेषी दहा पांच रु. देणगी दाखल द्यावे. या सर्व गोष्टीं काय दर्शवित होत्या. **गरिबांचे वित्त हरण करून मी हा सर्व उद्योग चालविला होता.** जे पैसे त्यांना देणगी म्हणून देई ते त्यांचेच होते. शेंकड्यांनीं त्यांच्याकडून उचल करीत होतो व प्रसंगी दहा पांच रु. देत होतो. त्यांच्याशीं मला मिसळणें शक्य होते काय ? ते मोकळ्या मनानें वागत नाहींत अशी मी तक्रार करीत आहे. पण मलाच त्यांच्या बैठकीवर बसण्याची भिती वाटे, कारण कदाचित उवा चढतील किंवा रोग संचरेल. भूकेल्या तोंडानें जर तो आला तर त्याला गांठ घेणें पुर्वी दारांत उभे रहावें लागे, माझी वागणूक अशी प्रकारणेची. मग मोकळें मन कसें होणार ?

भुकेनें आपले बांधव व्याकूळ झालेले असतांना, पंचपक्वानाचे जेवण झोडून त्याचें समर्थन करणारे खुशाल करोत. पण डोळ्यांदेखत हा प्रकार कोणासही खपणार नाहीं. या गोष्टीं डोळ्या आडच होणें अपरिहार्य आहेत व त्या तशा हल्लीं चालू आहेत.

आम्ही आमच्या आयुष्याकडे पाहिलें ह्मणजे आम्ही जाणून बुजून आमची रहाणी अशी ठेवीत आहोंत असें वाटतें.

आमचे आचार विचार यांची दिशाच अशी आखली जाते कीं, आह्मी आमच्या गरीब बांधवांपासून दूरदूर रहाण्याचा प्रयत्न करीत असतो. आमचें शिक्षण घ्या, आमचे उद्योग घ्या, सर्वांत सर्व ठिकाणीं सारखा दोष दृष्टोत्पत्तीस येतो. व अशा तऱ्हेनें त्यांच्या-मध्यें व आमच्यामध्ये कायमचें अंतर पडल्यानंतर आमची बहुमोल संपत्ती खर्च करित असतो. संपन्न झाल्यानंतर जर कोणती गोष्ट मनुष्य करीत असेल तर ती आपली जेवणखाणाची व्यवस्था तो निराळी करूं लागतो. अर्थातच इतरांच्या व त्यांच्यामध्यें अधि-काधिक अंतर पडूं लागतें.

आपण आपल्या जेवणामधेंहीं अशाच पंक्तिप्रपंच करीत असतो. गरीब नोकराशीं या बाबतींत आपण जाणून बुजून प्रतारणा करतो. हाच प्रकार आपल्या कपड्यांचा. साधासुधा, थंडी, ऊन, वारा, यांपासून निवारण करण्यापुरतां कपडा वापरला तर थोड्या पैशांत खर्च भागून गरज व्यवस्थित रीतीनें भागू शकते. पण यात कमीपणा वाटत असतो. रेशमी व लोकरीची उंची वस्त्रे, निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या तऱ्हेचे चित्रविचित्र रंगाचे अंगे, पोलकी, ओव्हरकोट, निरनिराळ्या पद्धतीनें बूट, या नेहमीच्या

गरजा होऊन राहिल्या आहेत. त्या असल्या तरच त्यांत सभ्यपणा आहे, श्रीमंती आहे. या गोष्टी गरिबांस कशा शक्य आहेत ? सुधारणा -आधुनिक सुधारणा- ही आपल्या श्रीमंत वर्गास गरीब लोकांपासून अलिप्त ठेविते. त्यांना ती दूर लोटते. हाच प्रकार आमच्या घरांतही आहे. ज्यामानानें श्रीमंती, त्यामानानें मालकाची गांठ पडण्याची गरीब लोकांना मुष्कील.

हाच प्रकार आमच्या शिक्षणाचा आहे. कदाचित तो सर्वांहून सरस ठरेल. नेहमीं लोक ' शिक्षण ' ह्मणजे सुधारलेला पोशाख, स्वच्छता, रुबाबदार भाषा, वगैरे समजतात. श्रीमंत लोक शिक्षणाचा अर्थ वरील प्रमाणेंच, पण पेटी पियानो वादन, फ्रेंच भाषेचें ज्ञान वगैरे बाबींची पुस्ती जोडून करीत असतात. त्याहूनही वरील वर्गात, निरनिराळ्या पदव्या, जरा अधिक थाटामाटाची व स्वच्छतेची राहणी यांचा अंतर्भाव शिक्षणया शद्बांत होतो.एवंच चहूंकडे हेंच शिक्षण कीं, ज्यायोगानें तुम्ही, गरीब, सामान्य लोकापासून अधिकाधिक दूर रहाल, व त्यांच्याशीं तुमचा संबंध येणार नाहीं. अशीच ही सर्व योजना आहे कीं तुम्ही कशी चैन करतां हे त्यांच्या दृष्टीआड रहावे. पण आतां ही स्थिती तुम्हांस शक्य नाहीं. नित्य ते या गोष्टी अवलोकन करीत असतात.

याप्रमाणें आम्हां श्रीमंत लोकांना गरीब लोकांशीं समरस होतां येत नाहीं. याचें कारण एकच. आमचे स्वच्छतेचें स्तोम, आमचें शिक्षण, आमची रहाणी. हा भेद आमचा आम्हीच तयार केलेला आहे. आमच्या संपत्तीचा सर्व व्यय ही भेदभावना निर्माण करण्यांत आलेला आहे. त्याचा नाश झाल्याशिवाय, हा पडदा काढून

टाकल्याशिवाय, आम्हांसत्यांच्यात मिसळतां येणार नाहीं, समदुःखी होता येणार नाहीं. एकूण **आमची संपत्ती हीच या भेदभावास कारणीभूत आहे.**

माझ्या स्वतःच्या कृतीचा मी विचार करूं लागलों. मला नवल वाटलें तें असें कीं, ज्या ज्या वेळीं रस्त्यानें जातानां मी भिकाऱ्यास एखादें लहान नाणें देई त्यावेळीं तो कृतज्ञतापूर्वक हास्य करी व मला जरूर वाटल्यास त्यांना मी अधिकही देई पण त्यामुळें ते खूष तर नसतच पण वाईट चेहरा करून कुरकुरत जात. ज्यामानानें माझी ही चौकशी व सहानुभूती अधिक त्यामानानें त्यांची असंतुष्टता व नाखुषी अधिक. कित्येक वेळां तर येरवींपेक्षां मी तिप्पट तिप्पट रकमा देऊन पाहिल्या, पण त्यामुळें कृतज्ञता तर नाहींच पण माझ्या बद्दल त्यांच्या मनांत अनादर उत्पन्न होई. मी कित्येकांना काम देऊन मदत केली. कित्येकांना कपडेलत्तें दिलें पण त्यांच्या मनांत त्यामुळें मजबद्दल अधिक अधिक गैरसमज उत्पन्न होई व ही ब्याद न येईल तर बरें असें स्पष्ट त्यांचे चेहरे मला सांगत. माझी संगत त्यास नकोशी वाटे व ते बरोबरही होते.

रस्त्यानें जातांना तिऱ्हाईत म्हणून ज्यावेळीं मी त्यांस किरकोळ मदत देई त्यावेळीं तोहि मजकडे तिऱ्हाइत म्हणुनच पाहीं व अर्थातच त्याच्या नजरेपुरतें जें कांहीं दिलें त्यांत तो संतुष्ट राही. आनंद मानी पण ज्यावेळीं मी त्याची विचारपूस करी, आपलेपणा दाखवी, त्यावेळीं मी उदार अंतःकरणाचा व दयाळू आहे असें तो मानीत असे व त्या दृष्टीनें तो मजकडे पाही. मी दहा रुपये काय किंवा वीस रुपये काय मी त्याला कांहींही दिले तरी समाधान होणारच नाहीं. जर त्याला मी

मदत दिली, व कांहीं कारणांनीं तो पुन्हां आपल्या पूर्वस्थितीस आला तर दयाळू होऊन मी पुन्हां मदत करावयांस नको काय ? त्यांच्या भुकेला अन्न व तहानेला पाणी देणें माझें कर्तव्य नाहीं काय ? जर माझा उद्देश त्याला कांहीं विविक्षित आर्थिक मदत देणें एवढाच असेल तर मी पुन्हां मदत देण्याची नाकारणें योग्य होईल. पण जेथें माझा उद्देश तो नाहीं, तेथें ही गोष्ट शरमेची आहे. मला मदत ही केलीच पाहिजे. माझी स्वतःची जाणीव मी दुसऱ्यांच्या ठिकाणीं कल्पितो त्याच वेळीं लोक मला दयाळू असें समजतात व त्या दृष्टीनें ते मजकडे पहातात. निष्कांचन होईपर्यंत तुह्मी त्यास मदत करणें जरूर आहे. जर तह्मी ती केली नाहींत, तर तुमचा उद्देश दयाळूपणाचा नसून, केवळ देखावा ह्मणून, इतराना व भिक्षेकऱ्यांना आपला मोठेपणा दिसावा ह्मणून, तुह्मी हें करितां असेंच नाहीं काय ? अशा लोकांना ज्यावेळीं मी मदत नाकारीं, अधिक देण्याचे बंद करी त्यावेळीं माझ्या हृदयांस तळमळ लागे व माझी मलाच त्याबद्दल खंत वाटे.

हीच खंत ला लियापिन गृहांत वाटली, शहरांतील भिकाऱ्यांना व खेड्यांतील भिकाऱ्यांना पैसे देतानाही ती मला वाटे. याच प्रकारचे एक ताजे उदाहरण मला आठवतें. एकदा कांहीं यात्रेकरू मजकडे येऊन मला मदत मागूं लागले. मजजवळ १ रु. होता. मोड मिळेल या आशेनें मी स्वयंपाक घरांत गेलो. स्वयंपाक्यानें आपल्या बायकोस हाक मारली व 'ते घे' असें सांगितलें. तिनेंही सर्व समजलें असें दाखवून मजजवळून १ रु. घेतला. माझा तिच्याशी बोलण्याचा प्रसंग कधींच नव्हता. मी तिचे हातांत रुपाया देतांच, माझ्या

हाताचें वाकून चुंबन घेण्याचा तिनें प्रयत्न केला, कारण तिला तो रुपाया मदत म्हणून दिला असें वाटलें असावें. मी पुटपुटत स्वयंपाक घरांतून बाहेर आलो. मला संकोच वाटला. पूर्वी कधींही नाहीं अशी खंत मनास वाटली. मी नाक मुरडले, चेहरा टाकला. हा सर्व प्रकार मी माझ्या स्नेहाला व घरच्या मंडळींना सांगितला. त्यानींही मला वाटला तोंच प्रकार आपणासही वाटला असतां असें सांगितलें. मी स्वतःस असें कां व्हावें असा प्रश्न केला ?

माझें मलाच कळेना. मी स्वतः पुस्तकें लिहितों व त्याची भरपूर किंमत घेऊन दुसऱ्यास देतो. त्याचप्रमाणें माझी वडिलार्जित शेतीवाडी आहे, त्याचेंही उत्पन्न येते. ते मी घेतो. प्रसंगी फाळ्याकरितां शेतकऱ्याचें जें असते तें विकून रक्कम जमवितो व ती घेऊन शहरांत येतो. मग मनास वाटल्यास खेड्यांतून आणलेल्या पैशांतून तिकडील कोणी भिक्षेकरी भेटल्यास चार पैसे धर्मादाय मी खर्च करितो. सहाजिकच लोक त्या दृष्टीनें मजकडे पाहतात. " पैसा श्रमाशिवाय हातीं आलेला आहे. देईल चार दिडक्या, त्याची मला काय किंमत ? " याचदृष्टीनें त्या स्वयंपाक्याच्या बायकोनें मजकडे पाहिलें व धर्मादाय सहजी मी १ रु. दिला असे तिला वाटले. तीच गोष्ट इतर ठिकाणीं. सहजी लोक जसे चार दाणे पाखरापुढें टाकितात, व गंमत करितात त्यातलाच हा प्रकार असें तिला वाटलें. मला या ऐत्या आलेल्या पैशाची किंमत कां वाटावी ! ही गोष्ट माझ्या नजरेस आज तिच्या चुकीमुळें आली. मला वाईट वाटले.

मी पैसा कोठून व कसा आणतो ? खेड्यांतून माझी वडिलार्जित शेती वाडी आहे तिकडून, कांहीं माझ्या लेखनावर मी

मिळवितों व तोही खेड्यांतील व इतर बेकार लोकांना माझीं पुस्तकें विकत देऊन. हा सर्व पैसा मी शहरांत आणतों त्याच्या जोरावर मी मन मानेल तें काम मजूर लोकांकडून करून घेतों. व त्यांना थोडेसें वेतन देतों. झाडलोट दिवाबत्ती व इतर शारिरीक श्रम त्यांचेकडून भरपूर करून घेऊन त्यामानानें अत्यंत अल्प मी त्यांचे पोटास देतों. व मनास येईल तेव्हां व त्यावेळीं कांहीं कारणावांचून अशा तऱ्हेनें पैसे वाटतो. त्यांचाच पैसा पण तो सर्वांना न देता माझ्या मर्जी-प्रमाणें मी तो खर्च करितों,

एका हातानें हाजारों रुपये लुटावयाचे व दुसऱ्या हातानें मन मानेल तेव्हां व मानेल त्यांस चार पैसे देऊं करावयाचे. यांसच आम्ही ' जगाचे कल्याणाचा मार्ग ' समजत होतों. माझी सद्सद्विवेक बुद्धि मला बोचित होती. मी माझ्या मिळकतींतला कांहींही भाग दिला तरी जों पर्यंत अन्यायानें मिळविलेलें धन, मजजवळ आहे तो पर्यंत मी कुणाचे कसें कल्याण करूं शकेन ! ' दुसऱ्याचें कल्याण साधणेंपूर्वी त्याचें अकल्याण करण्याचें सोडलें पाहिजे. '

हें सत्य ज्या वेळीं मला कळून चुकलें त्यावेळीं मला भीती व आश्चर्य वाटलें. मी स्वतः गळ्याइतक्या गाळांत रुतलों असतांना मी दुसऱ्याच्या उद्धाराची धडपड करीत होतो. मला काय पाहिजे होतें ? फक्त मनुष्याचें योग्य असें जीवन लोकांस मिळावें, भूक, तहान. थंडीवारा या पासून त्यांचें निवारण व्हावें व निर्वाहास जरूर त्या गोष्टी सर्वांना मिळाव्या हीच माझी इच्छा. पण मी माझ्या समोर म्हातारी माणसें, बायाबापड्या, अनाथ मुलें, अन्नवस्त्राविण हाल काढतांना नित्यशः पहातों. आम्ही सधन लोक मात्र नित्य उपयोगाची नवीनवी

साधनें हुडकून काढीत आहेत, उपभोग भोगीत आहोंत, ऐषआराम करीत आहोंत. आमची संपत्ती इतकी वाढली आहे कीं, आम्हांस श्रम तर करावे लागत नाहींतच पण आमचें सर्व आयुष्य बसून चैनीत काढण्यास मिळतें. व हेंच जीवन, हीच चैन, हीच सुखाचा रहाणी चालू ठेवण्याकरितां आमच्या मुलांना व वारसांना आह्मी आमची संपत्ती हक्कानें देतो. हा मार्ग आमचा असा चालला आहे कीं, जो वर्ग संपत्ती निर्माण करतो तो अखेर मोकळाच व जे श्रम करीत नाहींत, कष्ट करीत नाहींत त्या वर्गाचे हातांत या संपत्तीचा सांठा. **मनोऱ्याचे तळाचे दगड निराधार, निराश्रीत होत आहेत व वरील बोजा मात्र वाढत आहे ? हा मनोरा टिकणार कसा ?** वरील दगडांनीं आपण सुरक्षित आहोंत असें कितीही मानले तरी वस्तुस्थिती कोठें जाईल ? हीच, अगदीं हीच आज आमची स्थिती आहे. आह्मी आमच्या चैनीच्या, ऐषआरामाच्या, व सुखाच्या भ्रमांत आहोंत. खरी कल्पना अम्हांस आलेली नाहीं, व आली तरी मानवत नाहीं. ही स्थिती मजूरवर्गाच्या डोळ्यापुढें आली म्हणजे तोही तिचेंच अनुकरण करतो व साध्य झाल्यास कमी श्रमानें दुसऱ्यांस लुबाडतो. व साधल्यास बेकारींत अधिकाधिक भर घालून आधींच डोईजड झालेली ही परिस्थिती अधिक बिकट व कठीण करितो।

मी सधन वर्गापैकीं आहे. जो वर्ग मजूर व शेतकरी यांच्यापासून त्यांनीं उत्पादन केलेलें द्रव्य हरण करतो व त्यांना नित्याच्या जरूरीच्या गोष्टींही मिळणें दुर्घट होते, त्या वर्गांतला मी एक आहे. माझी संपत्ती, माझी रहाणी त्यांना मोह पाडते व आपणांस सर्व पाहिजे असें त्यांना वाटूं लागते. मला जर खरोखरीच या लोकांना मदत करणेची

असेल तर प्रथम मी त्यांना **लुबाडण्याचें सोडलें पाहिजे.** त्यांचा चालविलेला शोष थांबविला पाहिजे. वर्षानुवर्ष सुधारणा करून जी अनेक लुबाडण्याची साधनें निर्माण करणेंत आलेली आहेत, त्यांचा त्याग आधीं केला पाहिजे. नाहीं तर दुसऱ्याचे खांद्यावर बसून त्यांस हाल करून घेऊं नको, सुखासमाधानानें चल, असें सांगण्यापैकींच हा प्रकार होईल.

माझें दोष, माझ्या चुका मला दिसतांच माझें डोळ्यावरील झांपड दूर झाली. माझा मार्ग मला दिसूं लागला. ज्या प्रश्नाबद्दल मी बुचकळ्यांत पडलों होतों. तो प्रश्न - लोकांचें दारिद्र्य नाहींसे करण्याचा. - आतां मला सुटला. त्यांचे कष्ट घेण्याचें व वित्तहरण करण्याचें आम्ही ज्यावेळीं सोडून देऊं त्याच वेळीं ते सुखी होतील असें स्पष्ट झालें. **एका हातानें दान देऊन दुसऱ्या हातानें त्याच्या दसपट काढून घेण्यानें** अनाश्रित गरीब वर्ग कधींच सुखी होणार नाहीं. तो अधिकाधीक दरिद्रीच होत जाणार.

मी, दुसऱ्यांस मदत करूं इच्छिणारा, मी कोण आहे ? श्रीमंत वर्गाचा एक घटक, समाजांतील एक जळू. मी उशीरा उठणारा पत्त्यांचे डाव मांडून बसणारा, अशक्त व दुर्बल, माझ्या दिमतीस लोकांची जरूर, मी मदत काय करणार व कोणाला, तर जो पहाटे पांच वाजतां उठतो, माझ्यापेक्षां कितीतरी कार्यक्षम असून प्रत्यक्ष कष्ट करितो, साधेसुधे अन्न खातो, ज्याला नांगरणें, पेरणें, तोडणें वगैरे सर्व शारीरिक श्रमाची कामें करितां येतात, जो स्वयंसिद्ध आहे त्याला. हें पाहून माझ्या मनाला काय वाटलें ? लज्जा, खंत, उद्वेग यानीं मला नकोसे केलें. मी ऐत्या पिठावर रेघा ओढणारा मी गृहांतील दारुबाज

इसमापेक्षां, जो लुच्या, बदमाष ह्मणून संबोधिला जातो त्यापेक्षां अधिक आळशी, अधिक निकामी नाहीं काय ? तो करीत असलेलें श्रम व त्या मानानें समाजाकडून त्यांस मिळत असलेला मुशाहिरा यांचे प्रमाण जें पडेल, त्यापेक्षां मी करीत असलेले श्रम व समाजाकडून त्या बद्दल उकळत असलेला मोबदला अधिक वाईट, अधिक त्याज्य, अधिक गर्हणीय नाहीं काय ? सहस्रघटीनें **मी समाज निस्त्राण निःशक्त करीत आहे.** मी त्या लोकांच्या मदतीला धांवणार ! त्याचें दारिद्र्य घालविणार !

खरोखरीच विचार करतां कोण निर्बल आहे ? त्यांच्यातील एकही इसम मज इतका हीन सापडणार नाहीं. अशक्त, दुर्बल, निरुपयोगी मी, ज्यावेळीं शेंकडो लोकांनीं श्रम करून मला जगवावें त्यावेळीं मी जिवंत रहाणार. माझा उपयोग मात्र कांहीं नाहीं ! **पानें खाणाऱ्या किड्यानें झाडाची वाढ झपाट्यानें व्हावी अशी इच्छा करण्यापैकींच माझा हा उद्योग होता.**

माझ्या आयुष्याचा काळ सकाळपासून सायंकाळपर्यंतचा खाणें पिणें, मजा मारणें, या गोष्टी करण्यांत गेला. या व्यतिरिक्त मी कांहींही केलें नाहीं, काय करावे हें मला उमगत नाहीं. कामकरी, मजूर व नोकर जे रात्रंदिवस आपल्या शरीरानीं श्रम करितांत व जगतात. त्यांना मी कसची मदत करणार ! जे मला जगवितात, ज्यांच्यावर मी अवलंबून, त्यांना मी काय मदत देणार ?

मी कोणालाच मदत करूं शकलों नाहीं, यांत आतां नवल नाहीं. माझ्या मनाला खंत वाटे यांतही विशेष नाहीं. मला ही मदतीची खुळी कल्पना कशी संभवली हेंच आश्चर्याचें आहे !

म्हातारी जिनें रोगी मनुष्यांस आश्रय दिला, तिनें मदत केली असें म्हणतां येईल. शेतकऱ्याची बायको जिनें तोंडांतील घास भुकेलेल्याला दिला तिनें मदत दिली. स्वकष्टानें उपजीविका करणारा माझा स्नेही ज्यानें भिक्षेकऱ्यास मदत दिली, त्यानें मदत केली असें होईल. कारण त्यांत श्रमानें मिळवलेल्या द्रव्याचा विनियोग होता पण मी मात्र कोणांसच मदत करूं शकलो नाहीं कारण माझ्या खर्च केलेल्या पैशांत माझ्या श्रमाचा भाग नव्हता. पैसा अधिक असण्यांत व तो जवळ साठवण्यांत खरा दोष आहे असें आतां मला वाटूं लागलें. त्या मुळेंच मी ही सभोंतालीं दुःखें पहातो. सभोंवतालची विषमता त्याच मुळें उत्पन्न झालेली आहे हें मला आतां पूर्ण कळून चुकलें !

आतां हा पैसा म्हणजे काय हें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

—o—

# पैसा.

पैसा ! पैसा म्हणजे काय ? पैसा या शद्बांत श्रमाचा अंतरभाव होतो. कांहीं सुशिक्षीत लोक ज्यांच्याजवळ पैसा आहे अशांच्या श्रमाचा अंतरभाव पैसा या शद्बांत करितात मलाही तसेंच वाटे तथापी पैसा म्हणजे काय याचा मी विचार करूं लागलों अर्थांतच शास्त्रीयदृष्टचा मला याकडे पहावें लागलें.

पैसा ही समाजाच्या जरूरीची गोष्ट आहे. त्यांत गैर अगर अन्यायाचें कांहींच नाहीं. तो असणें अपरिहार्य आहे. कारण—
( १ ) चलन ह्मणून, ( २ ) देवघेवीस सोइस्कर, ( ३ ) ठेवणेंस सोइचे, ( ४ ) पगार अगर मोबदला देणेंस सुखाचें, ते आहे, असें शास्त्र सांगतें.

माझ्या खिशांत जर पैसा असेल तर कोणत्याही देशांत, कोणत्याही परिस्थितींत, कितीही हलकें काम असो तें करण्यास, मी लोकांना भाग पाडेन. हे पैशामुळें घडत नसून आर्थिक परिस्थितीचा तो परिणाम आहे. हें उघड आहे. एक वर्ग दुसऱ्यावर अम्मल गाजवितो, तो पैशामुळें नसून, दुसऱ्या वर्गास, श्रम करणाऱ्या वर्गास त्याच्या श्रमाच्या मानानें भरपूर वेतन मिळत नाहीं ह्मणून व हें वेतन न मिळण्याचें कारण, ह्मणजे भांडवलाचा प्रकार, भाडें, पगार व त्यांचे अन्योन्य संबंध व त्याचप्रमाणें धनोत्पादनाचें प्रकार, त्याचा विनियोग, त्याचा सांठा व त्यांचे संबंध हें होय. स्पष्ट ह्मणावयाचे

ह्मणजे ज्यांच्या जवळ पैसा हें साधन आहे, ते निर्धनांना आपल्या जाळ्यांत धरतात. शास्त्रांत ही गोष्ट मान्य नाहीं. उत्पादनास तीन गोष्टी लागतात. जमीन, भांडवल व मजुरी अगर श्रम. परस्परांच्या होणाऱ्या परिणामानें, व विशेषतः पहिल्या दोन बाबी मजूर वर्गाच्या हातीं नसल्यानें, ही विषमता उत्पन्न होते. कांहीं लोक दुसऱ्यांच्या आहारी जातात.

पैशाची सत्ता, जी अत्यंत अन्यायी व जुलमी आहे ती कशी निर्माण झाली ? सधन वर्गानें निर्धनावर सत्ता कां गाजवावी ? यांस शास्त्राचें उत्तर असें आहे कीं, उत्पादनांच्या साधनामध्यें होणारी विभागणी व त्यांचे अन्योन्य संबंध या विषमतेच्या मुळाशीं आहेत. ही उपपत्ती मला कधींच पटली नाहीं ! एक तर मूळ जो पैसा त्याचें वैशिष्ठ्य यांत समविष्ट नाहीं. व दुसरें कारण उत्पादनाच्या साधनांची विभागणी होय. हें सकृतदर्शनीच स्वाभाविक व वस्तुस्थितीस धरून नाहीं. नेहमी उत्पादनाची तीन साधनें जोर जोरानें प्रतिपादन करण्यांत येतात. जमीन, भांडवल, व मजूरी. तीनच साधनें उत्पादनाचीं आहेत हें खरें आहे काय ? याला माझें उत्तर असें आहेः—

मी उभा आहे, माझ्या सभोंवार गवत उगवलें आहे. याच्या उत्पत्तीचीं साधनें काय ? शास्त्र ह्मणतें जमीन, जिच्यावर हें उगवलें आहे ती भांडवल, अर्थात येथें विळे, कोयते, गाडी वगैरे. तिसरी मजूरी. पण हें मला खरें वाटत नाहीं. मला पटत नाहीं, सूर्याचा उजेड व ऊन यांस कारणीभूत नाहींत काय ? पाण्याचा अंतरभाव यांत होत नाहीं काय ? सामाजिक रचना जिच्यामुळें हें गवत

राखलें गेलें, ती कारण नाहीं काय ? अशीं कितीतरी कारणें दाखवितां येतील कीं, ज्यांचा अंतरभाव त्यांच्या मुळाशीं आहे. प्रत्येक गोष्ट दुसऱ्या इतकीच महत्वाची आहे. मग शास्त्र या गोष्टीस कां वगळतें व तीनच गोष्टी कां मानतें ? सूर्य प्रकाश पाणी, मजूराचें ज्ञान, त्याचें अन्न, वस्त्र वगैरे उत्पादनीय पृथक कारणें आहेत. हवा ही तितकीच जरूरीची आहे. मग हा भेदभाव कां ? समाजास याच तीन गोष्टींची नेहमीं आवश्यकता लागते असेंही नाहीं हें ह्मणजे केवळ अडमुठेपणाचें वाटतें वस्तुस्थिती निराळी आहे. ज्या ठिकाणीं आर्थिक संबंधाचा प्रश्न येतो तेथें तरी हीच तीन साधनें प्रामुख्यानें असतात काय ? हें आपण पाहूं. प्रथम आपण रशियन वसाहतवाल्यांची गोष्ट घेऊं ज्यावेळीं ते वसाहत करण्यांस जातात. त्यावेळीं ती वसाहत करणेची भूमी कोणत्याही मालकाची नसते. जो तो आपल्या पसंती प्रमाणें जागा पाहतो. तेथें मनाप्रमाणें छप्पर बांधून रहातो. त्याचमप्राणे जो तो आपल्या मगदुरा प्रमाणें जमीन घेतो, नांगरतो, पिकवितो व खातो. त्यांत अमूक एकच मालक आहे व दुसऱ्यानें त्यास मालकी हक्क दिला आहे असें मुळींच नाहीं. त्याच प्रमाणें साधनांची गोष्ट आहे. ज्याजवळ जें हत्यार असेल त्याचा तो उपयोग करतो.

दुसऱ्याचें हत्यार जरूर लागली तर आणतो. पण कोणीही विशिष्ट तऱ्हेची मालकी अगर हक्क सांगत नसून त्याबद्दल भाडें अगर मोबदलाही मागत नाहीं. वसाहत करणारे लोक हीं हत्यारें आणतात. सर्वांच्या उपयोगी तीं येतात. भांडवलावर— अर्थात धान्य धून्य दिल्यास, हत्यारें घेतल्यास, मदत केल्यास, त्याबद्दल मोबदला

अगर भाडें घेणें अन्याय्य मानतात व अशा समतेच्या काळांत, समाजांत भाडें, व्याज अगर मजूरी ही आस्तित्वांत नसतात. ही स्थिती सर्वत्र सर्व राष्ट्रांच्या वसाहतवाल्यांमधून दिसून येते. नैसर्गिक रहाणी जो पर्यंत असते तो पर्यंतच ही स्थिती असते.

विचारास पटणारी व स्वाभाविक असलेलीच गोष्ट मी आपणापुढें मांडीत आहे. प्रत्येकजण आपणांस योग्य ते काम करीत असतो. सर्वांनीं मिळून काम करणें– संघशक्तीनें श्रम करणें सोईचे वाटल्यास तशीहि ते तजवीज करतात. संघ बनवितात. स्वतंत्र अगर संघशक्तिनें रहात असतां हीं उत्पादनाचीं साधनें निराळीं अशीं कधींच करण्यांत येत नाहींत. मात्र श्रम, व त्यांस जरूर ती परिस्थिती तेथें सतत असली ह्मणजे झालें. सूर्य, पाणी, हवा, जमीन, त्याचप्रमाणें कपडे लत्ते, नांगर विळे वगैरें श्रम करण्याची साधनें, ज्यांच्या उपयोग त्या संघांतला प्रत्येक मनुष्य करीत असतो, ती प्रत्येकाच्या उपयोगा-करितां असतात. स्वतंत्र अगर एकट्याच्या मालकीची कल्पना नसते. ज्याला त्यांची जरूरी लागते तो त्याचा उपयोग घेत असतो व याप्रमाणें ज्यावेळीं लोक वागत असतात, त्याचवेळीं त्यांच्या ठिकाणीं मनुष्यत्व असतें.

याप्रमाणें मनुष्याच्या प्रथमावस्थेंत तरी ही उत्पादनाचीं साधनें व त्यांची विभागणी वरील प्रमाणें मानणें चुकीचें आहे. ‘ कदाचित प्रथमावस्थेंत ती नसेल, परंतु प्रगतीबरोबर, शास्त्रांच्या व मनुष्यांच्या वाढत्या काळांत ही गोष्ट शक्य असेल ! ’ असें जर ह्मणणें असेल तर तेंही आपण विचारांत घेऊं. पाश्चिमात्य समाजांत ही विभागणी झालेली आहे असें सांगण्यांत येतें. कांहीं लोक जमीनदार

जमिनीचें मालक आहेत. कांहींच्या जवळ उत्पादनाचीं हत्यारें आहेत, व राहिलेले मजूर आहेत. या विचार सरणीस आह्मी इतके बळी पडलों आहोंत की, त्यांतला अस्वाभाविकपणा आपल्या लक्षांतच येत नाहीं. विचार करतां त्यांतील चूक व विसंगतता तेव्हांच लक्षांत येते. मजूर हा शब्द उच्चारतांच जी कल्पना येते त्यांत तो ज्या जमिनीवर रहातो ती व ज्या साधनांनीं तो काम करतो तीं, याचा अंतरभाव होतो. जमीन व हत्यारें याशिवाय मजूर या कल्पनेस अस्तित्वच नाहीं. शेतांतील मजूर घेतला तर कोयता, विळा, व जेथें तो काम करितो ती जमीन, चटकन डोळ्यापुढें उभी रहातात. चांभार घेतला तर ज्यांत तो रहातो तें घर व त्याचीं हत्यारें आपल्या पुढें उभी रहतात. ह्या गोष्टींशिवाय त्यांना अस्तित्व नाहीं. जर हीं साधनें नसतील तर तीं त्यांजपासून कोणीतरी नागवली असतील असेंच मानलें पाहिजे. स्वाभाविकपणें तीं असणें जरूर आहे. विशिष्ट स्थितींत तीं नसतील, तर तो अपवाद आहे. कधीं कधीं उत्पादनाची सहजावस्था कांहीं बाहेरील कारणांनीं नष्ट होईल. पण त्यामुळें तीच स्वाभाविक स्थिती होत नाहीं. दुसऱ्याच्या जुलमानें मजूर वर्गाचीं काढून घेतलेलीं साधनेंच जर उत्पत्तीच्या— अंगापैकीं एक आहेत असें मानावयाचें, तर गुलामांचें शरीर हें ही एक साधन मानावें लागेल. मग, सूर्यकिरण, पाणी, हवा हीं कां साधनें होणार नाहींत ? जर मनुष्यानें मनांत आणलें तर सूर्यप्रकाश भिंत बांधून अगर अन्य उपायांनीं तो दुसऱ्यांस मिळूं देणार नाहीं. पाणीही प्रवाह बदलून मिळूं देणार नाहीं. निदान तो ते खराब तरी खास करूं शकेल. हीं जशी फालतुक कारणें आहेत. सहजावस्थेंत असूं

अगर भाडें घेणें अन्याय्य मानतात व अशा समतेच्या काळांत, समाजांत भाडें, व्याज अगर मजूरी ही अस्तित्वांत नसतात. ही स्थिती सर्वत्र सर्व राष्ट्रांच्या वसाहतवाल्यांमधून दिसून येते. नैसर्गिक रहाणी जो पर्यंत असते तो पर्यंतच ही स्थिती असते.

विचारास पटणारी व स्वाभाविक असलेलीच गोष्ट मी आपणापुढें मांडीत आहे. प्रत्येकजण आपणांस योग्य ते काम करीत असतो. सर्वांनीं मिळून काम करणें– संघशक्तीनें श्रम करणें सोईचे वाटल्यास तशीही ते तजवीज करतात. संघ बनवितात. स्वतंत्र अगर संघशक्तिनें रहात असतां हीं उत्पादनाचीं साधनें निराळीं अशीं कधींच करण्यांत येत नाहींत. मात्र श्रम, व त्यांस जरूर ती परिस्थिती तेथें सतत असली ह्मणजे झालें. सूर्य, पाणी, हवा, जमीन, त्याचप्रमाणें कपडे लत्ते, नांगर विळे वगैरें श्रम करण्याची साधनें, ज्यांच्या उपयोग त्या संघांतला प्रत्येक मनुष्य करीत असतो, ती प्रत्येकाच्या उपयोगा-करितां असतात. स्वतंत्र अगर एकट्याच्या मालकीची कल्पना नसते. ज्याला त्यांची जरूरी लागते तो त्याचा उपयोग घेत असतो व याप्रमाणें ज्यावेळीं लोक वागत असतात, त्याचवेळीं त्यांच्या ठिकाणीं मनुष्यत्व असतें.

याप्रमाणें मनुष्याच्या प्रथमावस्थेंत तरी ही उत्पादनाचीं साधनें व त्यांची विभागणी वरील प्रमाणें मानणें चुकीचें आहे. ‘ कदाचित प्रथमावस्थेंत ती नसेल, परंतु प्रगतीबरोबर, शास्त्रांच्या व मनुष्यांच्या वाढत्या काळांत ही गोष्ट शक्य असेल ! ’ असें जर ह्मणणें असेल तर तेंही आपण विचारांत घेऊं. पाश्चिमात्य समाजांत ही विभागणी झालेली आहे असें सांगण्यांत येतें. कांहीं लोक जमीनदार

जमिनीचें मालक आहेत. कांहींच्यो जवळ उत्पादनाचीं हत्यारें आहेत, व राहिलेले मजूर आहेत. या विचार सरणीस आह्मी इतके बळी पडलों आहोंत कीं, त्यांतला अस्वाभाविकपणा आपल्या लक्षांतच येत नाहीं. विचार करतां त्यांतील चूक व विसंगतता तेव्हांच लक्षांत येते. मजूर हा शब्द उच्चारतांच जी कल्पना येते त्यांत तो ज्या जमिनीवर रहातो ती व ज्या साधनांनीं तो काम करतो तीं, याचा अंतरभाव होतो. जमीन व हत्यारें याशिवाय मजूर या कल्पनेस अस्तित्वच नाहीं. शेतांतील मजूर घेतला तर कोयता, विळा, व जेथें तो काम करितो ती जमीन, चटकन डोळ्यापुढें उभी रहातात. चांभार घेतला तर ज्यांत तो रहातो तें घर व त्याचीं हत्यारें आपल्या पुढें उभी रहतात. ह्या गोष्टींशिवाय त्यांना अस्तित्व नाहीं. जर हीं साधनें नसतील तर तीं त्यांजपासून कोणीतरी नागवली असतील असेंच मानलें पाहिजे. स्वाभाविकपणें तीं असणें जरूर आहे. विशिष्ट स्थितींत ती नसतील, तर तो अपवाद आहे. कधीं कधीं उत्पादनाची सहजावस्था कांहीं बाहेरील कारणांनीं नष्ट होईल. पण त्यामुळें तीच स्वाभाविक स्थिती होत नाहीं. दुसऱ्याच्या जुलमानें मजूर वर्गाचीं काढून घेतलेलीं साधनेंच जर उत्पत्तीच्या– अंगापैकीं एक आहेत असें मानावयाचें, तर गुलामांचें शरीर हें ही एक साधन मानावें लागेल. मग, सूर्यकिरण, पाणी, हवा ही कां साधनें होणार नाहींत ? जर मनुष्यानें मनांत आणलें तर सूर्यप्रकाश भिंत बांधून अगर अन्य उपायांनीं तो दुसऱ्यांस मिळूं देणार नाहीं. पाणीही प्रवाह बदलून मिळूं देणार नाहीं. निदान तो ते खराब तरी खास करूं शकेल. हीं जशीं फालतुक कारणें आहेत. सहजावस्थेंत असं

शकत नाहींत, त्याचप्रमाणें, जमीन व तिची मालकी, हत्यारें अगर भांडवल व त्या वरील व्यक्तीचा हक्क ही उत्पादनाची स्वतंत्र साधनें नसून ही काल्पनिक आहेत. ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश, हवा हीं आपलीं आहेत असा हक्क सांगणारीं माणसें भेटतील त्याच प्रमाणें मजूरांची हत्यारें व जमीन ही सर्वस्वी आपली आहेत असे ह्मणणारे भेटतील. त्याचप्रमाणें मजुराच्या शरिराचीही मालकी सांगण्यांत येईल. विशिष्ट परिस्थितींत मजुरानें उत्पादन केल्याबरोबर त्याची साधनें हिसकावून घेऊन व केलेल्या वस्तु ठेवून घेऊन त्यांस हकालून देण्यांत आलें, अगर त्यांस दुसऱ्याकरितां स्वतःच्या इच्छेविरूद्ध काम करण्यांस भाग पाडलें ( गिरण्यांत ही स्थिती दिसते ) तरी नैसर्गिक स्थितींत हें असूं शकणार नाहीं. मनुष्य हा दुसऱ्यांच्या मालकींची वस्तु अशी केव्हांही बनणार नाहीं.

जरी शरिरावरील मालकी दुसऱ्यानें आपली मानली तरी स्वतःचें कल्याण करण्याचा, मालकांपेक्षां स्वहित बघण्याचा उपजत हक्क जसा नाहींसा होणार नाहीं, त्याचप्रमाणें कोणीही जमिनीची अगर हत्यारांची मालकी आपली आहे असें ह्मटलें तरी मजूर वर्गाचा तो निसर्गसिद्ध हक्क आहे, तो काढून घेतां येणार नाहीं. जमिनीवर रहाणें व हत्यारांनीं काम करणें हे त्याचे जन्मसिद्ध हक्क आहेत. जर कोणी तो काढून घेईल तर त्यानें निसर्गाचा नियम मोडला असें होईल.

एखादा पक्षी पाळगावा व एखाद्या प्राणीशास्त्रज्ञानें तो पाहून पिंजरा व त्यातील पाण्याचें लहान भांडे ही पक्ष्यांची जीवनाचीं साधनें आहेत, तीं त्यांच्या जीवनाची मूलभूत तत्वें आहेत असें

मानणें, त्या पैकींच हा प्रकार आहे. विशिष्ट उदाहरण घेऊन तीच नैसर्गिक परिस्थिती आहे असें या बाबतींत शास्त्र मानीत आहे. ही मालकी हक्काची बाब, जमीन व हत्यारें आपलीं आहेत ही कल्पना, अस्वाभाविक असून शास्त्र तें मानीत नाहीं. यांस पाठिंबा देण्याकरितां जमिनीचा मालक एक व त्यावर कष्ट करणारा निराळा, हत्यारांचा मालक एक व त्यावर कष्ट करणारा निराळा, हत्यारांचा मालक एक व त्यानें काम करणारा निराळा, ही अस्वाभाविक गोष्ट ते सहजावस्था मानतात. मला ज्या जमिनीचा उपयोग नाहीं, ज्यावर मी काम करीत नाहीं, ती मी आपली ह्मणतो, ह्मणजे मला निरुपयोगी गोष्टीवर मी आपली मालकी सांगतो. हाच प्रकार हत्यारांचा. अस्वाभाविक स्थितींस शास्त्र स्वाभाविक ह्मणत आहे. पूर्वीं ज्या-प्रमाणें मालक व गुलाम असें प्रकार करण्यांत येत त्याच पैकीं हा प्रकार आहे. शास्त्रानें केलेली ही फोड, उत्पादनांच्या साधनांचें हे वर्गीकरण, चुकीचें आहे, निरुपयोगी आहे.

मुख्य प्रश्न हा आहे:—

ज्यांची जमीन व भांडवल ही मालकीची आहेत त्यांनीं ज्यांच्या जवळ ती नाहींत, त्यांना दास्यांत कां ठेवावे ? व्यवहारीक-दृष्ट्या याचें उत्तर पैसा. पैशाच्या जोरावर ही विषमता तयार होते शास्त्र ही गोष्ट कबूल करीत नाहीं. तें ह्मणतें कीं, यांस कारण कांहीं लोकांची जमिनीची मालकी व त्यांचे भांडवल, हींच यांस कारण आहेत. याचे योग्य उत्तर देणें झालेस प्रथम ही उत्पत्तीच्या वर्गीक-रणाची कल्पना टाकली पाहिजे. आपण कार्यास कारण समजत आहोंत ही चूक आहे. प्रश्न असा:—जमीन व भांडवल हीं कांहीं

जवळच कां व बाकीच्या जवळ कां नाहींत ? किंवा कांहीं लोक या गोष्टींचा विक्रा कां करितात, आपल्या पासून त्या कां घालवितात? जे लोक उत्पादन करितात, व जे हीं हत्यारें उपयोगांत आणतात, ते त्यापासून दूर कां होतात ? सरळ विचारांस पैसा हेंच एका वर्गाची सत्ता दुसऱ्यांवर गाजविण्यास साधन आहे, असें वाटते. परंतु शास्त्रांस ती गोष्ट असम्मत आहे, व पैसा हे चलन आहे, देवघेवीस सोईचे साधन आहे, त्यांचा संबंध या गुलामगिरीशी येऊं शकत नाहीं असें ह्मणण्यांत येतें तें कितपत खरें आहे हे आतां आपण पाहूं.

पैशाची उत्पत्ति कोठून आहे, कोणत्या स्थितीत राष्ट्राजवळ संपत्ती असते, व कोणत्या स्थितीत त्याचा उपयोग केला जात नाहीं हे आपण पाहूं. रानटी अवस्थेत समाज जमीन पिकवितो, धान्य निर्माण करितो व जगतो, हा काळ म्हणजे इतिहास सुरू होण्यापूर्वीचा काळ. इतिहास हा जेते निर्माण होतात, त्या वेळेपासून सुरू होतो. जेते लोक नेहमीं एकच गोष्ट करितात ती म्हणजे मिळेल ती गोष्ट, धान्यधुन्य, कापडचोपड, जनावरें व **रानटी अवस्थेंतील लोकांची बायकापोरे सुद्धां** लुटत असतात. रुर्व आपल्याबरोबर नेतात. पुढें कांहीं काळानें पुन्हां स्वारी सुरू होते. त्यावेळीं पूर्वीच्या मानानें या जित लोकांच्या जवळ लुटण्यांच्या पदार्थांचा साठा कमी होतो. अर्थात जित लोकांना नागविण्याची दुसरी पद्धत अमलात येते. ही सहजी सुचणारी व चटकन सर्वांच्या लक्षांत येण्यासारखी आहे, पहिली तऱ्हा म्हणजे गुलामगिरी होय. परंतु यांत गैरसोय अशी उत्पन्न होते. कीं इतक्या साऱ्या जित लोकांना

कामास लावावयाचे व त्यांच्या पोटापाण्याची तजवीज करावयाची म्हणजे फार त्रासाचे आहे असें वाटते. ह्मणून दुसरा उपाय ते काढतात. तो म्हणजे जित लोकांना सोडून द्यावयाचे व **ज्या जमिनीवर व साधनावर ते रहातात व जगतात त्यांची मालकी जेते राष्ट्र आपलेकडे घेते.** व ती आपल्या मध्यें व आपल्या अनुयायामध्यें वाटून टाकते. हेतू हा कीं, आपल्या आनुयायांच्या कडून जित लोकाच्या श्रमाची लूट व्हावी परंतु यांतही दोष आहे. तो ह्मणजे अनुयायांना सर्व जित लोक पोसावे लागतात. सबब आणखी एक पाऊल पुढें टाकणेंत येते व कांहीं विविक्षीत कालमर्यादा घालून जित लोकांच्याकडून खंडणी मागण्याचा उपक्रम सुरू होतो.

जित लोकांच्याकडून शक्य तितकें अधिक धन उकळण्याचा प्रयत्न जेत्यांचा असतो. अर्थात हे साधण्याकरितां व नेण्यास सोईचें व्हावें ह्मणून, ज्या गोष्टींस अत्यंत अधिक किंमत पडते, अशा सोनें, कातडीं वगैरे पदार्थांच्या रूपानें ही खंडणी वसूल करण्यांत येतें. अशा तऱ्हेनें जित लोकांचे श्रम जेत्यांना सोईस्कर स्वरुपांत घेतां येतात. ज्यावेळीं हें सोनें, कातडी वगैरे सर्व नेण्यांत येतें त्यावेळीं जित लोकांना आपली सर्व चीजवस्तु गेल्यानें आपले श्रम विकणें भाग पडते. हाच प्रकार पूर्वी, मध्ययुगांत व हल्लींही चालू आहे. रानटी अवस्थेंत गुलामगिरी चालू होती. मध्ययुगांत त्याचें रूपांतर जमिनींच्या मालकींत करण्यांत आलें. व अलीकडे अमेरीका वगैरेच्या शोधानंतर व सोन्याचा प्रवाह सुरूं झाल्यामुळें व संपत्तीचें ते सार्वत्रिक साधन होऊन बसल्यानें पैशांत रूपांतर सुरूं झालें व लोकांना गुलाम बनविण्याचें पैसा हें मुख्य साधन झालें. अर्थातच

जवळच कां व बाकीच्या जवळ कां नाहींत ? किंवा कांहीं लोक या गोष्टींचा विक्रा कां करितात, आपल्या पासून त्या कां घालवितात? जे लोक उत्पादन करितात, व जे हीं हत्यारें उपयोगांत आणतात, ते त्यापासून दूर कां होतात? सरळ विचारांस पैसा हेंच एका वर्गाची सत्ता दुसऱ्यांवर गाजविण्यास साधन आहे, असें वाटते. परंतु शास्त्रांस ती गोष्ट असम्मत आहे, व पैसा हे चलन आहे, देवघेवीस सोईचे साधन आहे, त्यांचा संबंध या गुलामगिरीशीं येऊं शकत नाहीं असें ह्मणण्यांत येतें तें कितपत खरें आहे हे आतां आपण पाहूं.

पैशाची उत्पत्ति कोठून आहे, कोणत्या स्थितीत राष्ट्राजवळ संपत्ती असते, व कोणत्या स्थितीत त्याचा उपयोग केला जात नाहीं हे आपण पाहूं. रानटी अवस्थेत समाज जमीन पिकवितो, धान्य निर्माण करितो व जगतो, हा काळ म्हणजे इतिहास सुरूं होण्यापूर्वीचा काळ. इतिहास हा जेते निर्माण होतात, त्या वेळेपासून सुरूं होतो. जेते लोक नेहमीं एकच गोष्ट करितात ती म्हणजे मिळेल ती गोष्ट, धान्यधुन्य, कापडचोपड, जनावरें व **रानटी अवस्थेंतील लोकांची बायकापोरे सुद्धां** लुटत असतात. रुर्व आपल्याबरोबर नेतात. पुढें कांहीं काळानें पुन्हां स्वारी सुरूं होते. त्यावेळीं पूर्वीच्या मानानें या जित लोकांच्या जवळ लुटण्यांच्या पदार्थांचा साठा कमी होतो. अर्थात जित लोकांना नागविण्याची दुसरी पद्धत अमलात येते. ही सहजी सुचणारी व चटकन सर्वांच्या लक्षांत येण्यासारखी आहे, पहिली तऱ्हा म्हणजे गुलामगिरी होय. परंतु यांत गैरसोय अशी उत्पन्न होते. कीं इतक्या साऱ्या जित लोकांना

कामास लावावयाचे व त्यांच्या पोटापाण्याची तजवीज करावयाची म्हणजे फार त्रासाचे आहे असें वाटते. ह्मणून दुसरा उपाय ते काढतात. तो म्हणजे जित लोकांना सोडून द्यावयाचे व **ज्या जमिनीवर व साधनावर ते रहातात व जगतात त्यांची मालकी जेते राष्ट्र आपलेकडे घेते**. व ती आपल्या मध्यें व आपल्या अनुयायामध्यें वाटून टाकते. हेतू हा कीं, आपल्या आनुयायांच्या कडून जित लोकाच्या श्रमाची लूट व्हावी परंतु यांतही दोष आहे. तो ह्मणजे अनुयायांना सर्व जित लोक पोसावे लागतात. सबब आणखी एक पाऊल पुढें टाकणेंत येते व कांहीं विवक्षीत कालमर्यादा घालून जित लोकांच्याकडून खंडणी मागण्याचा उपक्रम सुरूं होतो.

जित लोकांच्याकडून शक्य तितकें अधिक धन उकळण्याचा प्रयत्न जेत्यांचा असतो. अर्थात हे साधण्याकरितां व नेण्यास सोईचें व्हावें ह्मणून, ज्या गोष्टींस अत्यंत अधिक किंमत पडते, अशा सोनें, कातडीं वगैरे पदार्थांच्या रूपानें ही खंडणी वसूल करण्यांत येतें. अशा तऱ्हेनें जित लोकांचे श्रम जेत्यांना सोईस्कर स्वरुपांत घेतां येतात. ज्यावेळीं हें सोनें, कातडी वगैरे सर्व नेण्यांत येतें त्यावेळीं जित लोकांना आपली सर्व चीजवस्तु गेल्यानें आपले श्रम विकणें भाग पडते. हाच प्रकार पूर्वीं, मध्ययुगांत व हल्लींही चालू आहे. रानटी अवस्थेंत गुलामगिरी चालू होती. मध्ययुगांत त्याचें रूपांतर जमिनींच्या मालकींत करण्यांत आलें. व अलीकडे अमेरीका वगैरेच्या शोधानंतर व सोन्याचा प्रवाह सुरूं झाल्यामुळें व संपत्तीचें ते सार्वत्रिक साधन होऊन बसल्यानें पैशांत रूपांतर सुरूं झालें व लोकांना गुलाम बनविण्याचें पैसा हें मुख्य साधन झालें. अर्थातच

आर्थिक संबंधांत पैसा प्राधान्य मिळवून बसला.

याचें उत्तम उदाहरण ह्मणून मी आपणांस खालील प्रत्यक्ष घडलेली हकीगत देत आहे. त्या वरून मी ह्मणतो त्याची स्पष्टता आपणांस होईल. दक्षिण पॅसिफिक महासागरांत कांहीं बेटे आहेत. त्यांतील पोलिनासिया भागांत फीजीयनस् लोकांची वसाहत आहे. या बेटांचें क्षेत्र ४० हजार चौरस मैल असून त्यांपैकीं सरासरी निमे भागांत वसाहत झालेली आहे. तेथें १५०००० मूळचे रहिवासी चांगले उद्योगी असोन ते शेतकी व जनावरें यांच्यावर आपला निर्बाह करितात. त्यांची भरभराट चालू होती पण सन १८५५ चे सुमारास त्यांचा काळ फिरला व त्यांना व त्यांच्या राज्याला ४५००० पौंडांची जरूर लागली. यांचें कारण असें कीं अमेरिका व या लोकांच्यामध्यें कांहीं तंटा उत्पन्न होऊन त्यांच्याकडून ही नुकसानीदाखल रक्कम मागण्यांत आलेली होती.

ही रक्कम वसूल करणेकरितां अमेरिकेनें आपलें सैन्य पाठविलें व बंदुकांच्या धाकांत सक्तीनें ही वसुली चालविली.

फिजियन लोकांची भरभराट जरी चालू होती तरी पैसा ही गोष्ट त्यांनां अद्यापि माहीत नव्हती. मध्ययुगांत आमची जशी स्थिती होती तशीच धान्यरूपांत, कच्च्यामालाच्यारूपानें देवघेव चाले जो कांहीं वसूल केला जाई तोही धान्यरूपांत होत असे. अशा स्थितींत प्रत्यक्ष मरणाच्या भितीनें त्यांना ४५००० पौंड देणें भाग पडलें. अर्थातच त्या रानटी लोकांना ही संख्या काय आहे, याची कल्पनाही नव्हती. तेथील राजानें आपल्या बरोबरीच्या पुढाऱ्यांना विचारून या रकमेबद्दल इंग्लंडमध्यें मागणें केलें. आपलीं बेटें संरक्ष-

णाखालीं घ्या असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु तें मान्य होत नाहीं असें दिसतांना राजानें तीं आपल्या राज्यास जोडा व ही रक्कम भागवा, असें मागणें केलें. परंतु इतक्या रकमेच्या किंमतीचीं तीं बेटें आहेत किंवा कसें हें पहाण्याकरतां इ. सन १८६० सालीं इंग्लंडनें कांहीं लोक तिकडे पाठविलें दरम्यान अमेरिकेचा वसुलीचा तगादा सारखा चालू होताच. ही रक्कम लवकर देणेंत आली नाहीं ह्मणून दंडादाखल ४५००० चे ९०००० नव्वद हजार करण्यांत आले, व जर ही रक्कम तावडतोब देणेंत आली नाहीं तर याहूनही अधिक वाढ होईल असें बजाविण्यांत आलें अशा तऱ्हेनें चोहों बाजूंनीं भंडावून सोडल्यानें, व त्या लोकांना पाश्चिमात्य राष्ट्रांची व्यापारी पद्धत माहीत नसल्यानें, त्यांनी मेलबोर्न येथील व्यापाऱ्यांसी रकमेबद्दल बोलणें चालविलें. त्यांनीं राजाच्या ह्मणण्यांस होकार देऊन व्यापार करण्याकरितां एक कंपनी स्थापना केली. व कांहीं रक्कम हस्ते-बंदीनें देण्याचे करारावर, करारमदार लेखी करून घेऊन प्रथम १००००० एक लाख एकर जमीन व मागाहून दोन लाख एकर जमीन ( उत्तम पैकीं ) आपले ताब्यांत घेतली. अर्थातच तेथें कापूस कॉफी वगैरे उत्पन्न ती कंपनी करूं लागली. कोणत्याही तऱ्हेचा कर अगर नियंत्रण या कंपनीवर नव्हते. सर्व गोष्टींची माफी असल्यानें तेथें लवकरच सर्व प्रकारचे कारखाने, गिरण्या वगैरे सुरूं झाल्या. फिजियन्सना आपल्या राजसत्तेबरोबर ही एक नवीन पीडा होऊन बसली. तेथील त्यांची आर्थिक परिस्थिती बदलूं लागली. महत्वाची व चांगली जमीन या युरोपियन कंपनीच्या ताब्यांत गेल्यानें कराचें उत्पन्नाचें मान खालावलें. निर्यात व आयात मालावर कंपनीच्या करारामुळें

नियंत्रण नसल्यानें त्यांचे तेंही उत्पन्न कमी होऊं लागले. बिचाऱ्या शेंकडा नव्याण्णव प्रमाणांत असलेल्या या गरीब लोकांना आपल्या राजांस जकातींचे कर द्यावे लागत व ही लक्षाधीश कंपनी आपला माल एक पैही कर न देतां आणत असे व नेत असे. याकोमनू राजाचा वसूल अत्यंत कमी होऊं लागला, व त्याला तो कोणत्यांना कोणत्या स्वरुपानें वाढविणें भाग पडलें. आपल्या युरोपियन स्नेह्याच्या मदतीनें पैशाच्या रूपांत कर वसूल करण्याचीं पद्धति त्यानें प्रथमतः सुरू केली. व प्रत्येक माणसी १ पौंड व प्रत्येक बायकांच्या पाठीमागें ४ शिलिंग डोईपटी त्यानें बसविली. हा प्रकार नवा असल्यानें लोकांनां हें अवघड झालें. रोख रक्कम मिळण्याकरितां येईल त्या किंमतीस आपलें धान्यधून्य त्यांना विकावें लागे, व मागणारे लोक अडवून घेत. अर्थातच त्याच्या मजूरीचे दर उतरले या कराच्या पायीं, लोकांना घरेंदारें, गुरेंढोरें, यांस मुकावे लागले व प्रसंगी आपला गांव सोडून देशोधडीस जावे लागे. वसाहत वाल्यांसी करार करून आपले श्रम त्यांनां विकावे लागत. १५००० लोकांपासून राजाला अवघे ६००० पौंड मिळूं लागले. अर्थात अधिक करांची योजना करावी लागली. त्यामुळें अधिकाअधिक जाच होऊन त्याची लोकसंख्या कमी होऊं लागली. कर न दिल्यामुळें लोकांना शिक्षा भोगावी लागे. व युरोपियन मनुष्य याचा फायदा घेऊन व कैद्यांच्या अन्नाचा खर्च करून अत्यंत स्वस्त दरांत मजूर मिळवूं लागले. प्रथम प्रथम कांहीं दिवस थोड्यामुदतीनें ही योजना करण्यांत येई पण पुढें पुढें त्याला भीषण स्वरूप प्राप्त होऊं लागले. वाढीस लागलेला प्रांत अशा तऱ्हेनें रसातळास गेला

लोकसंख्या घटली. कंगाल स्थिती आली. सर्व तरुणांना बाहेर जाऊन वसाहतवाल्यांकडे, करांची भरती करण्याकरितां राबावे लागे. घरीं म्हातारे व मुलें रहात. बायका शेतीचीं कामें तेथें करण्याची वहिवाट नसल्यानें, व पुरुष परगांवीं जात त्यामुळें अर्थातच जमिनी सोज्वळ रहात नसत व त्या मानानें उत्पन्नही कमी येई. थोड्याच काळांत ह्या फिजियन लोकांपैकीं निम्मेअधिक लोक, युरोपियन वसाहतवाल्यांचे गुलाम बनले. आपली स्थिती सुधारण्याकरितां त्यांनीं पुन: इंग्लंडकडे धांव घेतली. बऱ्याच मोठमोठ्या लोकांनीं व पुढाऱ्यांनीं आपण इंग्लंडचें प्रजाजन होण्यास कबूल आहोंत असें कळविलें व वकीलामार्फत तसें बोलणें सुरू केलें. बिचारें इंग्लंड काय करणार ? त्यांनीं तेथील खनिज व नैसर्गिक संपत्ती पाहिली आयतें वाढून आलेलें हें ताट कोण सोडणार ? **लोककल्याणाकरितां स्वार्थत्याग करण्याचे ठरवून बिचाऱ्या इंग्लंडनें सन १८७४ सालीं कायदेशीर रीतीनें या बेटांत आपलें पाऊल टाकलें** व आपल्या मुलखांस हीं बेटें जोडून घेतली.

तेथील राजा पुढें लवकरच मेला. त्यांच्या मुलांना पोटगी दिली. राज्यसूत्रें इंग्लिश गव्हर्नरच्या हातीं आली व त्यानें ज्या करामुळें लोक त्राही झाले होते, तो कमी केला व अशा तऱ्हेनें लोकांचें निकडीचें गाऱ्हाणें दूर झालें, परंतु या गव्हर्नरापुढें दुसरा एक प्रश्न होता. तो ह्मणजे राज्यकारभाराचा खर्च हा होय. तो जवळ जवळ ७० हजार पौंडाचा होता. अर्थात त्यानें नवीन टूम काढली व मजुरीवर कर बसविला. परंतु त्यामुळें पुन्हां अस्वस्थता माजून खर्च निभावेना. शेवटीं दुसरा गव्हर्नर त्याचे जागीं आला. त्यानें

हा कर पैशाच्या रूपानें न घेतां धान्याच्या स्वरुपांत, जें उत्पन्न होईल, त्याचें रूपांतर पैशांत करण्याचें ठरविलें. त्याच वेळीं ही स्थिती सुधारूं लागली. अशातऱ्हेनें ही फिजियन्सची कर्मकहाणी झाली. यावरून आतां आपणांस पैशाचें महत्व व पैसा म्हणजे काय याची कल्पना बरोबर येईल. येथें सर्व उलगडा होतो-बंदुका, भीती, खून, जमिनीचा ताबा यांचे मुख्य कारण जो पैसा, जो बाकींच्या सर्वांना बाजूस सारून अग्रस्थान मिळवितो, तोच गुलामगिरीचा पाया होय. थोड्या वर्षांचा इतिहास आपणांस कित्येक शतकांच्या आर्थिक परिस्थितीचा अनुभव पटवून देत आहे. ज्यांना गुलाम बनवावयाचें होते त्यांच्या किनाऱ्यांस तोफा डागू। अमेरिकन् राष्ट्रानें या नाट-काची नांदी सुरू केली. राष्ट्रांतील ह्यातारें कोतारें, बायाबापड्या निरपराधी लोक यांच्यावर सरसकट पैशाचा जुलूम सुरू करून नाट-कास आरंभ झाला. हाच प्रकार हल्लीं आफ्रिका, चायना, मध्य-आशियांत सुरू आहे. '**पैसा कीं प्राण' हाच प्रश्न जेत्यानीं आजपर्यंत जितांना प्रत्येक स्वारीच्या वेळीं विचारला आहे.** हीच भूमिका प्रत्येकानें घेतलेली आहे. व आपल्या पाशवी शक्तीच्या बळावर ४५००० चे ९०००० केले, जर कबुली नसती तर रक्ताचे पाट व शवाचे डोंगर पडले असते. निर्बल राष्ट्र कबूल झालें व नंतर या शोकपर्यवसायीं नाटकाचा दुसरा अंक सुरू झाला. रक्तपात, रणधुमाळी थांबली, परंतु तिचें रूपांतर कालांतरानें होणाऱ्या नाशांत, अधिक काल भोगाव्या लागणाऱ्या यातनेंत अस्पष्ट असणाऱ्या पण अधिक कष्टमय स्थितीत झालें. फिजियन्स आर्थिक दृष्टीनें गुलाम बनले. या परिस्थितीनें हळुहळू आपलीं मुळें खोल

रुतवून पांच वर्षाच्या अल्पावधींत, त्यांची जमीनजुमला वगैरे मिळकत आपली केली व नंतर त्यांचें स्वातंत्र्यही नष्ट केलें. **फिजिशिअन्स गुलाम बनले.**

एथून तिसरा अंक सुरू झाला. भीषण परिस्थिती भोगणें प्राप्त झालें. त्यांचा विक्रय होऊं लागला. त्यांना दुसरा मालक मिळाला. त्यांनीं आपल्या यातना कमी करण्याबद्दल विनविलें. इंग्लिश राष्ट्रानें ही संधी चांगली आहे असें पाहून त्यांनीं हीं बेटें आपल्या राज्यांत सामील करून घेतलीं. हा मालक अधिक धोरणी व अधिक धूर्त. त्यानें ही गुलामगिरीची बेडी रुपेरी केली व नकळत त्या जित राष्ट्राच्या पायांत अडकविली. हें त्यांच्या दूर दृष्टीच्या लौकिकास साजेसेंच त्यांनीं केलें. रानटी जुलमाचा मार्ग सोडून सुधारलेली पद्धत, अधिक चिरकाल व अधिक परिणामी अशी पद्धती त्यांनीं सुरू ठेविली. आपला दरसालचा ७०००० रु. खर्च त्यांनीं खंडणीच्या रूपानें वसूल करण्याचें ठरविलें. त्यांत दोन गोष्टी साधून घेतल्या. एक जित राष्ट्र त्यामुळें दास्यांत पडलें व दुसरें इंग्लंडला चरण्यास ठिकाण झालें. ज्यावेळीं ही रक्कम प्रत्यक्ष वसूल होणें कठिण होई त्यावेळीं सवलत म्हणून धान्याच्या रूपांत हा कर वसूल केला जाई. ही सोन्याची अंडीं घालणारी कोंबडी जितके दिवस जगवितां येईल तितका अधिक फायदा आहे, हें तें धोरणी लोक जाणत होते म्हणूनच हा सवलतीचा मार्ग त्यांनीं अवलंबिला. अशा रीतीनें इंग्लंडचें दास्य त्यानां पत्करावें लागलें.

पैसा हें चलन म्हणून ठीक आहे. परन्तु त्याचेपाठीमागें सत्ता व जुलूम असतां उपयोगी नाहीं. ज्या ज्या वेळीं यांची मदत त्याला

असते त्या त्या वेळीं प्रत्येकाची गती या फिजियन्स प्रमाणेंच करुणामय होणार. आजपर्यंतचा इतिहास आपणास हेंच सांगत नाहीं काय ? ज्या लोकांच्यामध्यें जुलूम करण्याचें सामर्थ्य आहे तें केव्हांही इतक्यांच बेतानें आपली मागणी करणार कीं, तुम्हांला अखंड दास्यांतच पडलें पाहिजे. जिवंतपणा, स्वातंत्र्यपणा, तुमच्यांत राहूं शकणार नाहीं.

'पैसा ! — हे **निरुपद्रवी देवघेवीचें साधन** रोजच्या व्यवहारांत जरूर आहे असें ह्मणण्यांत येतें. हें खरें आहे काय ? देवघेवीचें एकच साधन, सत्तेनें तुम्ही चालू केल्याशिवाय कधींतरी तें अमलांत आलें आहे. काय ? धान्याचा अगर इतर साधनांचा उपयोग केल्यास तुम्हांस चालतो काय ? जर चालत असेल तर ही गोष्ट कधींच अस्तित्वांत येणार नाहीं. ज्यावेळीं कायद्यानें तुम्ही हें चलन सुरू करतां त्याच वेळीं यास ठराविक किंमत येते. जर शासन संस्था सोनेंच मागेल. तर सोन्यास महत्व येईल. जर कागदाचे तुकडे मागूं लागेल, तर त्यांस महत्व येतें ? लोकांच्या हिताचे आहे, हा केवळ देखावा आहे. जर लोककल्याण पाहिजे तर हा चलनाचा हक्क कां राखून ठेवला आहे ? लोकांना हे ठर-विण्याची सवलत द्या, त्यांना योग्य दिसले तें चलन त्यांना करूं द्या. मात्र तुमच्या अधिकाऱ्यांचा शह मागें असतां कामानये ! आज वस्तुस्थिती अशी आहे कीं हीं नाणीं तुम्ही पाडतां, हे कागदाचे चिटोरे तुह्मी छापतां व लोकांनीं असले प्रकार केले तर त्यांना काय-द्यानें शिक्षा देतां ?

ह्या पैशापायीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आज रशियन राष्ट्रांतील

निम्मा अधिक शेतकरीवर्ग जमिनदारांचा, कारखानदांचा व गिरणी-वाल्यांचा गुलाम बनला आहे. हे कर पैशाच्या स्वरुपांत वसूल केल्यानेंच हा शोचनीय प्रकार घडत नाहीं काय ? कां हा पैसा ह्मणजे निरुपद्रवी देवघेवीचें साधन — निसर्गाचा अबाधित नियम — आहे ?

अत्यंत चिवट लाकडाच्या सोडग्यापेक्षां हें नाणें अधिक प्राणहारक आहे असें जे शेतकरी ह्मणतात तें खोटें आहे काय ?

पैसा हा संपत्तीचा द्योतक आहे व संपत्ती ही श्रमानें उत्पन्न झाली आहे अशी सर्व साधारण समजूत आहे. म्हणूनच श्रमाचें रूपांतर ह्मणजेच संपत्ती असें मानण्यांत येतें. **शासनसंस्था ही करारावर निर्माण झाली असें मानण्याइतकेंच हें बरोबर आहे.** प्रत्येकास पैसा हें देवघेवीचें साधन असावें, असें वाटतें. परंतु जों-पर्यंत जबरदस्ती किंवा जुलून ही त्याच्या पाठीमागें नाहींत, केवळ श्रम घेण्याच्या बाबतींत नव्हे तर एका माणसानें दुसऱ्या माणसा-विरुद्ध जोंपर्यंत अन्याय चालविलेला नाहीं, खरा ख्रिश्चनसमाज ज्यावेळीं राहील, त्याच वेळीं पैसा हें केवळ निरुपद्रवी देवघेवीचें साधन ह्मणून राहील. परंतु ज्यावेळीं जुलूम केला जातो, त्यावेळीं त्यांचें तें रूप जाऊन त्या जागीं जुलमावर अधिष्ठित झालेली हक्काची कल्पना प्रादुर्भूत होते. ज्या वेळीं लढाई होऊन एक मनुष्य दुसऱ्याची चिजवस्त हरण करतो, त्या वेळीं पैसा हें श्रमाचें द्योतक रहात नाहीं. लूट विकून जो पैसा लढाइतला मनुष्य मिळवितो तो त्यानें श्रमानें मिळविलेला खास नसतो. श्रमाचें तें द्योतक नाहीं तर त्याच्या लुटीचें तें द्योतक आहे. मालक व गुलाम हा संबंध सुरू

झाला त्या वेळेपासून आतांपर्यन्त पैसा हें श्रमाचें द्योतक नाहीं.

**जर एकही जुलमी कृत्य असेल तर श्रमानें मिळविलेल्या पैशाचें रूपांतर जुलुमांतच होतें.**

सद्यस्थितींत, शेंकडों वर्षें जुलूम व जबरदस्तीनें मिळविलेला पैसा, जुलूम ज्याचीं निरनिराळीं रूपांतरें झालेलीं आहेत, त्यानें मिळविलेला पैसा, ज्याच्या केवळ साठवणीनें जुलूम जबरदस्ती सुरू होते, तो पैसा, जेथें प्रत्यक्ष श्रमानें मिळविलेल्या पैशाचें अत्यंत अल्प प्रमाण आहे, असा पैसा ज्याच्याजवळ आहे त्याच्या श्रमाचें तें द्योतक आहे असें ह्मणणें म्हणजे उघड्या डोळ्यांनीं चूक करण्यापैकींच प्रकार अथवा हें धडधडीत असत्य बोलणें आहे. असें असावें, असें झाल्यास बरें, हें म्हणणें सयुक्तिक दिसेल. पण ती वस्तुस्थिती नाहीं खास.

पैसा याची साधी व्याख्या अशी करतां येईल. लोकांच्या श्रमाचा उपयोग करून देणारी शक्ति अगर साधन. ज्यावेळीं तो स्वतःच्या श्रमाचें द्योतक असून लोकांस श्रमाचा उपयोग करून देण्याचा हक्क अगर शक्यता देतो, त्याचवेळीं पैसा याचा अर्थ बरोबर केला जातो. ही शक्यता जुलूम नसतांना असूं शकेल.

एका इजिप्सीयन राजानें आपल्या गुलामांना त्यांचे श्रम देण्यास सांगितले. त्यावेळीं भूत व वर्तमानकाळाचे श्रम, सांठा त्यांनीं दिला. परंतु भविष्यकालीन मात्र देणें अशक्य होतें. कारण त्याला त्यावेळीं अस्तित्वच नव्हते. परंतु पैशाच्या प्रगतीबरोबर ही अशक्य असलेली गोष्ट शक्य झाली. त्याला भविष्य कालीन श्रमही देतां येऊं लागले. पैशानें, प्रत्यक्ष गुलामगिरीचे रुपांतर अप्रत्यक्ष गुलामगिरीत झाले.

गुलामाचा मालक एकट्या विवक्षित गुलामावरच सत्ता गाजवी. आज पैशाच्या सहाय्यानें कोणासही गुलामाप्रमाणें राबवता येतें. शिवाय प्रत्यक्ष वैयक्तिक संबंध गुलामगिरींत येत असल्यानें ज्या गोष्टी दये-मुळें आड येत त्यांची आडकाठी या नवीन गुलामगिरींतून दूर झाली.

**पैसा हे हल्लीं जो श्रम करतो त्याच्या श्रमाचे द्योतक ह्मणून पाहिलेलें नाहीं. त्याचा अर्थ दुसऱ्याचे श्रम घेण्याचें एक साधन**, असाच होऊन बसलेला आहे. दुसऱ्यांच्या श्रमाची शक्यता हाच रूढ अर्थ झाला आहे.

पैसा गुलामगिरीचें एक नवीन साधन झालें आहे. गुलामगिरी हें पाप समजण्यांत येई पण पैशाची गोष्ट ती नाहीं. त्याचें समर्थन करितां येतें, त्यांस महत्व आहे, त्यांस किंमत आहे. त्याचा उपयोग, गुलामगिरी सारखा अनैतिक आहे असें मानण्यांत येत नाहीं.

माझ्या लहानपणी जुगाराचा एक प्रकार आह्मी खेळत होतो. प्रत्येकाची उत्कंठा तो खेळ खेळण्यांत अतिशय असे. त्या खेळामुळें पुष्कळ लोक धुळीस मिळाले. त्यांच्या कुटुंबाचा सत्यनाश झाला. कित्येकांनीं त्या खेळाच्यापायीं सरकारचे पैसे वापरले, कित्येकांनीं आपल्याकडे असलेल्या ठेवी खर्चून टाकल्या. इतका शोक त्याचा लागला कीं, शेवटी सरकारांस तो कायद्यानें बंद करणें भाग पडले.

मला आठवतें कीं, त्या वेळचे माझे मित्र असें सांगत कीं, हा खेळ इतका बोकाळावयाचें कारण ह्मणजे आपलें त्यांत नुकसान आहे, आपण बुडत आहोंत ही कल्पनाच लोकांस येत नसे. अत्यंत

अल्प प्रमाणांत नुकसान होण्यास सुरवात होई व शेवटीं खेळांच्या अंती हिशेब, होई त्यावेळीं प्रत्येकाचा खिसा रिकामा होई हेच पैशा संबंधीही खरें आहे.

मजजवळ अक्षय्य न संपणारी थैली आहे. मी फक्त चेक फाडून देतो व जगाच्या यातायाती पासून चैनींत अलिप्त रहातो. मी कोणाचे कसे नुकसान करणार ? मी अत्यंत निरुपद्रवी प्राणी आहे, असे माणूस ह्मणत असतो. पण हा एक प्रकारचा जुगार आहे. यांत कोणाचे नुकसान कोण कसे करतो, हे सहसा कळून येत नाहीं. फक्त चेक बुकांची पानें फाडण्याखेरीज मी कांहीं केले नाहीं करीत नाहीं, व करणारही नाहीं. पैसा हा श्रमाचा द्योतक आहे असें माझे ह्मणणें आहे.

हे खरोखरींच चमत्कारिक नाहीं काय ? यापेक्षां अधिक खुळी, अधिक भ्रामक कल्पना दुसरी कोणती असूं शकेल ?

गुलामावर गुलामगिरीचा परिणाम जुलूम, जबरदस्ती अन्याय यांत होऊन मनुष्य पशुकोटीत ढकलला जातो.

पैसा हा वरीलप्रमाणें उभयपक्षी नाशास कारण होतो. पैसा असणारा व नसणारा या दोघांचीही नैतिक दृष्ट्या अधोगतीच होत असते. गुलामगिरीपेक्षांही व्यक्तिगत संबधाच्या अभावीं, पैसा अधिक वाईट परिणाम घडवून आणतो.

—०—

# शासन संस्था.

गुलामगिरींत कुचमत पडणाऱ्या गुलामांना आपल्या गुलामगिरीची जाणीव नसते, ती स्वभावसिद्ध आहे असेंच तें मानींत असतात. मालकही आपण त्यांच्या आयुष्याचें धनी समजून त्यांना कांहीं सवलती देत असतात व दुसऱ्या तऱ्हेनें हा पाश अधिक घट्ट करीत असतात. त्यांनाही यांत गैर असें कांहींच वाटत नसतें. ह्या दोन्ही गोष्टींपेक्षांही अधिक अश्चर्यकारक गोष्ट म्हणजे मनुष्याचे आर्थिक परिस्थितीचा विचार करीत असतां, त्याच्या मुळाशीं मुख्य गोष्ट काय आहे याचा विचार शास्त्र करीत नाहीं. ही परिस्थिती पाहिली म्हणजे आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. सर्व वरवर दिसणाऱ्या गोष्टींचा विचार शास्त्रानें करावयाचा व जेथें अवघड, व मुद्याचे प्रश्न येतील तेथें उडवाउडवी करावयाची, व लक्ष दुसरीकडे वेधावयाचें हाच प्रकार चहूंकडे दिसून येतो. एखादें आळसावलेलें व चुकार घोडें ज्याप्रमाणें उतरणीस जोरानें पळूं लागतें पण जरा चढ आला कीं हिसके मारावयास लागून इकडे तिकडे मार्ग सोडून जाण्याचा प्रयत्न करितें, त्याचपैकीं हा प्रकार नव्हे काय ?

कांहीं लोकांच्या मर्जीवरच दुसऱ्यांचें जीवन अवलंबून कां रहावें ? ही विषमता समाजांत कां वावरत रहावी ? असे प्रश्न विचारल्यास शास्त्र म्हणतें एक वर्ग दुसऱ्यांच्या श्रमाचें व दुसऱ्यांच्या संवर्धनास लागणाऱ्या साधनांचें नियंत्रण करतें, म्हणून हा उत्पादनाचा नियमच आहे.

दुसऱ्याचें श्रम, ते करण्याची त्यांची हत्यारें, अन्न व जमीन यांसंबंधींचा हक्क एका वर्गासच कोठून व कसा आला व त्या हक्कांचे मूळ कारण काय ? असा प्रश्न विचारा ! शास्त्र अत्यंत कळकळीनें असें सांगते, ' ह्या हक्काची उभारणी श्रमसंरक्षणाच्या तत्त्वावर आहे, ' एका वर्गाचें हे हक्क संरक्षण म्हणजेच दुसऱ्याच्या श्रमांचें हरण होय.

पैसा म्हणजे काय ? असें विचारा, शास्त्र ह्मणते तो बाजारांतील इतर जिनसाप्रमाणेंच एक जिन्नस आहे. फरक एवढाच कीं, तें एक देवघेवीचें साधन आहे. असें जर आहे तर सरकारच हा पैसा निर्माण करण्याचा हक्क आपणाकडे ठेवून वाटेल त्या वेळीं पैसा कां निर्माण करतें ? मजूरवर्गाकडून, शेतकऱ्यांकडून, अत्यंत मोठ्या प्रमाणांत सक्तीनें याच स्वरुपांत कर कां वसूल करतें ? असें आपण विचारा.

शास्त्र ह्मणेल:- करांचा परिणाम आर्थिकशास्त्रदृष्ट्या माणसांवर होत नाहीं. उत्पादन, चलन, संपत्तीची विभागणी यांचा व करांचा एकमेकमेकांशीं कांहीं संबंध नाहीं.

सर्व जनता शासन संस्थेच्या गुलामगिरींत नाहीं काय ? सरकार चाहील त्यावेळीं लोकांचें वित्त निरनिराळे कर बसवून वसूल करीत नसतें काय ? त्यांचे श्रम विनामूल्य घेत नाहीं काय ? लष्करी जुलमा खालीं त्यांची वैयक्तिक स्वतंत्रता नाहींशीं होत नाहीं काय ? व या सर्वांचा परिणाम मनुष्याच्या आर्थिक परिस्थितींवर होतो कीं नाहीं ? असा प्रश्न तुम्ही विचारलात तर त्याला शास्त्राचें उत्तर हें आहे कीं, हा स्वतंत्र विषय आहे. याचा संबंध सरकार व त्यांचे नियम त्यांच्याशीं येत असल्यानें या बाबतींत विचार करण्याची गरज नाहीं.

नं. ता.

एखादा गुलामांचा मालक, आपल्या जुलमाचा विचार न करतां त्यांना राबवितो, मन मानेल तसें वागावितो व स्वच्छंदीपणानें त्यांना कोठेंही नेतो, ही स्थिती नैसर्गिक आहे असें गुलामांचा मालक मानीत असतो, त्याचप्रमाणें कनिष्ट वर्गांशीं असणारे हल्लींचे आमचे संबंध हे स्वाभाविक आहेत, असें शास्त्र आह्मांस सांगतें ! हें आह्मांस पटणार कसें ?

प्रथम आपणांस हें मूर्खपणाचें आहे असें वाटेल. पण खोल विचार केल्यास, यांत अक्कल लढविलेली आहे, असें आपणांस दिसून येईल.

या शास्त्रची दिशा निश्चितपणें आंखलेली आहे. लोककल्याणाच्या मार्गापासून लोकांना परावृत्त करण्याचा त्याचा हेतू आहे. व हें साध्य भ्रामक कल्पनांच्या साधनांनी ते साध्य करणार आहेत. धार्मिक बाबतींत असलेल्या भ्रामक कल्पनांनी आजपर्यंन्त जें नुकसान झालें नाहीं, तें या शास्त्रानें नवी कल्पना काढून केलें आहे. ही भ्रामक कल्पना इतकी भयंकर आहे कीं तिनें समाज निस्त्राण केला आहे. हीच कल्पना कायम राखण्याकरितां शास्त्रांचा अव्याहत खटाटोप चालला आहे. तत्वज्ञानांत देव हा अदृश्य असतो तर या शास्त्रानें ‘ सरकार ’ ही संस्था निर्माण करून अदृष्ट ठेवली आहे. प्रत्येक मनुष्यानें आपल्या शेजाऱ्याशीं योग्य तऱ्हेनें वागणें हें जसे त्यांचे कर्तव्य आहे. तसेच या अदृष्ट संस्थेशी वागणे हें हीं आपलें पवित्र कर्तव्य आहे, हें या शास्त्राच्या नवीन कल्पनेचें मूळ होय. या अदृष्य देवते करितां मनुष्यानें आपल्या मालमत्तेची, श्रमाची व प्रसंगी जिवाचीही तिलांजली वाहिली पाहिजे, अशी शिकवण

शास्त्र देत आहे. ही भ्रामक कल्पना हल्लीं उद्भुत करण्यांत आली आहे. शास्त्र या कल्पनेचें मोठ्या काळजीनें पालन पोषण व संवर्धन करीत आहे, व मनुष्य अननुभूत अशा पारतंत्र्यांत खोल रुतत आहे. मात्र याची जरूर आहे असें शास्त्र कंठरानें सांगत आहे !

शासन संस्था ही मनुष्याच्या संरक्षणाकरितां व त्याच्या हिता-करितां आहे. सबब त्यांतील सर्व घटकांनीं, त्यांस मदत केली पाहिजे, पैसे पुरविले पाहिजेत, व याच दृष्टीनें अन्योन्य संबंध ठेविला पाहिजे. लोकांच्या हिताकरितांच सैन्य ठेवण्यांत येतें. त्यास लागणारा पैसाही अर्थांतच लोकांनीं देणें भाग आहे.

'मी माझ्या बापास शेतकीच्या कामीं मदत करावी असें म्हणतों' 'माझें लग्न करावें' म्हणून मी यत्न करतों परंतु लष्करी शिक्षण सक्तीचें असल्यानें तिकडे माझी सहा वर्षें जातात, ही गोष्ट मला केवळ जुलूम म्हणून करावी लागते, पुढें तेथून सुटून व घरीं येऊन माझ्या कुटुंबाची शेती करावी म्हटलें तर नाना विघ्नें आहेत, मला जमिनी करितां पैसा नाहीं, म्हणून माझें सर्व श्रम त्यांना द्यावे लागतात. या श्रमाचा मोबदला जो कांहीं थोडा मिळतो तो मी माझ्या बायकापोरांच्या करितां राखतों. परंतु इतक्यांत कोणीतरी अधिकारी कर वसुलीला येतो व पैसे घेऊन जातो. कष्ट करून कांहीं मिळवावें तों पुन्हां कर वसूल. अशा तऱ्हेनें माझ्या आर्थिक परिस्थितीची सर्व मदार सरकारच्या मागणीवर अवलंबून आहे. ज्या वेळीं ही आपत्ती नाहींसी होईल त्याच वेळीं सुखानें जगतां येईल, असें एखाद्यानें सांगितलें तर ती वस्तुस्थिती नाहीं काय!

शास्त्र म्हणतें तुम्ही काढलेलीं प्रमेयें चुकीचीं आहेत. कारण तुम्ही अर्थशास्त्र व राजकारण यांची भेसळ करीत अहां. संपत्तीचें उत्पादन, विभागणी व चलन यांचा अभ्यास करा, म्हणजे तुम्हांस सर्व कळून येईल. तुम्ही सांगतां ती तुमच्या हक्कावर गदा नसून ती गोष्ट इतरांप्रमाणे तुम्हांस तुमच्या संरक्षणा करितां व सुखाकरितां करणें जरूर आहे.

जी जमीन नांगरण्यास मला मज्जाव होतो व त्यामुळें मी उपाशी मरतों, ती कोणा अज्ञात संस्थेची आहे म्हणे. त्या अज्ञात संस्थेचा काय उपयोग आहे, हेंही आम्हांला समजत नाहीं.

एखाद्याला गुलाम बनविणें, त्याच्या इच्छेविरुद्ध त्यास काम करण्यास लावणें तुम्हांस शक्य आहे. पण जुलूम चालू असतां, तूं सुखी आहेस असें कितीही कंठ कोरडा करून सांगितले तरी तें पटणार नाहीं ! पण ही गोष्ट आज आपलें शास्त्र करीत आहे. बंदुकांच्या व संगिनींच्या ज़ोरावर उभे असलेली शासन-संस्था आपणांस ज्यावर अम्मल करावयाचा आहे. त्यांजकडोन कायकाय घ्यावयाचें हें आपण ठरवितें, किती लोक कारभारास जरूर आहेत, वसुलीस किती लोक पाहिजेत, बंदोबस्तास किती लोक पाहिजेत, संरक्षणास किती लोक व त्यांचे पगार काय, वगैरे सर्व बाबी आपले इच्छेनुसार ठरवितें. गुलाम बनलेले लोक आपली मिळकत त्याकरितां देतात, व त्यांची अशी समजूत करण्यांत येतें कीं हें सर्व त्यांचेच कल्याणाकरितां. ही गुलामगिरी या काल्पनीक देवतेकरितां पत्करावयाची व इतकेंही करून आपण पुनः स्वतंत्र आहोत असें मानावयाचें. पूर्वी धर्मपुढारी अशीं अज्ञात देवतेची उपपत्ती सांगत आले, हल्लींचे विद्वान

पुढारी या अज्ञातसत्तेचा पुरस्कार करितात व सहाजिकच अडाणी लोक त्यावर विश्वास ठेवितात. पण विचाराचें किरण त्यावर पडतांच वस्तुस्थिती स्पष्ट होते.

दहा लोक एके ठिकाणीं मिळून काम करीत आहेत असें घेऊं. ह्या दहांची जूट असल्यानें व ते स्वखुशीनें एकच काम करीत असल्यानें या गोष्टींत दहांचें हित आहे, असें होईल. पण जर ह्या दहाजणांनीं अकरावा मनुष्य त्याच्या इच्छेविरुद्ध बळजबरीनें कामास आणला, तर माल त्यांत त्या अकराव्या इसमाचें हित सायेलच असें नाहीं. हीच गोष्ट गांवकऱ्यांची. दहाजणांनीं मिळून श्रमविभागानें जर एखादी जरूर असणारी गोष्ट करण्यांत आपला वेळ घालविला तर त्यांच्यापुरती ती गोष्ट हिताची होईल, पण नवीन इसमांस ज्यास त्याची जरूरी नाहीं. अशा इसमास, जबरीनें जर त्या कामा-कडे लावलें तर तें त्याच्या हिताचें खास नाहीं. त्याचप्रमाणें अनेक सामाजिक गोष्टींचें आहे. जोंपर्यंत या गोष्टी मनुष्य सुखानें व स्वखुशीनें करतो, तोंपर्यन्त त्या हिताच्या होऊं शकतील. परंतु जुलमानें, सत्तेच्या जोरावर जर एखादी गोष्ट करणें त्यास भाग पडेल तर त्यांत सामाजिक हित होणार नाहीं, कारण त्यांत जूलम आहे. ही गोष्ट इतकी साधी व स्पष्ट आहे कीं, मुद्दाम जी गैरसमजूत व जो श्रम उत्पन्न करण्यांत येतो, तो जर नसतां तर इतके सांगण्याची जरूरच नव्हती.

ज्याबद्दल सर्वांचें एक मत आहे अशा गोष्टींत जर एखाद्या व्यक्तीवर जुलम करणें अन्याय्य व त्याज्य आहे, तर मग मूठभर लोकांच्या समजुतीकरतां, कांहीं विविक्षित ऐदखाऊकरतां व त्यांच्यापेक्षां

लक्षावधी पटींनें अधिक असणाऱ्या समाजानें आपलें हित बाजूस ठेवून, जी गोष्ट दुखःद आहे असें अनुभवास येतें, ती गोष्ट करण्यास कसें तयार व्हावें ! जर असें वागण्यास त्यांच्यावर सक्ति होऊं लागली, व सर्वांचें कल्याण आहे असें भासवून, त्यांच्यावर या गोष्टी लादण्यांत आल्या तर तो अन्याय सहस्रपटीनें जाचक होईल याची कल्पना यांचें समर्थन करणारांनींच करावी. लष्कर व आरमार कर व लठ्ठ पगार हें त्याचेच द्योतक नाहींत काय ?

लोक कल्याणाच्या व सत्याच्या मार्गांत वाटमारी होत आहे ती येथेंच. हीच भ्रामक कल्पना, त्यास कारणीभूत आहे. जाणूनबुजून त्यांचे संवर्धन व संरक्षण करण्यांत येतें. राजकारण व अर्थशास्त्र यांचा उद्देश हाच आहे.

गुलामगिरी फार पूर्वीं नष्ट झाली. रोम, अमेरिका, रशिया यांनीं ती घालविली असें ह्मणतात, पण तो शब्द मात्र नष्ट झाला. **गुलामगिरी दुसऱ्या स्वरुपांत अखंड चालूच आहे.** फक्त पर्यायानें शाब्दिक फरक झाला आहे.

गुलामगिरी म्हणजे काय ? स्वतः श्रम न करतां, दुसऱ्यांस ते आपल्याकरितां करणेस भाग पाडणें. जेथें मनुष्य दुसऱ्यांस, त्याचे इच्छेविरुद्ध काम करण्यास लावतो, तेथें गुलामगिरी मूर्तिमंत आहे.

आज सर्व राष्ट्रांतून, सुधारलेल्या देशांतून, काय प्रकार चालला आहे! मूठभर लोक, हक्क म्हणून, जुलमानें हजारों लोकांना, राबवीत असलेलें आपण पहात नाहीं काय ? **राबविणारे हक्क म्हणतात. राबणारे कर्तव्य समजतात !** खासा न्याय ! केवढ्या मोठ्या प्रमाणांत हें दास्य पसरलें आहे ? सुसज्ज व बलवान यांची सत्ता निराश्रित व निस्त्राण

यांच्यावर चालत आहे. **हाच गुलामगिरीचा आत्मा आहे.**

गुलामगिरीची तीन अंगें आहेत. लष्करी अम्मल, जमीन महसूल, ज्याची वसुली लष्कराच्या जोरावर करता येते तो, प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पैशाच्या रूपानें वसूल करण्यांत येणारा कर, हे प्रकार पूर्वकाळीं होते, तसेच आजही आहेत. फक्त रुपांतरें करून नांव बदलल्यामुळें आपल्या लक्षांत येत नाहींत, एवढेंच !

सशस्त्रानीं निःशस्त्रावर चालविलेल्या जुलुमास, देशाचे रक्षण व हित हें गोंडस स्वरूप देण्यांत आले, ही पहिली बाब होय.

दुसरी बाब जमीन महसुलाची– त्याचें रुपांतर जमिनीची मालकी बक्षिसादाखल, सर्वांचें कल्याण शासनसंस्था साधीत आहे असें ह्मणणाऱ्यांस देऊन त्यांची वंशपरंपरेची तजवीज करण्यांत आली पर्यायानें तोच जमिनमहसुलाचा सक्तीनें वसूल. फक्त नाम भेद !

तिसरी बाब– कराच्या रूपानें होणारी कुचंबणा. ह्याची वाढ हल्लीं फारच मोठ्या प्रमाणांत चालली आहे ! याचें रुपांतर व नाम-भेद फारच नामीं साधलीं आहेत. हा पैसा सर्वांचे कल्याणार्थ व स्वातंत्र्य रक्षणार्थ देण्यांत येतो ह्मणे. गुलामगिरी आहे पण स्वरूप निराळें.

जुलुमाची पाठपुरवणी जेथें कायद्यानें केली तेथें गुलामगिरी आहेच. मग हा हुकूम प्रत्यक्ष जाळपोळीनें व राजांनीं केलेल्या हल्यांनीं असो, अथवा एका जातीनें दुसऱ्यावर खंडणी लादून ती वसूल करण्याच्या स्वरुपानें असो, अगर मंत्रीमंडळानें आपल्या लष्कराच्या जोरावर - प्रांती निहाय - करवसुलीच्या स्वरुपांत असो, जोंपर्यंत संगीनींच्या जोरावर हा जुलूम चालू आहे तोपर्यंत संपत्तीची विभागणी योग्य न होतां, ती शास्त्यांच्याच हातीं रहाणार.

याचें उदाहरण आपणाला हेन्‍री जार्जच्या खटाटोपांत दिसून येईल. त्यानें सर्व जमिनीची मालकी सरकारची आहे असें ठरविलें. अर्थांत निरनिराळ्या करांचें रूपांतर जमिनीचा खंड देण्यांत झालें. जो ज्यामानानें जमीन उपभोगील त्यामानानें त्यानें खंड द्यावयाचा परंतु जोपर्यंत हा खंड सक्तीनें सरकारच्या मर्जी प्रमाणें घेण्याचा क्रम सुरूं आहे तोंपर्यंत अप्रत्यक्ष गुलामगिरीच आहे. पीक साल झालें नाहीं अगर अन्य कारणांनीं त्याला हा सारा देतां आला नाहीं तर आपली जमीन जाऊंनये ह्मणून त्यांस ज्याच्याजवळ पैसा आहे त्याच्या स्वाधीन व्हावेंच लागतें, अर्थांत गुलामगिरी आलीच.

एखाद्या भांड्यास जर भोंक पडून तें गळूं लागलें तर वरवर पाहून पाणी गळतें यांपेक्षां कांहीं बोध होणार नाहीं व पाणीही गळण्याचें राहणार नाहीं. जर पाणी गळूं नये अशी खरोखरीच तजवीज करणें असेल तर आंत कोठें भोंक पडलें आहे तें पाहून, तें बंद केलें पाहिजे. तरच पाणी गळण्याचें बंद होईल.

हाच प्रकार संपत्तीचा आहे. जोंपर्यंत तुम्हांस ह्या विषमतेचे मूळ व संपत्तीची अयोग्य विभागणी काय कारणानीं होतें, याचा विचार करून तपास लावला नाहीं तोंपर्यन्त ही विषमता, अशीच राहणार. मजुरसंघ बनवा, संस्था काढा, संपत्तीही राष्ट्राची बनवा जमीनीची मालकी देशाची करा वगैरे नाना उपाय लोक सुचवितात हीं सर्व उपांगें आहेत, पण यानें खरा उपयोग होणार नाहीं. संपत्तीची अयोग्य विभागणी बंद करणें झाल्यास हे सशस्त्रांचें निशस्त्रांवरील अतिक्रमण प्रथम थांबविलें पाहिजे. गरिबांचें श्रम व त्यांची मालमत्ता यांचें रक्षण झालें पाहिजे, तरच गरिबांच्या हातून श्रीमंतांच्या

हातीं वाहणारा संपत्तीचा ओघ थांबेल तोपर्यंत हा प्रकार असाच चालणार ! जों पर्यंत मनुष्य अधिकारानें मी दुसऱ्यावर सत्ता चालवणार व तो माझा हक्क आहे, असें म्हणेल तोंपर्यंत ही विषमता, ही गुलामगिरी उजळ माथ्यानें नांदत राहणार.

माझा जो अनुभव आहे त्यावरून आचार व विचार यात भिन्नत्व खरोखर असतां कामा नये, मला जशी एखादी गोष्ट समजेल तशीच मी ती करीन. पैसा हा श्रमाचें द्योतक आहे अशी माझी कल्पना होती. तो चांगला व हितावह या समजुतीनें तो मी गरिबांनां वाटीत होतो. परंतु वाटतांना मला असें आढळून आलें कीं, जें मी वाटीत आहे तेंच मी गरीबाकडून सक्तीनें वसूल करून घेत आहे. जमीनदार लोक जी गोष्ट पूर्वीं करीत - गुलामांना नोकर घेत - तीच स्थिती मी करीत होतो. मला असें वाटतें कीं, विकत घेण्यांत अगर दान देण्यांत केलेल्या प्रत्येक पैशाचा उपयोग ह्मणजे गरिबांवर दिलेली हुंडीच होय. **दान देणें म्हणजे त्यांच्यापासून सक्तीनें वसूल करणें** हें मला पटलें. पैसा अधिक असणें ही गोष्ट चांगली नाहीं,त्यामुळें स्वतः श्रम करण्यांत असलेले सौख्य नष्ट होतें. अर्थात हा आनंद व हें सौख्य मला पैशाच्या दानानें देतां आलें नाहीं, कारण मजजवळ तें नव्हतें मला संपत्ती ह्मणजे काय, हें कळूं लागताच मी काय केलें पाहिजे हा प्रश्न तर सुटलाच, पण प्रत्येकानें काय केलें पाहिजे हेंही मला कळलें. बुद्ध, साक्रेतीस वगैरेनीं जें पूर्वी उपदेशिलें त्याचा पडताळा मला आतां आला. ‘ आम्ही काय करावें ’ या प्रश्नास उत्तर देतांना जॉन दी ब्याप्टिष्ट यानें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, ‘ तुजजवळ जें अधिक असेल तें नसणाऱ्याला दे ’ ख्राइस्तनेंही या पेक्षां स्पष्टतेनें

वारंवार बजाविलें आहे कीं, 'गरीब हेंच सुखी' 'श्रीमंतांच्या वांट्यास नेहमीं दुःखच' 'तो ह्मणे देवाची व द्रव्याची सांगड कधींही शक्य नाहीं. त्यानें आपले शिष्यवर्गास पैसा घेण्यास बंदी केली होती. दुसऱ्याच्या श्रमाचें फल घेणें, ह्यांतच गुलामगिरी आहे. खरोखरच ज्याला या गुलामगिरीचा तिटकारा असेल त्याला दोन गोष्टी केल्या-वांचून गत्यंतरच नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे " आपल्या गरजा कमी करणें " व दुसरी गोष्ट म्हणजे " दुसरे लोक आजपर्यंत आपलेकरितां जे श्रम करीत होते ते श्रम स्वतः केलें पाहिजेत."

मला गरिबांना मदत करून त्यांची स्थिती सुधारणें अशक्य झाले व त्यांचीं कारणें खालील प्रमाणें होतीं.

पहिलें कारण, खेड्यांतील संपत्ति शहरांत येऊन साठणें व शहरांत खेड्यांतील लोक येऊन रहाणें. दुसऱ्यांस लुटण्याची बुद्धि नसेल व आपल्या गरजा आपणांस भागवितां येतील तर मनुष्यांस खेडेगांव सोडण्याची कल्पनाच येणार नाहीं. कारण तेथेंच त्यांच्या गरजा अधिक चांगल्या तऱ्हेनें भागविल्या जातात, तेथें त्याला दुस-ऱ्यास, मदत देतां येईल. व माझा शहरांतील प्रयत्न जसा निष्फळ झाला, तसा तो खेड्यांत होणार नाहीं.

दुसरें कारण श्रीमंत व गरीब यांजमध्यें होणारी प्रतारणा होय ज्या वेळीं मनुष्य दुसऱ्यांस, अधिकाराच्या, पैशाच्या अगर अन्य मिषानें लुबाडण्याचें सोडील व स्वयंसिद्ध बनून कष्ट करूं लागेल, त्यावेळीं ही प्रतारणा नाहींशीं होईल. तो बरोबरीच्या नात्यानें वागूं लागेल व सहाजिकच त्यास मदत देतां येईल.

तिसरी गोष्ट म्हणजे अन्यायानें मिळविलेल्या द्रव्याचें

एकीकरण होय. हेंच द्रव्य मी दुसऱ्यास मदतीकरितां देत होतों.

मला आतां लोकांच्या दुःखाचें व दारिद्र्याचें कारण कळून आलें हे दुःख, या यातना जर कमी करण्याच्या तर त्या देण्याचे, प्रथम बंद केले पाहिजे, लोकाना गुलाम करण्याचा धंदा सोडला पाहिजे.

ज्याला खरोखरींच लोकहित साधावयाचें आहे. लोकांचें दुःख व यातना कमी करावयाच्या आहेत, त्याला अत्यंत सोपा, साधा व स्पष्ट मार्ग म्हणजे जरूरी पेक्षां अधिक पैसा मिळवावयाचा नाहीं. याचा अर्थ हा कीं, दुसऱ्याच्या श्रमाची लूट करावयाची नाही. आपले सर्व कष्ट शक्यतोंवर आपले आपण करावयाचे हाच मार्ग जॉन दी ब्यॅाप्टिस्ट, ख्रिस्त यांनीं दाखविला व तो भल्यांनीं आक्रमिला हा अत्यंत साधा व स्पष्ट मार्ग खरा पण सध्यांची आपली कृत्रिम राहणी इतकी अंगवळणी पडलेली आहे कीं वरील दर्जाच्या नोकरांना, चैनीत वेळ घालवणें हे पाप आहे याची जाणीवही नाहींशीं झालीं आहे. आपल्या अधिकारारूढ व संपन्न स्थितींतून, खालच्या वर्गाकडे पाहणें त्यांना कमीपणाचे वाटतें संकट ग्रस्तांना मुक्त करण्याची जबाबदारी आपणावर आहे, हें त्यांच्या गावींही नाहीं.

एकमेकांचे हितसंबंध कितीही गुंतागुंतीचे असले तरी आळशी कोण व कष्ट कोण करतो हें ज्याच्या सदसद्विवेक बुद्धिपेक्षांही, प्रत्येकाचा जमाखर्च अधिक स्पष्ट करितो. ज्या मानानें खर्च कमी त्यामानानें त्याचें स्वतःचे कष्ट अधिक. परंतु त्याचे आड आमची संस्कृती, शास्त्रें, कला व शासन-संस्था येतात, याची वाट काय ?

—०—

स्थळ ... सं. ... नं. ... ता. ...

# मास्कोंतील एक दृश्य.

ज्या दिवसाची हकिगत मी लिहीत आहे त्याच दिवशीं रात्रीं मास्को शहरांत मोठा नाच होणार होता. मी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घर सोडलें. जिकडें तिकडे गिरण्यांच्या शिटा ऐकू येत होत्या. मजूर रस्त्यानें झिंगत हिंडत असलेले दिसत होते.

मी गिरणीच्याच भागांत रहात होतो. पहाटे पांच वाजल्यापासून या गिरण्यांच्या शिटा सुरूं होत. पहिली मजुरांनी आळस व झोंप टाकून उठावें ह्मणून होई. बिचारा मजूर आपल्या कोंदट, घाण व जेथें माणसांची खेंचाखेंच झाली आहे अशा खोल्यांतून धडपडत उठे. या खोल्यांतून बायका व पुरुष एके ठिकाणींच गर्दीत निजलेले दिसत. सीट ऐकतांच अंधारांतच चाचपडत ते उठून गिरण्यांकडे धांव घेत. तेथें आपल्या नेमून दिलेल्या कामास सुरवात करित. त्यांच्या कष्टांचा उपयोग कोणास व कसा होतो याचा त्याला विचारही नाहीं. बिचारा दहा दहा तास, अकरा अकरा तास आपल्या हाडांचीं काडें करून मरेपर्यंत राबत असतो. रात्र झाली कीं सुटीची सीट होते. गिरण्यांच्या आवारांतून हजारो मजूरांच्या बेकारीचें उत्तम प्रदर्शन, त्यावेळीं दिसून येतें. मळके व फाटके कपडे, गिरण्यांच्या धुरानें, व कोळशानें तोंडें व हातपाय काळे झालेले, कष्टानें चेहरे पडलेले, शरीर दमल्यामुळें निस्त्राण झालेले, असे हजारों मजूर रस्त्यानें जातांना दिसतात. या वेळीं ताडीच्या दुकानांतून व उंची दारूच्या दुकानांतून मनस्वी गर्दी सुरू होते. दारू पिऊन बेहोष झालेले, छचोर बायकांना व

कसबिणींना बरोबर घेऊन फिरणारे लोक या वेळीं आढळतात, आपण काय करीत आहोंत व काय बडबडत आहोंत, याची शुद्ध बिचाऱ्यांना नसतें. असा प्रकार रात्रीं दहा अकरा वाजेपर्यंत सर्वत्र रस्त्यानें दिसत असतो. प्रथम या लोकांबद्दल मला तिटकारा उत्पन्न झाला. पण विचारांतीं या सिटांचा अर्थ व त्यांचा उपयोग मीं पाहिला, त्या वेळीं मास्कोच्या बेकार गृहांतील स्थिती सर्व लोकांची अद्यापी कसी झाली नाहीं, याचेंच आश्चर्य मला वाटलें. पुढें हा प्रकार कमी कमी होऊं लागला व रात्रीं अकराचे सुमारास रस्त्यानें नवीन दृश्य दिसूं लागलें.

गाड्याघोड्यांचा खडखडाट रस्त्यानें सुरू झाला. उमदे, व तयार घोडे, आपल्या टापांनीं लोकांचे चित्त वेधून घेत होतें. बाहेर हाणावयास बसणाराचा पोशाख लोकरीचा व भारी किंमतीचा होता. तो ज्यांच्या पैशावर जगत होता, त्यांना रस्त्यानें बाजूस होण्यास मोठ्या तोऱ्यानें खड्या आवाजांत, सांगत होता. त्याचें घोडे तासी १५-१६ मैलाचे वेगानें भर वस्तींतून भरदाव धांवत होते. मालक आंत बसून काय मजा चालली आहे हें पहात होते. ज्यांच्यावर त्यांची संपत्ती अवलंबून होती व जे ती उत्पादन करीत, त्यांच्यामध्यें व आपला होणारा नाच यांचा अन्योन्य संबंध काय आहे, याचा विचार बिचाऱ्यांच्या स्वप्नींही नाहीं. वाईट असें आपल्या हातून कांहीं घडत नाहीं केवळ अशाच, समजुतीनें खुल्या दिलानें तेथें चालू असलेल्या प्रकारांत ते भाग घेत !

हा चैनीचा प्रकार रात्रीं आकरा ते सकाळीं सहा वाजेपर्यंत अखंडचालू राही. बिचाऱ्यांनो, चैन करा ! ही चैन अशीच चालू द्या !

रात्रभर सुखच अनुभवा! पण लक्षांत ठेवा कीं, भुकेनें रात्रभर तडफडणारा प्राणी तुम्हांस सुखानें राहूं देणार नाहीं.

ही करमणूक रात्रभर चालत असे. तरुणींनीं व मुलींनीं आपलें यौवन कसें उमेदींत आलें आहे, हें दर्शविण्याकरितांच, आपलें पुष्ट स्तनयुग्म तलम कपड्यांनीं झांकून बाकीचा सर्व छातीचा भाग उघडा केला होता. केसांत निरनिराळ्या रंगाचीं व सुवासिक फुलें घातलीं होतीं. वेण्यांचा भाग फारच मनोहर, चित्ताकर्षक अशा रीतीनें सजविलेला होता. कमरेखालील भागही उघडा असे. हात खांद्यापर्यंतच अंगांत घातलेल्या जिरजिरींत तलम कपड्यांनीं आच्छादिलेले. अंत त जिरजिरींत व अंगास चिकटून बसणारें तलम रेशमीवस्त्र, व त्यांचें मुसमुसणारें तारुण्य, लोकांना मोहून सोडीत होतें.

मधुन मधून संगिताच्या लहरींबरोबर त्या आपल्या तरुण सोबत्यांना आलिंगन देत. विजेच्या चकचकाटांत व संपत्तीच्या माहेरघरांत हा सर्व प्रकार इतक्या बेहोष रितीनें चाले कीं पहाणारा गुंग होई; दृष्टि स्थिरावे. जोप्रकार कोणीही कुलीन म्हणविणारी स्त्री परक्या पुरुषांदेखत करण्यास तयार झाली नसती, तो प्रकार अखंड करमणूक म्हणून रात्रभर चालू असे. म्हाताऱ्या बुड्ढ्क बायकांही आपआपल्या परीनें यांत भाग घेतांनां दिसत.

हा प्रकार करमणूक म्हणून चाले. यांत लपवून ठेविण्यासारखें कांहीं आहे असें त्यना वाटतच नव्हतें. या करमणुकीच्या पायीं आपण हजारो गरीब लोकांच्या यातनेचें श्रम लुटत आहोंत, ही कल्पना त्यांना नव्हती. उलट आपण त्यांना या प्रकारानें पोशीत आहों, त्यांची करमणूक करीत आहों, अशीच त्यांची कल्पना.

नाच, करमणूक चांगली करतो हें खरें ! परंतु त्याच्या मुळाशीं काय आहे ! आपल्या घरांत जर कोणी उपाशी राहिला, तर आपणांस चैन करवत नाहीं. त्याच्याबद्दल लागलीच सहानुभूती उत्पन्न होते. त्यानें खाल्याप्याल्याशिवाय आपणास बरें वाटत नाहीं; मग लोकानां दुःख देणाऱ्या प्रकारांत लोक मजा कशी मारतात !

जर मुलांनीं चिमट्यानें कुत्र्याचें शेपूट धरून दाबलें व त्यास वेदना उत्पन्न केल्या तर त्यांत त्यांना वाटणारी मजा पाहून आपणांस खेद वाटतो. मग हजारों मजुरांना चापांत घालुन त्यांची संपत्ती, त्यांचे श्रम आपण पिळून काढतां व त्यावर आपली करमणुक, आपलें नाच चालवितां, हा किती दुःखद, शोचनीय व त्याज्य प्रकार आहे.

या प्रकारांत, या नाचांत भाग घेणारी तरुणी आपल्या झग्याकरितां केवळ १५० रुपये खर्च करी ही तरुणी एखाद्या अभिजात श्रीमंताच्या घरीं खास निर्माण झालेली नव्हती. तिचा जन्म एखाद्या खेड्यांतच झालेला असेल. तिला तेथील परिस्थिती, तेथील राहणी, आचार विचार सर्व माहिती असतील. कदाचित तिच्या नोकरांनेच आपल्यास घराचा निवारा असावा म्हणून १५० रु. ची जरूर व्यक्त केली असेल. ती त्याच्या आयुष्याची अत्यंत थोर अशी महत्वाकांक्षा आहे हें तिला माहीत असेत, पण या गरजा भागविण्यांस त्याना मदत नकरतां केवळ चैन ह्मणून तेवढ्या किंमतीचा झगा नाचाकरितां ती तयार करते. तिच्या झग्याची लेस, बनात, रेशीम, फुलें वगैरे आपोआप खास निर्माण झालीं नाहीत. मजुर लोक तीं तयार करतात, हें सर्व सक्तीनें निर्माण होतें याची तिला जाणीव नसतें काय ?

आपल्याकरितां रात्रंदिवस झटणारे नोकर, प्रसंगीं झोंपही न घेतां राबणारे मजूर तिनें पाहिले आहेत. ते तिच्या प्रेमाखातर तर हे श्रम खास करीत नव्हते. त्यांचे जागरणानें व कष्टानें उतरलेले चेहरे तिनें खास पाहिले असतील. परंतु त्या गोष्टीचा विचार तिनें आपल्या मनासी कधीं केला नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे. आपल्या चैनीचा, आपल्या नाचाचा प्रकार काय परिणाम करतो याची कल्पना बिचारीला कोठून येणार ! तिलाच दोष देण्यांत काय अर्थ ! तिच्या वडील धाऱ्यामंडळींनीं जें शिक्षण तिला दिलें होतें, ज्या कल्पनासंवर्धन केल्या होत्या, ज्या संवयी तिला लावल्या होत्या, त्या तिनें घेतल्या. परंतु या कामीं मोठ्या मंडळींची झालेली चूक कोण निस्तरणार !

वडील मंडळींना विचारतां,त्यांचे ठराविक उत्तर आहे ' आम्ही जुलूम कोणावरच करीत नाहीं.' आम्ही लोक मजुरीस बोलावतो व ते येतात नोकरी करितात. श्रम विकत घेणेंत अगर लोक भाड्यानें लावणेंत पाप काय आहे ? आह्मी कोणावरच जुलूम करीत नाहीं. '

एके दिवशीं मी माझ्या फार जुन्या स्नेह्यांस भेटण्याकरितां त्याचे घराकडे गेलो. परंतु तो घरांत दिसला नाहीं. तो ब्रह्मचारी असल्यामुळें त्याच्या येथें दोन बाया बसलेल्या पाहून मला अचंबा वाटला. त्या तेथें कांहींतरी करीत असल्यात असें मी पाहिलें. एक १२-१४ वर्षांची मुलगी व एक बाई तेथें टेबलाजवळ बसली होती तंबाकू व कागद पडलेले होते. बाई तंबाकू हातावर चोळून शिगारेटसचे कागदांत भरीत होती. यंत्रानें दाबून ती शिगार तयार करी. मुलगीही तिला मदत करीत असे, हे काम इतक्या जलद चाललें होतें कीं, मला तें पाहून आश्चर्य वाटलें.

हृदयाच्या क्रियेवर याचा वाईट परिणाम होतो पुरा श्वासही करतां येत नाहीं ' असें ती बाई म्हणाली वास्तवीक हें मागण्याची गरजच नव्हती कारण त्यांचेकडे पाहिले व त्यांची प्रकृती लक्षांत आणली कीं या गोष्टींची सत्यता पटत होती.

या बाया, आपल्या शरिराचें केवळ यंत्र बनवून काबाडकष्ट करीत होत्या. जिवाचें रान करून व आपल्या आयुष्यांस धोका देऊन सरासरी त्या आपला निर्वाह चालवीत. माझा स्नेही मात्र आपण श्रम न करतां, त्यांच्या श्रमाचा फायदा घेऊन आराम करीत होता. तो त्यांना वेतन देत होता पण त्यांची हलाखीची स्थिती मात्र पूर्वी-प्रमाणेंच चालू होती.


हीच स्थिती माझ्या स्वतःच्या परटिणीची होती. मी दोन दोन दिवसांनीं कपडे बदलणार, व त्याबद्दल तिला राबवून, तिचा अंत मी पहाणार.

यांत काय वाईट ? मी नाहीं म्हटलें तरी लोक ह्या गोष्टी करणारच. श्रम विकणें व विकत घेणें, चालू रहाणारच. मग मी एकट्या-नेंच तें सोडून काय उपयोग? असें सांगण्यांत येतें ! पण जर मी रानटी लोकांत मेजवानीस गेलों. त्यांनीं उत्तम पदार्थ तयार केले. मलाही ते अत्यंत आवडलें. मागाहून समजलें कीं, ते पदार्थ माणसांच्या मांसाचे होते. जर मला विचार असेल, सदसद्विवेक बुद्धि असेल, तर मी तें पुनः खाणार नाहीं. मग माझ्या या करण्याचा उपयोग, बळी जाणारास होवो अगर न होवो. माझें अन्न कितीही

रुचकर, मधुर, स्वादिष्ट व खुसखुशीत असलें तरी तें मी दूरच सारणार. मी एखादे वेळीं भुकेनें प्राण जाऊं लागला तर मांस खाईन, पण, मेजवानीच्या प्रकारांत व तेंही अशा नरमांसाचें भक्षण कालत्रयीं करणार नाहीं ! जर या गोष्टींत अन्याय आहे, अनहित आहे हें तुम्हांस पटतें, तर या सबबी काय कामाच्या ?

आमच्या चैनी चालवण्याकरतां, पैशाच्या जोरावर जें आम्ही दुसऱ्यांस श्रम करण्यास भाग पाडतो, तें सोडलें पाहिजे. जर यांत गरिब वर्ग नाडला जातो हें पटतें तर याचा त्याग करणें योग्य नाहीं काय ?

---



# ‘अपराधी कोण’?

‘आह्मी काय करणार. परिस्थितीच तशी आहे.’ असें नेहमीं ह्मणण्यांत येते. जर आह्मी याला जबाबदार नाहीं तर दुसरें कोण? मुलानें एखादी खोडी करावी, व मग त्याला रागें भरावें ह्मणजे तो जसा ‘ मी काय करूं, ते असेच होते’ असे ह्मणतो, त्याचपैकीं हा प्रकार नव्हे काय? शहरें निर्माण झाली. आह्मी त्यांत रहाणारे श्रीमान लोक सहाजिकच गरीबांचे श्रम वेतन देऊन घेतो यांत गैर काय आहे असें विचारण्यांत येतें.

परंतु आपण त्या गोष्टीचा विचार करीत नाहीं. खेडेगांवात आपण कसे वागतो व तेथील लोकांना कशी मदत करितो हे पाहिले ह्मणजे याची स्पष्टता येईल. सुटीचे व ईस्टरचे सणाचे दिवस श्रीमंत लोक कसे घालवतात? शहरांत नाच, गाणे, तमाशे, वगैरे प्रकार नेहमीं प्रमाणेच चालू असतो. याहुन अधिक मनोहर, अधिक उत्साह व समाधान देणारा सृष्टीदेवतेचा देखावा त्याना खेडेगांवात अनुभवावयास मिळतो.

खेड्यांत शेतकरी साधे अन्न खाऊन गुजराण करितात. १५ ते १८ तास काम करितात, प्रसंगी झोपही भरपूर नसते फार काय चिंध्या अंगावर वापरतात. येथें गिरण्या वगैरे नाहीत. त्याचप्रमाणें ऐदखाऊंही नाहींत. उन्हाळ्यांत इतके भरपूर काम असते कीं, त्यानां जेवणास सवड मिळत नाहीं, एव्हडेच नव्हे तर मजूर मिळत नसल्यानें उलट नुकसान होऊनये ह्मणून त्यानां अधिक राबणें भाग पडते. येथें आपले आयुष्य श्रीमान लोक कसें घालवितात ते आपण पाहूं.

खेडेगांवीं जर त्यांचे घर असेल तर तें उत्तम दुरस्त करतील मोठमोठ्या किंमतीच्या व छानदार चटया घरांत व्यवस्थित अंथरून स्वच्छता ठेवतील. रंगीबेरंगी कांचा तावदानांना बसवतील व निरनिराळ्या रंगाचे प्रकाश घरांत घेऊन त्यास अधिक मनोहर करतील. निरनिराळीं सुखोपयोगी उपकरणीं आणून व्यवस्थित मांडणी करितील. बागबगीचे, फुलांचे ताटवे, गवताचे गालिचे वगैरेंच्या मांडणीनें आपला प्राकार नयन-मनोहर बनवतील. पण हें सर्व कोणाचे श्रमावर? ज्यानां आपलें स्वतःचें काम करण्यास सवड नाहीं त्या गरीब लोकांचे श्रमावर आपल्या निर्वाहास लागणारे धान्य तयार करण्यास उपयोगी पडणारे त्यांचें श्रम या कामी खर्चावे लागतात.

येथें कारखान्याची सबब मुळींच नाहीं. " मीं तसें केलें नाहीं तरी इतर ते करणारच " ही सबब रहात नाहीं आळश्यांना आपण पोसतों असेंही म्हणता येणार नाहीं. येथें आम्ही आमच्या चैनीकरतां दुसऱ्याचें श्रम सक्तीनें घेत असतों.

हे श्रम शेतकऱ्यांच्या स्वतःच्या जिवनास, आमच्या व इतर सर्व लोकांच्या जीवनास अधीक उपयोगी, अधिक किंमतीचें व अधिक मोलवान आहेत. ह्या श्रमाचा नाहक अपहार, दुसऱ्याच्या नाशास कारणीभूत होतो हें आम्ही विसरतो.

याचप्रमाणें आपण एखादें सन्माननीय थोर घराण्यांतील कुटुंब खेडें गांवांत रहावयास गेलें आहे असें मानूं अर्थात त्यांची रहाणी शहराप्रमाणेंच ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न रहाणार कदाचित येथें विश्रांती करतां आल्यानें निरुद्योगांत यांचा कालक्षेप व्हावयाचा. त्यानां आयतीच विश्रांतीची सबब सांपडावयाची.

या नवीन आलेल्या मंडळानीं शेतकऱ्यांचें साधें अन्न पाहून व आपल्यापेक्षां ते अधीक सुदृढ व सशक्त आहेत हें जाणून मनास कौतुक वाटेल. वाढणारें गवत, त्याचा सुटलेला वास, राखण करीत असलेल्या मुलींचा मंजूळ आवाज ऐकून व गवत कापणाऱ्या गड्यांच्या रांगा पाहून त्यांना अल्हाद होतो. त्यांना मात्र दिवसभर श्रम नसल्यानें आपल्या करमणुकीकरतां नाना उपाय योजावे लागतात.

खेड्यांत गवत कापण्याचें काम अत्यंत महत्त्वाचें गणलें जातें कारण हंगामांत कापणी वेळेवर होणें अपरिहार्य असते. जर गवत तयार झाल्यावर वेळींच कापलें नाहीं तर पाठीमागून येणारी कापणी चांगली येत नाहीं, गवत उठत नाहीं व आळसानें कापणीच राहिलीतर सर्वंध गवत बुडतें जेथें दोन दोन, तीन तीन कापण्या व्हावयाच्या तेथें एकच कापणी होते व शेतकऱ्यांचें भलतेंच नुकसान होतें.

ज्या मानानें गवत अधिक त्यामानानें जनावरांना चारा अधिक, ज्यामानानें चारा अधिक त्यामानानें दूध-दुभतें व अन्न अधिक. ही झाली सार्वजनिक बाब. परन्तु त्यांत शेतकऱ्याचें व्यक्तिविषयक हित असतेंच. ह्मणूनच त्यावेळीं, बायकामुलें ह्मातारीं कोतारीं सर्वजण आपआपल्या परीनें उद्योग करीत असतात. लहान लहान मुलें शेतांत बापाकडे भाकरी घेऊन जातांना गडबडीत दिसतात. आपलें भाकरीचें ओझें एका हातांतून दुसऱ्या हातांत करीत, मैल दोनमैल पळत जात असलेलीं आढळतात.

हें पहा येथें तीन लोक गवत कापत असलेले दिसतात. एक वृद्ध आहे, दुसरा त्याचा पुतण्या आहे. तिसरा एक चांभार आहे. ह्या गवताचे कापणीवर त्यांचे हिवाळ्याचें जीवित अवलंबून आहे, ह्मणूनच

त्यांची जिवापाड ओढाताण सुरूं आहे. झपाझप हंगामशीर गवत कापण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो, पण गवत बरेंच असल्यानें अधिक लोकांची गरज त्यांना भासते. सबब म्हाताऱ्यानें आपली एक मुलगी मदतीस बोलावली. पुतण्यानेंही आपली बायको व मेहुणी गरोदर होती तरी कामास पाठवली, चांभारानेंही आपली बायको व आई कामास आणली होती. आई ८० वर्षांची असून, तिला चांगलें दिसत नव्हतें व नीट उभाही राहतां येत नव्हतें. पण ती मुलाच्या मदतीस धाऊन आली. सर्वजण इमानेंइतबारें आपल्या कष्टाची शिकस्त करीत होते. पाणी पिण्यास वेळ दवडणें सुद्धां प्रत्येंकाला अवघड वाटत होते. बिचारी चांभाराची म्हातारी आपणास कामावरून दूर करूनये म्हणून हातातून विळा खालीं ठेवत नव्हती. बिचारीला तहान लागलीं त्या-वेळीं तिचा लहान नातू , त्याच्या वजनापेक्षां अधिक जड असा पाण्याचा तांब्या हेलकावे खात, या हातातून त्या हातात, करींत प्रसंगी वाटेंत ठेवीत, तिजकडें घेऊन येत होता. मुलगी डोक्यांवर गवताचा भारा घेऊन गवत गोळा करीत होती. तें वजन इतकें जड कीं, तिला वाटेंत टाकावे लागे. सर्वजण उन्हानें व्याकूळ झालेले, श्रमानें घामेजलेले कष्टानें वाकलेले व भावी फायद्याच्या आशेंत गुंतलेले दिसत होते. प्रत्येंकांस अतिश्रमानें दम लागलेला होता. बिचाऱ्या म्हातारीस पाउलही उचलेना तरीही ती रखडत तशीच काम करी.

एकदाचो संध्याकाळझाली आधी कोणी थांबावे हा प्रश्न होता शेवटी चांभारानें म्हाताऱ्यास सुटी करण्यास सांगितले ते ऐकून सर्वजण आपआपल्या कपड्यालत्याकडे निघाले त्यानी घरचा रस्ता सुधारला म्हातारीनें दमून अंग टाकले ज्या वेळी ही मंडळी निघाली

त्यावेळीं ती रखडत रखडत सर्वांच्या मागून जाऊं लागली.

हा प्रकार इकडे चालला आहे. शेतकरी दमून भागून घरीं जात आहेत. आपलें जनावर चुकून मालकाच्या घरांत शिरलें आहे म्हणून त्याला हाणण्याकरितां जों ते घराजवळ जातात, तों तेथें निराळाच प्रकार ऐकूं येत होता. बंगल्यांत पियानोचा आवाज निघत होता, मंडळी आनंदानें गप्पा गोष्टी करीत बसलीं होती, घरांत पाहुणे आले असल्यानें जिकडे तिकडे गडबड चालली होती जवळच गाडी-खाना होता तेथें गाडी उभी होती. चांगले पुष्ट घोडे सर्व नव्या सामानासह तयार होते. ही गाडी पाहुण्यांनीं १० रु. भाडें देऊन आणली होती. घोड्यांच्या गळ्यांतील घंटा सारख्या वाजत होत्या. त्यांच्यापुढें गवताचा ढीग पडला होता, व ते पायानें ओढून घेऊन तुडवून नास करीत होते. ज्या गवताबद्दल शेतकऱ्यांना इतका निढळाचा घाम गाळावा लागे व ज्याची रानांत कसोशीनें काटकसर चाले, त्या गवताची ही स्थिती चालू होती. घरांत गडबड धांदल सुरू होती. इतक्यांत एका मुलानें गाडीवानास घोडे जुंपण्यास सांगितलें, लागलीच दोन नोकर मोठ्या डौलानें पुढें आले व हळुहळू रेंगाळत गाडी जुंपण्याकरतां गेले.

तेथेंच दुसरा एक पियानोचा आवाज ऐकूं येत होता. एक तरुण मुलगी पियानो वाजवीत होती. तिला मुलांना शिक्षण देण्याकरतां ठेविलीं होती व तिचे हे तारा छेडणेचे काम चालू होते. जवळच दोन दाया, एक तरूण व एक वृद्ध, शेतात म्हातारीस पाणी देणाऱ्या मुलाच्या वयाच्या दोन लहान मुलांना निजवीत होत्या दोन माळी बागेची व्यवस्था करण्यात गुंतले होते, फुलावरून पाणी शिंपडत

होते. तेथेंच एक नोकर आपल्या लहान धन्याची बंदूक साफ करण्यांत गुंतला होता.

कपडे स्वच्छ धुण्याकरतां दोन स्वतंत्र बाया ठेविल्या होत्या त्यांनीं फक्त व्यवस्थित कपडे ठेवावयाचे व मळलेले कपडे गोळा करून स्वच्छ करावयाचे. उष्टीं व खरकटी भांडी घासून पुसून स्वच्छ करण्याचें काम दोन बायकांना आटपत नसे. चहाचे कप बशा, चमचे, काटे एकनादोन अनेक साधनें तेथें उपलब्ध होती, ती मोठ्या प्रमाणांत व मोठ्या किंमतीची होती. दोन पोशाख केलेले नोकर, चहा, कॉफी, दारू वगैरे पेयें ने आण करण्यांत गुंतले होते, माडीवर कांहीं मंडळी गप्पागोष्टी करींत बसली होती. कांहींनीं पत्याचे डाव सुरू केले होते, कांहीं आराम खुर्चीवर पडून हवेत सिगारचे धूर सोडीत होते. कांहींना वेळ कसा घालवावा हें समजेना ह्मणून ते घोड्याच्या गाडींतून सहल करण्याच्या विचारांत होते.

अशा तऱ्हेनें जवळ जवळ पंधरा लोक सशक्त, गलेलठ्ठ असे ऐदीपणानें कालक्रमणा करीत होते व आपल्या दिमतीस त्यांनीं जवळ जवळ तीस लोक गुंतविले होते. ज्यांचा प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचा व उपयोगाचा, असे तीस लोक निरूपयोगी उद्योगांत, चैनी पुरविण्यांत व ऐदी लोकांचें कोड कौतुक साधण्यांत गुंतविले होते. हा प्रकार एका खेडेगांवांत चालू होता. धान्य निर्माण करणारे लोक जीव जाईपर्यंत राबत होते, गरोदर बायका आपली अडचण बाजूस सारून राबत होत्या. लहान मुलें श्रमानें थकलेली होती. जें धान्य हजारों उपाशी मरणाऱ्या गरिबांना उपयोगी, ज्यांच्यावर शहरांतील लोकांची गुजराण होते, तें धान्य पिकाविणारे मजूर व शेतकरी, आळसांत लोळणाऱ्यांच्या दिमतीस !

खेड्यांत तरी" हा प्रकार चाललाच आहे याला कोण काय करणार" असें म्हणण्यास जागा नाहीं. येथें पूर्वी असला प्रकार मुळींच नव्हता. आम्ही आपल्या हातानीं शेतकऱ्याचे श्रम व त्यांच्या हातांतील अन्न हिसकाऊन घेत आहोंत. दुसरें अन्नास महाग असतांना, अर्धपोटी राबत असतांना, जिवापाड श्रम करीत असतांना, आपण ऐशआरामांत, चैनींत, आळसांत, आयुष्य घालवीत आहोंत. जणूंकाय त्यांच्या व आमच्या आयुष्याचा संबंधच नाहीं. आम्ही अशी चैन करतो, पैसे उडवतो, आळसांत बसून त्यांच्या श्रमावर जगतो म्हणूनच ते दुःखी आहेत. परंतु आम्ही डोळे उघडून पाहूं तर ! त्यांनी अशा हालअपेष्टा काढल्याशिवाय आम्हास चैन करतांच येणार नाहीं.

आम्ही प्राणिरक्षक संस्थेचे अभिमानी, रानटी स्थितींत रोमन लोकांनीं चालविलेली लूट वाचून आश्चर्य करतो. गुलामांचे चालविलेले हाल व त्यांचा क्रयविक्रय पाहून आमच्या पूर्वज्यांना आम्ही नाकें मुरडतो

**१ ज्यांची जगांत आपण एकटे नांदावें अशी इच्छा असते त्यांच्यावर परमेश्वर नेहमीं रुष्ट असतो. २ अत्यंत मादक पेयें मिळविण्याकरितां मोठ्या पहाटे उठून उद्योग करणारास अंती दुःखच होणार ३ ही सर्व प्रकारची करमणुकीची व चैनीची साधनें उपलब्ध असलीं तरी परमेश्वराची कृतीअगर त्याचा उद्योग लोक लक्षांत घेत नाहींत ४ दंभानें विरक्ता उत्पन्न करणारे व पापास प्रवृत्त होणारे सुखी कधींच होणार नाहींत ५ चांगल्यास वाईट व वाईटास चांगलें समजणारांचा उदय कधींच होणार नाहीं. उजेडाचा अंधःकार व अंधाराचा उजेड बनविणारे अथवा अन्नाचे विष व विषाचे अन्न करणाऱ्यांना**

**दैव कधींच हात देत नाहीं. ६ आपल्या स्वतःस शहाणा व धोरणी समजणारा कधींच उर्जितावस्थेस पोचत नाहीं. ७ आपले ऐश्वर्य दारू पिण्यांत व आपलें सामर्थ्य ती मिसळण्यांत जे खर्च करतात ते पापी होत. ८ लाचलुचपतीच्या लालसेनें दुष्टांचे समर्थन करणारा व गुणी लोकांचे अवगुण दाखविणारा नीच होय. परमेश्वर त्यास शासन करील.**

ही इझराईलचीं वचनें आह्मी नित्य ऐकतों. परंतु जणूं काय ती आपणाकरितां नव्हेत असेच समजून आह्मी चालत आहोंत. याचप्रकारचा उपदेश म. ख्राइस्तनेंही केला आहे. "कुऱ्हाड झाडाच्या मुळाशीं आहे. जीं चांगली फळें देणारीं नाहींत तीं तोडलीं जातील, व जळण जाळून टाकलें जाईल," असें तो ह्मणतो.

हा प्रकार किती दिवस चालणार? आम्ही ख्रिश्चन ह्मणवितों सुशिक्षित ह्मणवतों, व आमच्या बांधवांचे श्रम हिरावून घेतो. आमच्यांतील ध्येय **ह्मणजे अधिक संपन्न होणें,** सुखानें कालक्रमणा करतां यावी म्हणून संपत्ती सांठवून ठेवणें. जगांत आज चहुंकडे जीवनाबद्दल कलह चालू आहे. दिवसेंदिवस तो तीव्र होत आहे, आणि आपण या झगड्यातून अलिप्त रहावें ह्मणून श्रीमंत होऊं इच्छितों, संपन्न होऊं पहातों. आमचे ज्ञाती बांधव या झगड्यांतून, या जीवनकलहांत प्रत्यहीं लोक त्रस्त असतांना आह्मी असे अलिप्त किती दिवस राहणार! जी गोष्ट स्पष्ट आहे, ती आपण डोळ्याआड कशी करणार!

क्षणभर आपण शांत चित्तानें विचार केला तर आमचें आयुष्य व खरा ख्रिश्चन याचे आयुष्य यांत जमीन अस्मानांचे अंतर दिसेल.

सृष्टी क्रमांत परमेश्वरानें मनुष्यांस अशाच परिस्थितींत ठेविलें आहे कीं, त्याच्या उत्पत्तीपासून, हा जीवन कलह करावा लागला आहे व करावा लागेल. आपलें वस्त्र-प्रावरण, आपलें अन्न, आपला आश्रय हीं पहाण्याकरितां त्याला धडपड केलीच पाहिजे.

कोठेंही जावा, कोणताही काळ पहा, मनुष्याचें आयुष्य, मग तो युरोप, आशिया, चायना अगर पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही देशांतलि असो, रानटी स्थितींत ज्यावेळीं मनुष्यजात होती त्यावेळीं घ्या, अगर सुधारणेच्या अत्युच्च शिखरांस पोंचलेला आजचा काळ घ्या, एक गोष्ट निर्विवाद आहे व ती ही कीं, लोक जिवापाड श्रम करतात, अहोरात्र राबतात, पण त्यांना पुरेसें वस्त्र व पोटभर अन्न मिळूं शकत नाहीं. जगण्यांस पुरेसें साधन नसल्यानें अल्पायुषी लोक फार होऊं लागले आहेत. आपल्या सभोंवार आपण पाहिलें तर आह्मीं कोठेंही कोणत्याही समाजाचे घटक असूं, आम्ही नित्य लोकांच्या श्रमाचा विभाग खात आहोंत. सांठावितो आहोंत. त्यानें केलेली सावली असो अगर घर असो श्रमाशिवाय तयार झालें नाहीं खास. माझे बूट, माझें कापडचोपड आकाशांतून पडलेलें नाहीं. आमच्या करितां काबाडकष्ट करणाऱ्या; आपले नित्याचे निर्वाहाचें साधन मिळविण्याकरितां राबणाऱ्या; आपल्या पोराबाळांचें जविन चालविण्यास लागणारी चटणी भाकरी कां होईना पण ती मिळण्याकरितां अविश्रांत श्रम करणाऱ्या लोकांनीच तयार केलेलीं आहेत. त्यांचा जीवनकलह तीव्र स्वरूपांत अव्याहत चालू आहे. ती तीव्रता इतकी भासते कीं, त्यांचे भाऊबंद प्रत्यहीं अतिश्रमानें व अन्नाविणें मरतांना दिसतात.

परमेश्वरानें आपणास अन्नाचा अपुरा सांठा देऊन श्रम करण्यांस

उद्युक्त केले आहे अन्नाचा उपयोग बेताबेतानें व व्यवस्थीतपणें करून श्रमानें तो राखला पाहिजे **श्रमाचा अपहार ही नाशाची तयारी आहे.**

आमच्या पैकीं सुशिक्षित ह्मणविणारे लोक, श्रम न करतां प्रत्यहीं दुसऱ्यांच्या श्रमाचा फायदा घेऊन ऐदीपणानें आपला काळ कसा घालवितात याचें आश्चर्य वाटतें. असें करणें स्वाभाविक आहे असें ते कसें मानतात !

समाज कंटक व लुटारू म्हणवून न घेणाऱ्यांना, योग्य व नैसर्गिक असणारे श्रम न करण्यांस, दोनच सबबी आहेत. एक आपण, श्रम करणाऱ्या लोकांहून आचार विचारांनीं भिन्न आहोंत, आपलें आस्तित्व हें केवळ दुसऱ्या उपयोगांकरितां आहे, परमेश्वरानें निराळें समाजकार्य आपणास दिलें आहे. ही गोष्ट तरी मानली पाहिजे अगर श्रम व जीवनकलह टाळूं पहाणारे आम्ही, आपल्या समाजास या आमच्या ऐदखाऊपणाबद्दल भरपूर नुकसान भरपाई देतों आहोंत असें तरी मानलें पाहिजे. त्यांस या दोन्हीखेरीज तिसरें समर्थन नाहीं. पूर्वकालीं जे लोक स्वाऱ्या करीत व लूट मिळवीत ते आपल्या कृतीचें समर्थन करतांना, आपण जितलोकांपेक्षां भिन्न आहोंत त्यांच्या कल्याणा-करितां आपण आवतरलों आहोंत, असें सांगत. राज्य करून त्यांना शिक्षण देणेंची जबाबदारी आपलेवर परमेश्वरानें टाकीली आहे, असें दाखवीत. ते ज्या गोष्टी करीत त्या, ते घेणाऱ्या फायद्यापेक्षां अधिक महत्त्वाच्या आहेत असें भासवीत. जोंपर्यंत ह्या कल्पना पचल्या तोंपर्यंत त्या चालूं शकल्या. पण आतां तो काळ उरला नाहीं. **परमेश्वराच्या नांवाखालीं सांवळा गोंधळ आतां लोक घालूं देणार**

**नाहींत.** आपण सर्व सारखे आहोंत, एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहोंत, सर्वांचे हक्क समान आहेत, वगैरे कल्पना इतक्या दृढ झाल्या आहेत कीं, आतां थापा देऊन लोक झुलविणें शक्य नाहीं.

परंतु या कल्पनेचा ऱ्हास झाला तरी, आपण शरीरकष्ट न घेतां, दुसऱ्यांच्या कष्टावर जगण्याचा हक्क आपणास आहे ही कल्पना अद्यापी मूळ धरून आहे. त्याचें समर्थन निरनिराळ्या तऱ्हेनें करण्यांचा प्रयत्न चालू आहे. त्यापैकींच शास्त्राचा अभ्यास ही महत्वाची बाब आहे. पूर्वी धर्ममार्तंड, व न्यायशास्त्रज्ञ या गोष्टीचे पुरस्कर्ते होते, वेदांतीही याचा पाठ पुरावा करीत व हल्लीं प्रयोगशास्त्रेंही याच कल्पनेचा उदो करीत आहेत.

खरे ख्रिस्ताचे अनुयायी आपण आहोंत, आपणांसच सर्व लोकांच्या कल्याणाची व शरीर रक्षणाची काळजी केली पाहिजे असें वेदांती सांगतात. राजकारण, दिवाणी–फौजदारी कायदा, अंतर-राष्ट्रीय कायदा वगैरेही असेंच ह्मणतात, व हेंच ध्येय ते पुढें ठेवितात. या तत्वाचा पुरस्कार करणारा हेजेल होता. सर्व कांहीं कल्याणा-करितांच निर्माण झालें आहे. सरकार ह्मणजे व्यक्तीची परिणती करणारी संस्था असें तो प्रतिपादी.

आज अशी वेळ आली आहे कीं, एखादा शोध अगर एखादें नवें तत्व शास्त्रज्ञांनीं काढलें कीं, त्याच्या खरेखोटेपणाबद्दल अगर त्याच्या सत्यतेबद्दल चिकित्सा केली न जातां ते आंधळेपणानें ग्रहीत धरून त्यावर पुढील इमारत रचली जात आहे. असाच प्रकार मालथस याचा झाला. त्यानें अंदाजिक कल्पना बसवून कांहीं सिद्धांत प्रसिद्ध केला. त्यांत वैशिष्ठ्य अगर बुद्धिमत्ता विशेष उपयोगांत

आणलेली नसल्यानें आपोआपच ती नष्ट होईल, असें वाटत होतें. परंतु गेल्या अर्धशतकांत याचा प्रसार चहूंकडे झाला. व मालथसचें तत्व हें प्रमुख होऊन बसलें. लोकसंख्येची वाढ भूमितीश्रेढीनें चालू आहे व निर्वाहाचीं साधनें गणितश्रेढीनें वाढत आहेत, असें त्यानें प्रतिपादन केलें त्यानें लोकसंख्येचें प्रमाण कमी करण्याचे उपाय काढले व ते आज शास्त्रीय ह्मणून चहूंकडे मानले जातात. त्याच्या सत्यतेचा कोणींच विचार करीत नाहींत. जो तो हें तत्व ग्रहीत धरून त्यावरून आपलीं पुढील अनुमानें काढीत असतो. पण मूळ कल्पना चुकीची आहे, याचा विचार कोणी करीत नाहीं आळसांत काळ घालविणारे लोक या गोष्टीचा चांगला पाठ पुरावा करितात.

असें कां व्हावें ? हे शास्त्रीय शोध ह्मणावेत तर याचा संबंध लोकांच्या निसर्गदत्त बुद्धिसी येऊं शकत नाहीं त्यांच्या जन्मस्वभावांशीं यांचा मेळ बसत नाहीं. परंतु ज्यांना स्वतःची बुद्धी नाहीं ते भौतीक शास्त्र हे धर्मप्रमाणें आहे असेंमानून चालतात. तुमच्यासारख्या माणसानें ज्याच्या हातुन चूक होणें शक्य आहे अशानें ती केली आहेत व आपल्या विचारास ' शास्त्र ' हें नांव देऊन तें त्याचा मोठेपणा मिरवीत आहेत, हें लोकांच्या लक्षांत येत नाहीं. व्यवहारीक अनुमानांची कसोटी लावून जर पाहिली तर ही मालथसची उपपत्ती कसी स्वार्थ मूलक आहे हें स्पष्ट दिसणार आहे. दारिद्य हें श्रीमंत लोकांच्या राहणीच्या, त्यांच्या दंभाच्या व निघृणतेच्या योगानें आलेलें नसून मजुरवर्गाच्याच कृतीनें तें आलें आहे. माणसाच्या हातून तें होणारे नाहीं. जर झालें असेलच तर त्यांस मजूरवर्ग जबाबदार आहे असा निष्कर्ष त्यांच्या तत्वांनें निघतो. आपणास खावयांस मिळत नाहीं, हें जर

ठाऊक आहे, तर त्यांनीं जन्म घ्यावा कां! यांत श्रीमंत व बलिष्ट वर्गाचा दोष नाहीं. त्यांनीं आपल्यांत कांहीं एक बदल करण्याचें कारण नांहीं. आर्थांतच हें तत्व सुशिक्षित ह्मणविणाऱ्या आळसानंदांना पटतें. त्याच्या खरेखोटेपणाबद्दल चिकित्सा न करतां, अगर त्यांतील दोष न घेतां त्यांनीं तत्व ह्मणून हें प्रतिपादण्यास सुरवात केली व गेल्या अर्ध शतकभर शास्त्र या नांवाखालीं त्याचा चहूंकडे प्रसार केला.:

कोमटेचें तत्वज्ञान, डारवीनचा 'जिवन कलह' समाज शास्त्र, प्राणीशास्त्र, वगैरेचे उद्देश एकच, ती इतकी प्रिय होण्याचें कारण एकच, कारण ती माणसांस श्रमाची मुभा देतात व दुसऱ्यांच्या श्रमाचा उपयोग करून घेण्यांस शिकवतात व श्रम न करतां जगण्यास आयतेच प्रोत्साहन देतात ह्मणून या भौतिकशास्त्रांचा जन्म प्रथम त्यांच्या पुरस्कर्त्यांत होतो व नंतर लोकांच्यामधून अस्पष्ट व अनिश्चित अशा कल्पना पसरविल्या जातात. पूर्व कालांत राजा, धर्म, राजसत्ता ही जशी देवानें निर्माण केली आहेत त्याच्या खरेपणाबद्दल शंका घ्यावयाचीच नाहीं, मग ते कितीही जुलमी व अन्यायी असो ती मानून चालावयाचे, व तसें शिक्षण दिलें जात असे, तीच गोष्ट हल्लीं शास्त्रांची आहे. त्याचे पुरस्कर्ते हा प्रश्न विश्वासाचा ह्मणून मानण्यास सांगतात. लोकांमधून तत्वें ह्मणून तीं प्रतिपादलीं जातात. हेतू हाच कीं समाजाची स्थिती आहे तीच कायम रहावी त्यांत बदल होऊं नये.

या तत्वाची, या शास्त्रांची छाननी त्यांच्या पुरस्कर्त्यांमधून त्यांच्या आश्रयस्थानांतूनच होते. व लोकांमध्यें त्यांचा प्रसार मात्र विश्वासावर होत असतो. म्हणूनच 'श्रमविभागाचे' तत्व जन्मास आले व त्याचा प्रसार सुरू झाला. कांहींनीं मरेपर्यंत कष्ट करून

उपाशी रहावें, दुसऱ्यांनीं आयती बसून चैन करावी, हा प्रकार तत्त्व म्हणून, निसर्गसिद्ध आहे म्हणून, मानून चालावयाचे, ही शिकवण आम्हांस मिळाली.

या आळसाचें समर्थन, सुशिक्षित ह्मणविणारा समाज असें करतो कीं, आम्हीं ज्यामानानें दुसऱ्याचे श्रम घेतो त्यापेक्षां अधिक आम्हीं आपल्या समाजाचे हित व कल्याण करतो. आमची कामगिरी अधिक महत्वाची, अधिक किंमतीची व अधिक उपयोगी आहे.

या ह्मणण्यांत कितपत तथ्य आहे ते आपण पाहूं. जरा गोष्टींत त्याचे दोष आहेत एव्हडेच. रोमन लोक आपण दुसऱ्याच्या श्रमाचे मालक आहोंत ते घेण्याचा आम्हांस हक्क आहे, असे दोन सबबींवर प्रतीपादीत.

१. लोकांच्यावर राज्य करावयाचे व त्यांचे आत्मिक व लौकिक कल्याण साधावयाचे हे काम परमेश्वरानें आपणांस नेमून दिले आहे असे ते सांगत.

(२) दुसरे या गोष्टीची कल्पना जित लोकांना नसल्यानें त्यांना यांतील तत्वाचा भाग कळणार नाहीं. त्यांनीं आपलें मत या बाबतींत देऊं नये.

गरिबांचे श्रम किती घेतले जातात, व त्यांचे कल्याण किती होते हें जाणणेस जित अपात्र आहेत. आपले कल्याण कशांत आहे हें जितांना समजत नाहीं.

हाच नमुना थोड्या पर्यायानें आज ही हयात आहे. हल्लींचे लोक आपल्या कृतीचें समर्थन याच तत्त्वावर करीतात. ते ह्मणतातः-

(१) आह्मी सुशिक्षित आहोंत, आमच्यांत विशेष आहे. आह्मी

सुधारणा व प्रगती करीत आहोंत. समाजाचे कल्याण आमचेवर अवलंबून आहे. व ते आम्ही निरपेक्ष बुद्धीनें पार पाडीत आहोत.

(२) दुसरें असें कीं, सर्व साधारण जनतेला याची कल्पना नसते व म्हणूनच त्यांचे मत या बाबतींत ग्राह्य नाहीं.

आह्मी दुसऱ्याचें श्रमावर जगतो, पण त्या मानानें समाजाचें कल्याण करून आह्मीं त्यांचे उतराई होतो.

यांत आपणांस थोड्याशा शब्दाच्या मांडणी खेरीज फरक वाटतो काय ? जर फरक असेल तर तो एवढाच कीं, रोमन लोकां-मध्यें ही सत्ता अधिकारी, नोकर, धर्मोपदेशक, ह्या मध्यें विभागली होती. आतां मात्र सुशिक्षीत म्हणणाऱ्या एकट्या वर्गासच हा श्रमाचा फायदा मिळत आहे. दोन्हीतही तींच फसवेगीरी व तेंच असत्य आहे. फक्त दोष एवढाच आहे कीं, दुसऱ्यांना फायदा देण्यापूर्वी आम्ही आळसी बनून त्यांचे श्रमावर खात बसतो व मागाहून आमच्या या स्थितीच्या समर्थनार्थ लोककल्याणाची सबब पुढें आणीत असतों.

कांहींनीं दुसऱ्यांवर जुलूम करावयाचा, ही स्थिती पुर्वींप्रमा-णेंच आजही कायम आहे. आमचें समर्थन मात्र अधिक चुकीचें आहे. रोमन लोकांना, आपणांस देवानें पाठविले आहे ही सबब तरी होती. आमच्या सुशिक्षीतानीं, समतेचें तत्व प्रतिपादून ही दास्यश्रृंखला लोकांच्या पायांत ठोकिली आहे. शिक्षण देण्याच्या मिषानें ते समाजाच्या डोक्यावर बसले आहेत. त्यांचे श्रम घेत आहेत. याचें समर्थन नाहीं त्या लंगड्या सबबी सांगून ते कसे करणार ?

या म्हणण्याचा इत्यर्थ असा कीं, आम्हीं जो जुलूम जी सक्ती

आमच्याकरितां राबणाऱ्यावर करतो, त्याची प्रत्यक्ष जाणीव त्यांना होते. आम्हीं परत केलेलें त्यांचें हित मात्र त्यांना समजणारें व प्रत्यक्ष अनुभवास येणारें नसतें. हा सिद्धांत मोठा चमत्कारिक आहे.

ह्या सिद्धांताची सयुक्तिकता कितपत आहे याची आपण परीक्षा करूं. निरनिराळ्या वर्गांमधून याचें जें समर्थन होत आहे तें कितपत सार्थ आहे, तें आपण पाहूं.

राजा, धर्मोपदेशक, प्रधान, सेनापती, पोलीस, लेखक वगैरे लोक आपण धार्मिक व राजकीय बाबतींत लोकांना आमचें श्रम देतो. त्यांची प्रगती, रक्षण व शिक्षण त्यामुळें होतें असें ते सांगतात. लोंकानां वाटेल तो माल वाटेल तेथें किफायतशीर भावानें देऊन मदत करतो, असे व्यापारी ह्मणतात. आमची प्रत्येक बाब लोकांना अत्यंत आवश्य अशीच आहे. या प्रमाणें जो प्रत्यक्ष शारीरिक श्रम न करतां जगतो, तो आपली बाजू पुढें मांडतो प्रत्येकाचे ह्मणणें काय आहे हें आपण पृथक पृथक पाहूं.

दोन दृष्टीनें ही उपयुक्तता पाहिली पाहिजे. एक, फायदा मनुष्य आपल्या खुशीनें, स्वसंतोषानें देत असून तो घेणारा संतोषानें व स्वखुशीनें घेतो काय हे पाहिलें पाहिजे.

दुसरी बाजू ह्मणजे फायदा घेणाऱ्याचें अंतःकरण शुद्ध व सात्विक असून त्यांच्या मनांतून लोककल्याणच साधावयाचें आहे काय? ज्याचे श्रम ते घेत असतात त्याचा फायदा करून देण्याची त्यांची खरोखर बुद्धि आहे काय ?

राजा, राजसंस्था, धर्मसंस्था, अधिकारीवर्ग उदाहरणार्थ प्रधान, मंत्री, सेनापती, न्यायधीश वगैरे सर्व स्वतः शारीरिक श्रम न

करितां व जीवन कलहांत प्रत्यक्ष भाग न घेतां सुखानें कालक्षेप करितात, व आपला उद्योग याची भरपूर फेड करीत आहे असें ते ह्मणतात. जिच्या करितां हे उद्योग केले जातात ती जनता या फायद्याची कबुली देते काय ! बहुसंख्य समाज या गोष्टींचा उपयोग आपणांस आहे, त्याचा फायदा होतो हे जाणतात. परंतु या सर्वांचें प्रचलीत स्वरूप पाहिलें, ह्मणजे व्यक्तीशः या गोष्टींनी आपला फायदा झाला नसून, उलट या संस्थांनीं अपायच झाला आहे, असेंच सांगणारे लोक आपणांस भेटतील.

अशी कोणतीही शासनसंस्था नाहीं कीं, जिच्या दुष्परिणामा-बद्दल लोकांनीं ओरड केली नाहीं. कोणतीही धर्मसंस्था अशी नाहीं कीं लोकांनी ती आपल्यास अपायकारक आहे असे ह्मटले नाहीं. कोर्टें, व्यांका, कायदेमंडळ, पोलीस, कोणतीही बाब ध्या, कांहीं लोक तिला दुवा देणारे तर कांहीं हकाटी करणारे आहेतच. हे एखाद्या विशिष्ट देशांतच घडतें असें नसून सुधारलेल्या सर्व राष्ट्रांतून, अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, वगैरे देशांतूनहीं हाच नमुना अनुभवास येतो. लोकसत्तेचे पुरस्कर्ते, एकतंत्री शासनपद्धतीस नांवें ठेवितात, तर अल्पसंख्यराजपद्धतीचें लोक लोकसत्तेला नांवें ठेवितात. हाच प्रकार इतरांसंबंधीही आहे.

ही शासनसंस्था लोकांना सार्वत्रीक प्रिय अशी कधींच झाली नाहीं हें तर खरेंच. पण तिला आपलें आस्तित्व अत्याचारानें, जुलमाच्या जोरावर, तुरुंग, शिक्षा, फांसी, खून यांच्या जोरावर राखावें लागते.

अशा तऱ्हेनं शासन संस्था सर्वांच्या कबुलीनें, फायदा होतो

या कबुलीनें चालत नसून त्या पासून अपाय आहेत असें म्हणणारे कांहीं लोक आढळतात. दुसरें असें कीं **यांच्यामुळें जुलूम व जबरदस्ती अस्तित्वात येते**, म्हणून पहिली कसोटी लावतां ज्या बहुजन समाजा करतां हें आहे त्यांनाच हा फायदा कबूल नसून ते कुरकुरत आहेत.

दुसरी गोष्ट आतां आपण घेऊं. नोकर वर्गास प्रांजलपणें, त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीस स्मरून, ईश्वर साक्ष असें सांगू द्या कीं आपण जी नोकरी अगर उद्योग करितो तो केवळ निरपेक्ष बुद्धीनें, स्वार्थाची कल्पना न शिवतां करीत आहों. मग तो कोणताही हुद्देदार असो. त्याच्या डोळ्यापुढें लोककल्याण आहे काय? कां स्वार्थ आहे ?

सरळ लोक, स्वार्थच त्यांस कारण आहे असें प्रांजलपणे कबूल करतील. त्याही कसोटीस ही शासनसंस्था उतरत नाहीं. अतएव दोन्ही दृष्टीनें ती निरुपयोगी आहे.

मग कोणत्या सबबीवर ही संस्था उपयुक्त आहे असें मानण्यांत येते? जे त्याचा खरोखरी फायदा करून घेतात ते लोक याचा पाठपुरावा करतात व ही चळवळ आजतागायत त्यांनींच अस्तित्वांत ठेविली आहे. केवळ अस्तित्व हें कांहीं चांगुलपणाचें द्योतक नाहीं. अत्यंत अनिष्ट अशा संस्था आज तागायत हयात आहेत. गुलामगिरी, कुंटिणपणा, युद्धें हीं कोणीं चांगलीं म्हटलीं आहेत काय ?

धंदेवाईक, व्यापारी, बँकर्स, जमीनदार, आगगाड्यांच्या कंपन्या वगैरे सर्व प्रकारचे उद्योग धंदे करणारे लोक, आपण समाजाचें ऋणी नसून आपण घेत असलेल्या श्रमाची सव्याज फेड करतो असें तोंडानें

ह्मणतात. त्यांनाही आपली कसोटी लावून पाहूं.

पहिला प्रश्न, यांची उपयुक्तता कबूल केली जाते काय ? या प्रश्नास उत्तर देतांना राजसंस्थांचा पाठपुरावा करणारे लोक, ज्यांना याचा प्रत्यक्ष फायदा झाला आहे, त्यांच्याकडे बोट दाखवून असें ह्मणतील कीं यांना विचारा व फायदा झाला कीं नाहीं हें ठरवा. पण व्यापारी व व्याजबट्ट्याचा व्यवहार करणारे आपलें समर्थन कोणाच्या सबबीवर करतील ?

याच्या विरुद्ध दारू, आगगाड्या, रेशीम, कांचा, तोफा, वगैरेंचे फायदे कांहींना झाले असले तरी, दुसरे अधिक लोक याबद्दल ओरड करणारे आहेत. व्यापारी लोकांचा धंदा ह्मणजे, गरजू पाहून त्याचा फायदा घेणें.

जमीनदाराची हीच रड. शिवाय या गोष्टींचा संबंध नेहमीं अनाहितासीच येतो. शिवाय यांत होणारा जुलूम प्रत्यक्ष जरी नसला तरी अप्रत्यक्ष, अत्यंत वाइट व दुःखद आहे. कोणताही धंदा घ्या, तो गरजेचा फायदा घेत असतो. त्यावरच त्याची किफायत अवलंबून असते. गरजू पाहून किफायत करावयाची, गरजू पाहून स्वस्त दरानें खरेदी करावयाची, व्याजाचा दर गरजेप्रमाणें वाढतां असावयाचा. कोणत्याही बाजूनें तुम्ही पहा उद्योगधंद्याचा फायदा ज्यांच्याकरितां तो करतात असें म्हणणें आहे, त्या बहुजन समाजास मुळींच होत नाहीं. तो ते कबूल करत नाहींत. तो उलट अपायकारक आहे, असें त्यांचें म्हणणें आहे.

दुसऱ्या बाजूनें विचारच करण्याचें कारण नाहीं. कारण स्वार्थ हे त्यांचे उत्तरच स्पष्ट आहे. नोकर वर्गास आपण आपल्या स्वार्था-

........ सं. ........ ११

बरोबर लोकहित पाहतो अशी सबब तरी सांगतां येईल. आपले धन वाढवणें, या खेरीज व्यापाऱ्यांचा दुसरा हेतु तो काय असणार ! धंदेवाल्यांचा असा निकाल लागला. तथापि ते आपण अतिशय लोकांच्या उपयुक्त धंदे करतो व आह्मांस प्रत्यक्ष कष्ट न करतां जगण्याचा हक्क आहे असे जोरानें प्रतिपादताना आढळतात.

आतां आपणं शास्त्रज्ञ व कलावंत यांच्याकडें वळूं. सार्वजनिक कार्य आपण करीत आहोंत असे ते म्हणतील, पण हें त्यांचे ह्मणणें धाडसाचें व चमत्कारिक आहे.

आपला उद्योग अत्यंत महत्त्वाचा व अत्यंत जरूरीचा आहे असे इतरांप्रमाणेंच ते म्हणतील. मनुष्याचें अस्तित्व ह्याखेरीज शक्य नाहीं. असेंही ते सांगतील. पण ज्यांच्याकरितां हा उद्योग करण्यांत येतो त्या सामान्य जनतेला यांच्या उपयुक्ततेबद्दल, विचारलें तर त कांहीं फायदा नाहीं, असें स्पस्ट सांगतील. बाकीच्यांचा प्रत्यक्ष संबंध तरी येत होता. पण या शास्त्रांचा या कलांचा संबंध तर नाहींच पण अप्रत्यक्ष त्याचा कांहीं उपयोग आहे, हेंही सामान्य जनतेस माहीत नाहीं. कांहीं विविक्षित मोठ्या लोकांना, श्रीमंत लोकांना, त्यांचा पुरस्कार करणाऱ्यांना, कांहीं फायदा होत असल्यास कोण जाणें. ज्यांच्या खांद्यावर बसून शास्त्रज्ञ व कलावंत आपल्या आयुष्याचा मार्ग आक्रमण करीत असतात, त्यांना त्यांचा फायदा कांहीं नसून उलट या कला व हीं शास्त्रें निरुपयोगी आहेत, असें त्यांचें मत आहे. ते याच दृष्टीनें शाळा, कॉलेजे, विश्वविद्यालये, चित्रकला वगैरेकडे पहातात

हा उद्योग करण्यांत शास्त्रकार व कलावंत यांचा काय उद्देश आहे असें विचारलें तर त्याचें उत्तर ते फारच मजेदार देतील.

अधिकारी असें म्हणूं शकेल कीं, माझ्या स्वार्थाबरोबर दुसऱ्यांचें हितही मी पहातो. व्यापारी, धंदेवाला ह्मणेल कीं माझा स्वार्थ जरी असला तरी त्यांत लोकहित आहेच. पण यांना विचारलें तर आपल्याशिवाय जग चालणार नाहीं असें ते ह्मणतील. लोकांना त्यांच्या उद्योगाचें यत्किंचितही ज्ञान नसलें तरी हें ते जोरानें प्रतिपादितात. खरी कला व खरें शास्त्र यांचा हेतु लोकोपयुक्तता, हाच असला पाहिजे. सत्य काय आहे हें त्यांनीं पाहिले पाहिजे. आपला आवडता उद्योग करून लोकांच्या उपयुक्ततेच्या गप्पा मारून ते कालक्रमणा करीत असतात. आपल्या पवित्रपणाबद्दल त्यांची इतकी खात्री असते कीं, उपयुक्तता असो वा नसो, त्यांना समाजानें पोसणें हें समाजाचें कर्तव्य व तें बजावण्यांस लावणें हा त्यांचा हक्क आहे असें तें सांगतात. अशा तऱ्हेनें शास्त्रज्ञ व कलावंत या कसोटीला उतरत नाहींत. निरुपयोगी बांडगुळाप्रमाणें समाजाचें ते घटक आहेत.

अशा तऱ्हेनें लोक आपल्यावरची शरीर कष्ट करण्याची जबाबदारी टाळतात. व ती जबाबदारी कष्ट करणारे मजूर आपले शिरावर घेतात. आपले उद्योगाचा फायदा त्यांना होत नसला तरी समाजानें त्यांचे देणें असल्याप्रमाणें, ते आपला चरितार्थ त्यांचेवर लादतात, व आपलें करणें योग्य आहे असे भासविण्याचा शक्य त्या उपायांनीं प्रयत्न करतात.

शासन संस्थांत भाग घेणारे लोक, आपल्या ऐदीपणानें समाजाच्या दुःखांस कारण तर होतातच पण त्या शिवाय जुलूम व जबरदस्ती समाजावर चालवितात.

धंदेवाले व्यापारी स्वार्थानें प्रेरित होऊन आपला उद्योग

करितात. व आपला चरितार्थ चालवून वर गरिबांचे श्रम घेतात. त्यांच्या गरजेचा फायदा घेऊन, आपल्या संपत्तीची वाढ करितात.

शास्त्रज्ञ व कलावंत यांना आपली उपयुक्तता पटवून देण्याचें कारणच नाहीं. कारण लोकांना उपयोग असो नसो, त्यांना तें योग्य वाटलें कीं झालें. त्यांचा उपयोग समाजास काय आहे, हें लोकांना समजतही नाहीं. ते मात्र आपली महती गातात. व समाजाचें होणारें अनहित बाजूस सारून फुकट खाण्याचा आपला हक्क आहे असें ते सांगतात. **जो तो आपण अधिक उपयोगी म्हणतो व आपला समाज्यांवर जगण्याचा हक्क अबधीत आहे असें प्रतिपादन करतो.**

वास्तविक विचार करतां या सर्वांना पोसण्याची काय अवश्यकता आहे. ? त्यांना तसें म्हणण्याचा काय अधिकार पोंचला !

परंतु असें असून ते आज समाजावर आपला चरितार्थ, लादत आहेत. व आपली असें करण्याची सयुक्तिक पटवीत आहेत. याच्या मुळाशी कांहीं तरी भ्रामक कल्पना असली पाहिजे हेंच खरें.

ग्रा. क्र. 54028

# आत्मसमर्थन.

दुसरे आपणाकरितां श्रम करितात, ते त्यांनीं केले पाहिजेत असे श्रीमंत अगर पांढरपेशे लोक समजतात, येवढेंच नव्हे तर त्यांनीं आपले समर्थन करण्याकरितां तीन सिद्धांताचीं मांडणीही केलेली आहे.

फार प्राचीनकाळीं पहिल्या सिद्धांताचा पाठपुरावा धार्मिक लोकांनीं केला परमेश्वरानें माणसांचे वर्ग निसर्गत:च केलेले आहेत. कोणास राज्य करण्याचें काम नेमून दिलेलें आहे, तर कांहींना त्या आज्ञा पाळण्याचे काम नेमून दिलेलें आहे. हें सर्व ईश्वरी प्रेरणेनेंच होते. सूर्य, चंद्र, तारे हे जसे परमेश्वरानें निर्माण केले आहेत त्याच प्रमाणें हे माणसांचे प्रकारही त्यानेंच केलेले आहेत, असें त्यांचे म्हणणें आहे.

दुसरें समर्थन ह्मणजे राजनीतीचें तत्वज्ञान. याचा पुरस्कर्ता हेजेल हा होता. जें कांहीं दिसतें ते सर्व सयुक्तिक आहे, आज जी आपली राहणी आहे ती माणसाच्या कृतीनें नसून परमेश्वराच्या इच्छेनुसार झालेली आहे, असें त्यांचे ह्मणणें होतें; परंतु विचारी लोकांनाही हें ह्मणणें पटलें नाहीं.

तिसरा सिद्धांत आत्मसमर्थनार्थ पुढें येतो तो या दोन्हीहूनही विचित्र आहे, त्याचें प्राबल्य अत्यंत वाढलेलें आहे. व त्याचा पुरस्कार शास्त्रज्ञ व कलावंत करीत असतात. यांस **शास्त्रीयसिद्धांत** ह्मणण्यास हरकत नाहीं, त्या वेळच्या परिस्थितीमध्यें फ्रान्समध्यें लोकांचें बंड उपस्थित झालें व सर्व युरोपखंड या वणव्यानें पेटलें. संपन्न वर्गानें

आपणांस शासनसंस्थेचा पाठिंबा मिळावा व आपलें वर्चस्व कायम रहावें म्हणून शास्त्र या कल्पनेचा परिपोष केला.

शासन-संस्था लोककल्याणाची सबब सांगत. धर्मसंस्था आत्म-कल्याणाची सबब सांगत. लष्कर हें संरक्षणाची जरूरी दाखवी. एवंच त्यांना आपलें अस्तित्व राखण्यांस सबबी होत्या. परंतु या बिचाऱ्यांना बरेच दिवस कांहीं कारण सांपडेना. एक शतकानंतर, या सधन वर्गांची, ज्यांचा संबंध, शासन-संस्था, धर्मसंस्था, संरक्षणसंस्था यांसी पोंचत नव्हतां, त्यांची संख्या वाढली व तो एक बलवान वर्ग निर्माण झाला. त्यांनीं वरील तीन संस्थामधील वैगुण्य हुडकून, आपलें अस्तित्वाची जरूरी लोकांपुढें मांडली. लवकरच त्यांनीं आपला जम बसविला व ऐदखाऊपणाचा आपला हक्कच केवळ प्रस्थापित केला नाहीं तर ज्या संस्था पूर्वीं आपलें समर्थन निरानिराळ्या सबबीवर करत होत्या त्यांना आपलें अस्तित्व सांभाळण्याकरितां या लोकांची सहानुभूती मिळ-वावी लागली. व पुढें हा वर्ग इतका वाढला कीं, या तीन संस्थाची ईश्वरी निर्मिती बाजूस सारून, त्या निरुपयोगी, अन्याय्य व दुष्प-रिणामी आहेत असें हेच लोक सांगू लागले. या संस्थांना आपली उपयुक्तता पटविण्याकरितां शास्त्राकडे धांव घ्यावी लागते. त्याशिवाय त्यांना शिक्कामोर्तब नाहीं. आतां या नव्या शास्त्राशिवाय त्यांना तरुणो-पाय नाहीं; मध्ययुगांत जशी धर्मसंस्थांची कांस धरावी लागे तशी आतां या शास्त्राची धरावी लागते. कोणत्याही गोष्टीस प्राधान्य येण्याला त्याची रचना शास्त्रीय दृष्टीच्या झाली पाहिजे शास्त्राधाराशिवाय महत्व नाहीं. मनुष्यानें शास्त्राचें देणें दिलें पाहिजे, त्याच्या यज्ञकुंडावर आपला बळी दिल्याशिवाय पावन होणें शक्य नाहीं.

आज काल जगांत जर महत्व असेल तर एका गोष्टीला. व तें म्हणजे शास्त्र. अर्थातच यांत भाग घेणाऱ्यांना आतां इतरांपेक्षां लोकांच्या श्रमाचा भाग उचलण्यांस हक्क आला. हा हक्क विशेषतः प्रयोग-शास्त्र, उतक्रांती-शास्त्र, चिकित्सा-शास्त्र वगैरेंचा हक्क अबाधित झालेला आहे. पाठोपाठ कलावंत आलेंच. ह्या शास्त्राच्या पायावर आज श्रीमंत व सुशिक्षित लोक आपल्या ऐदखाऊपणाचें समर्थन करितात. धार्मिक लोक व वेदांती हे आतां आपली चळवळ करण्यास लाजूं लागले आहेत. त्यांना आपलें समर्थन बेताबेतानें करावें लागत आहे. परंतु साऱ्यांना मागें टाकून व आपल्या जोरावर शास्त्रांनीं डोकें वर काढलें व जगांत पाहिला नंबर पटकाविला.

धार्मिक समर्थनांत धर्ममार्तंड, कांहीं लोकांना राज्य हांकण्यास तर कांहींना त्यांच्या आज्ञा पाळण्यांस, कांहिंना सुखानें रहाण्यांस तर कांहींना दुःख व दारिद्र्य भोगण्यास लावीत. धर्म या नांवाखालीं लोक त्याला मान तुकवीत. व देवाचें करणें ह्मणून त्याची चिकित्सा होत नसे.

राजसत्तेच्या समर्थनाच्या मुळाशीं निसर्गाची बाब होती. संपत्तीचें वर्गीकरण, संपत्तीची वांटणी ही मनुष्यानें केलेली नसून ती इतिहासाच्या आरंभापासून आतांपर्यंत चालू आहे. हीच गोष्ट मनुष्याच्या हिताची आहे. यानेंच त्याचें आत्मिक व लौकिक हित साधलें असें ते ह्मणत व लोकांचा सहाजिकच विश्वास बसे.

वरील सर्व गोष्टी मूर्खपणाच्या व भ्रामक आहेत असें शास्त्र ह्मणतें. समाजशास्त्राचीं सर्व भिस्त प्रयोग शास्त्रावर, चिकित्साशास्त्रावर आहे, समाजशास्त्र, प्राणीशास्त्र, वगैरेचा अभ्यास मानवीकल्याण

व मानवी परिणती कशांत आहे हें शिकवील. यांत उत्क्रांती अद्यापी व्हावयाची आहे. ' श्रम विभाग ' हें एक महत्वाचें तत्त्व असून त्याचा उपयोग समाजाची घडी चांगली बसण्यांस होणारा आहे, असें शास्त्रज्ञ म्हणतात. कांहीं लोक श्रीमंत, कांहीं दरिद्री, कांहीं स्वतः शरीर कष्ट करणारे तर कांहीं आळसांत दिवस काढणारे, ही विषमता, परमेश्वरानें अगर राजशासन संस्थांनीं निर्माण केली नसून याच्या मुळाशीं श्रमविभाग आहे, व मनुष्याचें अस्तित्व कायम राहण्यास याची अत्यंत जरूर आहे. कांहीं शारीरिक कष्ट करितात तर बाकीचे बौद्धिक उद्योग करीत असतात.

ह्या तिसऱ्या समर्थनाचा उपयोग आज चोहोंकडे दिसून येतो.

ख्रिस्तानें नवीन शिकवण दिली व ती गॉस्पेलस मधें नमुद झाली. याची चिकीत्सा होऊन, मनुष्याच्या व पहिल्या देवदूताच्या अधःपाताची हकीगत सांगण्यांत येऊं लागली व ही ख्रिस्ताची शिकवण म्हणून लोक मान्य करूं लागले. मनुष्य जरी पतित असला तरी त्यांस ख्रिस्ताचा आधार आहे. असें या वरून ठरते, व ही गोष्ट नैतिक शिक्षणांस पराङमुख झालेल्या समाजाला, ढोंगी समाज सुधारकांना उपयोगाची झाली. ते सत्य म्हणून याचा पुरस्कार करूं लागले, ही दैविक गोष्ट आहे असें मानूं लागले. या गोष्टीमुळें वेदांत्या मधें फूट पडली व रणें माजलीं, जो तो आपआपला नवीन मार्ग काढूं लागला, दुसऱ्याच्या मार्गाबद्दल गैर विश्वास दाखवूं लागला. त्यांची त्यागांच याची स्पष्टता होईना, परंतु समुदायांत मात्र आपले ह्मणणे खरें आहे असें म्हणून, पटवून देण्याचा प्रयत्न करीत परंतु एक वेळ असी आली कीं हा फसवेगिरीचा बाजार सारा उघडा

झाला, लोकांना यांतील लौच्य कळून चुकले, जो तो आपल्या अंधविश्वासाबद्दल पस्ताव पावूं लागला.

हाच प्रकार तत्वज्ञानाचा झाला. तत्वज्ञान म्हणजे साक्रेतीस, एपिक्टेटस, कानफ्युसिअस, यांनीं मांडलेले सिद्धांत अगर नीतिशिक्षण नसून आधुनिक विद्वान म्हणविणारांनीं, सुशिक्षितांनीं, जी तत्वज्ञानासंबंधीं कल्पना प्रसृत केली तें होय. त्या तत्वज्ञान्यांचीं दृष्टी श्रीमंत लोकांच्याकडे होती. त्यांना सोईस्कर व हिताचें तत्वज्ञान बनूं लागलें. लवकरच सुशिक्षित वर्गांत या स्वार्थी तत्वज्ञानाचा फैलाव झाला. या तत्वज्ञानानें आहेत या गोष्टी सयुक्तिक आहेत, त्यांत वाईट कांहीं नाहीं. मनुष्यानें वाईट गोष्टीशीं झगडण्याचें कारण नाहीं. फक्त आत्मोन्नती केली, म्हणजे झालें वगैरे तत्वांचा पुरस्कार केला.

रूसो, पास्कल, लेसींग व स्पिनोझा यांचें तत्वज्ञान व शिकवण लोकांना माहित होती. परन्तु लोकांचे चित्त त्यांनीं वेधलें नाहीं. हेजेलच्या तत्वांचा जो प्रसार झाला तो त्यांतील सत्यामुळें झाला असाहि प्रकार नाहीं. त्याच्या तत्त्वाप्रमाणेंच फिचटे, शॉपेनहोअर यांच्या शिकवणी होत्या. त्याचा फैलाव होण्याचें एकच कारण व तें म्हणजे त्याची तत्वें हीं श्रीमंतांच्या कारणीं लागणारी होती, त्यांना आपल्या वर्तणुकीचें समर्थन करितां येत होतें.मनुष्यांत असणारें दोषावर तीं पांघरूण घालीत होती म्हणून त्यांचा जिकडे तिकडे उदोउदो झाला. व लहानापासून थोरापर्यंत हेजेलचे नांव माहित नाहीं असें सहसा होत नसे. सर्व कांहीं ठीक चाललें आहे, आहे तें चांगल्या करितांच, यांत कोणी कोणास दोष देण्याचें कारण नाहीं असें, हेजेल म्हणे. ही सवलत हें समर्थन आपल्या मनसोक्त वागण्यांस मिळाल्यावर लोकांना ते कां पटणार

नाहीं ? ' अधःपतनापासून मुक्तता ' हें तत्त्व जसें वेदांत्यांनीं उपदेशिलें व कांहीं काळ लोकांच्या स्वार्थसाधनामुळें तें फैलावलें यांतलिच हा हेजेलच्या तत्वांचा मनोरा होता. त्याप्रमाणेंच त्याची गती झाली. लोकांचा विश्वास उडाला व हें तत्वज्ञान निरुपयोगी ठरलें.

मला ज्या वेळीं कळूं लागलें त्यावेळीं हेजेलची चलती होती मासिकें, पाक्षिकें, दैनिकें सर्व ठिकाणीं हेजेल अवतरला होता. कोणत्याही गोष्टीस आधार ह्मणजे हेजेल. लहान, थोर सर्वांच्यामुखीं त्याचें नांव. परन्तु ४० वर्षांचा काळ गेला नाहीं तोच त्याची आठवणही बुजून गेली. आतां जर कोणांस हेजेलबद्दल विचारलें तर त्याला त्याची माहिती असणार नाहीं.

कालाच्या पोटांत हेजेल व त्याचीं तत्वें नाहींशीं झालीं. त्याचा पाया शुद्ध नव्हता असें हल्लींचे शास्त्रज्ञ ह्मणतील. आतां आमची मदार चिकित्सा-शास्त्रांवर, प्रयोगानें सिद्ध होणारी आहे. आतां फसवेगिरी चालणार नाहीं, साधणार नाहीं. आमचा मार्ग शास्त्रशुद्ध आहे. तोच सत्याचा मार्ग आहे. यांतच मनुष्याचें कल्याण आहे असें ते सांगतील.

ह्याच गोष्टी वेदांतीही प्रतिपादित असत. त्यांच्यातही शहाणे लोक होते. त्याचप्रमाणें इतर संस्थाही आपआपल्या परीनें आपलीं तत्वें प्रतिपादीत होत्या. हुशार लोक नवी कल्पना काढीत. सामान्य जनता त्यांचे अनुकरण करी. हा प्रकार कित्येक वर्षे चालू आहे. याचें कारण काय ? एकाच गोष्टींत या सर्वांचें मर्म आहे. ती गोष्ट म्हणजे, वाईटांवर आच्छादन घालून, लोकांचे दोष छपवून, त्यांना उजळमाथ्यानें वावरतां येत होते. त्यांना मनसोक्त आचरण करण्यांस

मिळत होते. अशी संधी ज्यांनीं आणून दिली त्यांच्या पाठीमागें कांहीं काळ लोक राहणारच. ज्यावेळीं या स्थितीचा अतिरेक होतो, त्या वेळीं लोक जागे होतात, व चिकित्सकबुद्धिनें त्याकडे पाहूं लागतात. सहाजिकच त्यांतील लबाडी उघडकीस येते व त्याबरोबरच त्याचा नाश सुरू होतो. एक कल्पना नष्ट झाली कीं दुसऱ्या रुपांत हे हुशार लोक तिचें रुपांतर करतात. व हा मार्ग असाच अखंड चालतो. शास्त्रज्ञांची हीच तऱ्हा नाहीं काय ?

उत्क्रान्तीवाद हा या विषमतेचा, एकानें दुसऱ्यावर चढाई करण्याचा पाठपुरावा कसा करितो याचें आश्चर्य वाटतें, परंतु त्यांत विशेष नाहीं. वस्तुस्थितीचें निदर्शक शास्त्र आहे, असें वाटतें, पण ते केवळ वाटणें आहे.

धार्मिक संस्था याच मार्गाचा अवलंब करीत होत्या. त्याही आपले परीनें 'आपण तत्वे प्रतिपादीत आहोत, मनुष्याचें आयुष्याचा विचार आपण करीत नाहीं. सत्य हेंच आमचें ध्येय' असें ते सांगत पण तें खरें होतें काय.

त्याच स्थितींत वेदांत निर्माण झाला. त्यानेंही हेंच सांगितलें. पण शेवटीं सत्य उघडकीस येतांच त्यांचा पाडाव झाला. सत्य हें त्रिकालाबाधित आहे.

हीच स्थिती हेजेल व मालथस यांच्या तत्वज्ञानाची, विशेषतः मालथस याचें ह्मणणें, व त्याचे विचार यांची गती काय झाली हें पहाण्यासारखें आहे.

फक्त कांहीं गोष्टींचाच विचार करून भागणार नाहीं. सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे. जर वस्तुस्थिती पहावयाची तर तिचा

सं. ता. १०० ता पे.

सर्वांगीण विचार करावयास नको काय ? आपणांस [illegible] पाहिजेत त्याच गोष्टी घेऊन कसें चालेल ? शास्त्रज्ञ सर्व बाजूनीं विचार न करितां विवक्षीत गोष्टविरून अनुमानें काढतात व ती प्रमाण धरून पुढील मांडणी आंखतात. शास्त्र त्या वेळची वस्तुस्थिती लक्षात घेतें हे खरें पण सर्व परिस्थितीचें परिशिलन केले जाणारी हीच स्थिती वेदांती व धर्मोपदेशकांची होती.

प्रत्येक पंथाच्या मुळाशीं कांहीं तत्व हे असतेच, परन्तु शहाणे म्हणविणारे लोक त्यापासून जी प्रमेयें काढतात, कित्येकवेळां वस्तुस्थितीचें पूर्ण ज्ञान नसतांहि ती काढण्यांत येतात, ती मात्र चुकीची व घोवयाची असतात मुळांशीं तत्व हे असतेच. हीच स्थिती आजच्या शास्त्रांची आहे. तत्व त्यांत आहेच, पण ते नकळतां, नसमजतां, समजून घेण्याची तसदीही नघेतां तें मांडण्याचा प्रयत्न होत आहे.

त्याची उपपत्ती अशी आहे. मनुष्यजात ही एक त्रिकालाबाधीत विशिष्ठ रचना आहे. प्रत्येक मनुष्य हा त्याचा घटक आहे. प्रत्येकास ही रचना व्यवस्थित चालावी म्हणून कांहीं कामें नेमून दिलेली आहेत.

ज्याप्रमाणें मुंग्या, माशा व माणसाळलेली जनावरें याजमध्यें कामाची विभागणी दिसून येते, त्यांतलि राणी अंडी घालते, नर तिचा सांभाळ व संवर्धन करितो, व कामकरणारे सर्व समाजाकरितां उद्योग करीत असतात त्याच प्रमाणें मनुष्य हाही इंद्रियविशिष्ट प्राणी असल्यानें त्याच्या घटकांनीही अशीं विभागणी करून घेतली पाहिजे. म्हणूनच मनुष्याची परिणती करण्यांस त्या संघाचा, या विशिष्ट

रचनेचा अभ्यास केला पाहिजे. याचा अभ्यास केल्यास आपल्यास त्या मानवी रचनेची बरोबर कल्पना येईल. या सर्वांचा उद्देश एकच -कीं मानवांची ही विशिष्ट रचना बनलेली आहे. प्रत्येक घटकानें विशिष्ट काम करणें जरूर आहे. श्रमविभागांशिवाय ही रचना व्यवस्थित चालणार नाहीं. जरी मानव जातींत कांहीं आक्रमणें, अत्याचार व निर्घृणतेचे प्रकार होत असले तरी, ही रचना वाईट आहे असे म्हणून चालणार नाहीं. ही वस्तुस्थिती रहाणारच. श्रमविभागाचे तत्व अबाधित आहे असे तें म्हणतात.

वेदांत ह्याच गोष्टीं सांगत होता, त्याच्यावरचा विश्वास उडाला. शास्त्र या गोष्टीं सांगते म्हणुन ऐकावयाच्या कीं काय ? हें विचारी माणसास कसें पटणार ! मानव जातींतील अतिक्रमणें, एकानें दुसऱ्याचें श्रम लुटावयाचे, त्याच्या श्रमावर आपण जगावयाचे, श्रम करणारा अर्धपोटीं मरत असलेला पहावयाचा, या गोष्टी कशा सम्मत व्हावयाचा.

" माझा उद्योग, मग मी तमासगीर असो, गवई असो, मास्तर असो तत्वज्ञानी असो अगर अधिकारी असो, माझा उद्योग मी करून समाजाचें ऋण मी फेडीत आहे. मी बौद्धिक कामें करतों; तर मला समाजानें पोसावयास नको काय ? " असें शास्त्रज्ञ म्हणतात.

शास्त्राच्या डळमळींत पायावर उभारलेलें हें म्हणणें, आपणास मान्य करतां येणार नाहीं. याच नवीन पंथाचा अवलंब करून चालू असलेलीं आक्रमणें, अत्याचार व आळस यांचा पाठपुरावा होत आहे.

हाच पंथ उत्पन्न होऊन अवघीं पन्नास वर्षें झालीं. याचा

आरंभ फ्रेंच शास्त्रज्ञ कोमटे यानें केला. विचारांच्या मानव शास्त्राच्या आधारें व पुरातन काळीं व्यक्त झालेल्या कल्पनेच्या जोरावर त्यानें मानवी जातीची रचना, ही एक विशिष्ट रचना परमेश्वरानें निर्माण केली असून, त्यांतील व्यक्ति ही घटक आहे व प्रत्येक घटकाचे व्यापार स्वतंत्र असून ते या रचनेस पोषक आहेत असें त्यानें प्रतिपादण्यास सुरवात केली. त्याला व्यवस्थितपणाची फार आवड असे व धार्मिक बाबींचा तो फार भुकेला होता. हा विचार त्यास इतका पटला कीं, त्यानें एक निराळा पंथच तयार केला व या मार्गानें त्यानें इतकी पुढें मजल मारली कीं, मुळांत असलेली ही लहानशी कल्पना तो पार विसरला. ही कल्पनाच त्यानें सिद्धांत म्हणून धरून त्याच्यावरून तो निरनिराळीं प्रमेयें काढूं लागला.

त्याच्या म्हणण्याप्रमाणें, मानवी जातीची एक विशिष्ट रचना असल्यानें, मानव म्हणजे काय, व निसर्गाशीं त्याचे संबंध कशा तऱ्हेचे आहेत, याची कल्पना या रचनेच्या अभ्यासानेंच येणारी आहे. याचा अभ्यास पूर्ण व्हावयास सहधर्मी इतर खालच्या कोटींतील रचनांचा विचार झाला पाहिजे.

प्रथम कोमटेनें साधित अनुमानावर आपली भिस्त ठेविली व प्रयोगशास्त्र त्यानें आधारभूत धरलें. दुसरे असें कीं या शास्त्राचें उद्दिष्ट म्हणजे मानव जातीच्या रचनेचा अभ्यास. पूर्वीचे सर्वज्ञान निरुपयोगी आहे असें हें शास्त्र मानते. या शास्त्राचे दृष्टीनें विचार केल्यास मनुष्यजातीच्या इतिहासाचे दोन विभाग करतां येतील.

१ एक वेदांती व आत्मविद्येच्या पुरस्कर्त्यांचा, कोमटेच्या हयातीपर्यंतचा काळ.

२ दुसरा हल्लींच्या खऱ्या शास्त्राचा प्रत्यक्षानुभूतीचा काळ, त्याची सुरवात कोंमटेपासून झाली.

ही गोष्ट, ही मांडणी फारच मनोहर आहे खरी. फक्त एकच त्यांत दोष. या सर्व गोष्टींची उभारणी, हा सुंदर मनोरा वाळूच्या पायावर उभारला आहे. अस्वाभाविक अशा प्रमेयावर, मनुष्यजात म्हणजे एक इंद्रियविशिष्ट रचना आहे. या कल्पनेवर, ही विचारसरणी उभारलेली आहे.

ही प्रमाण ह्मणून मानली जाणारी गोष्ट; आभासांवर, भ्रमावर बसविलेली आहे. कारण कोणत्याही इंद्रियविशिष्ट रचनेस एक संवेदना उत्पन्न करणारा मध्य असतो. तो या मानव वंशांत नाहीं. सबब इतरांची तुलना मानव जातीशी करतां येणार नाहीं. आम्ही हत्तीला अगर जंतूना विशिष्ट रचनेंत कां गणतो तर तुलनात्मक दृष्टीनें विचार करतां, एकाच प्रकारच्या संवेदना व जागृति ( समज ), जीं आपणास माहीत असतात. तीं त्यांच्या ठिकाणीं आढळतात म्हणून.

हें वैशिष्ठ्य मानव जातींत दिसून येत नाहीं. म्हणून इतर कोणत्याही दृष्टीनें कांहीं समानता, इतर रचनेंत व मानवजातीच्या रचनेंत आढळली तरी त्यांच्या कोटींत ही विशिष्ट रचना बसवतां येणार नाहीं.

सुधारलेल्या लोकांनी हें तत्वज्ञान, ज्याच्या योगानें, आहे ही वस्तुस्थितीच योग्य आहे असें त्यांना म्हणतां येत होतें, व आपल्या वाईट आचरणावर पांघरूण घालतां येत होतें, तें तत्वज्ञान हातीं धरलें व जोरानें त्याचा पुरस्कार सुरू केला. कोमटेच्या उपदेशाचें २ विभाग

आहेत. त्यापैकीं त्यांचें तत्वज्ञान तेवढें हातीं घेतलें व त्याचे अनुभवजन्य राजकारण, ज्यांत तो स्वार्थ सोडून, मनुष्यजातीच्या कल्याणाकरितां झटा असें सांगतों, तो भाग वगळला. ज्याच्या योगानें आपल्या अन्यायांचे समर्थन होत होतें, तेवढाच अनुभवजन्य तत्वज्ञानाचा भाग यानीं उचसला. दुसऱ्या भागाचा, ज्यांत त्यानें मानवजातीच्या कल्याणाची नैतिक जबाबदारी प्रत्येकावर टाकली आहे, त्या भागाचा विचार केला नाहीं.

कांटच्या तत्वज्ञानाचीच ही पुनरावृत्ति झाली. केवळ बुद्धिवाद तेवढा घेतला. पण अनुभवजन्य ज्ञान, ज्यांत खरोखरीच त्याची नैतिक शिकवण आहे, ते त्यांनीं सोडून दिलें. चालू दोषास पोषक असें जेवढें कोमटच्या विचारांत मिळालें तेवढें शास्त्र ह्मणून घेणेंत आलें. परंतू ही तत्वज्ञानाची इमारत इतकी निरुपयोगी व जुलमी होती, कीं आपोआपच ती लयास जाणार होती. या शास्त्रापासून निरनिराळी बेजबाबदार प्रमेयें निघूं लागलीं. पुष्कळ संस्था एकत्र होऊन एका नवीन संस्थेची उत्पत्ती होते असेंही लोक ह्मणूं लागले. याचा स्पष्टार्थ असा कीं, हजारों वर्षांनंतर, मासा व बदक यांची उत्पत्ति एकाच पूर्वजापासून झालेली दिसेल, एवढेंच नव्हे तर अनेक संस्थापासून, अनेक मधमाशापासून एकच संस्था एकच प्राणी तयार होईल. ही असली चुकीची अनुमानेंही लोक मोठ्या अभिमानानें आपली ह्मणूं लागलें. हें ह्मणणें आग्रहाचे आहे कारण कोणीही या संस्था एकमेकापासून कशा निर्माण झाल्या हें प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. सबब सर्व अनुमानें असून वस्तुस्थिती यांत मुळींच नाहीं. ही अनुमानेंही चुकीची आहेत. कारण त्यांत विचारलेल्या प्रश्नाचें **उत्तर नसून** त्याचें निराळ्या

शब्दांत रूपांतर करण्यांत आलेलें आहे.

मोझेसच्या ह्मणण्याप्रमाणें या ज्या सजीव प्राण्यांच्या जाती आहेत त्या निर्माण करण्यांस परमेश्वरी इच्छा कारण आहे. पण उत्क्रांतीवादी असें ह्मणतात कीं, यांची उत्पत्ती नैसर्गिक आहे. त्यांचे पुष्कळ वर्षें चाललेले व्यापार व अनुवंशिक संस्कार ही त्यास कारणें आहेत. थोडक्यांत व स्पष्ट सांगावयाचे ह्मणजे कालांतरानें कांहींही कशांपासूनही उत्पन्न होईल. यांतही प्रश्नाचें उत्तर नाहीं असेंच तुह्मांला आढळेल. कारण केवळ इच्छाशक्तीऐवजीं येथें योगायोग व्यक्त करण्यांत आला. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं परमेश्वराऐवजी निसर्गाची योजना केली. दोन्हीही तितकीच अगम्य. ही नवीन मांडणी डार्विननें अधिक पुढें केली. जीवन कलहाची कल्पना त्यानें काढली. जगण्याकरतां धडपड पाहिजे, **जो जगण्यास योग्य असेल तो इतरांना मागें सारून आपले अस्तित्व कायम राखील.** हा उपदेश दिला गेला. अर्थांतच आळशी लोकांना फावले. माकडाचे हातीं कोलीत दिल्याचा प्रकार झाला व आपल्या जुलमी व निरुपयोगी पणाचे ते समर्थन या तत्वाच्या आधारें करूं लागले.

हीं वरील दोन तत्वें एकमेकाना आधारभूत होऊन आपणास स्थैर्य आहे असें भासवूं लागली. दोन्हीतही लोकांना पाहिजे तेच होते. आहे ही स्थिती चांगली आहे त्यांत मनुष्याचा कांहीं दोष नाहीं, असें त्याना हवें होतें व तेंच त्यांना मिळालें.

याच दोन तत्वावर विश्वासून हल्लींच्या शास्त्रज्ञांचा पंथ निर्माण झाला व तो हल्लीं बलिष्ट होत चालला आहे. हा पंथ व धार्मिक ख्रिश्चनपंथ ह्यांत साम्य चोहोंबाजूंनीं दिसून येतें. एकांत

परमेश्वराचें अधिष्ठान दुसऱ्यांत संस्थेचें अधिष्ठान, एकांत ख्रिस्त हा ईश्वर समजत तर मानव जात ही दुसऱ्यांत नैसर्गिक संस्था समजली जाते. दोन्हींतही त्या त्या पुरस्कर्त्यांनीं प्रतिपादलेलीं तत्वें सत्य धरून चालली जातात. परमेश्वरी संदेश ही भावना एकींत जागृत तर दुसऱ्यांत शास्त्रज्ञांचें ज्ञान तितकेंच पवित्र. धर्मसंस्थांनाच पहिला संदेश मिळाला हा जसा धार्मिक अनुयायांचा समज व धर्माची उत्पत्ती तेव्हांपासून झाली, ही जशी त्यांची समजूत, तसेंच अनुभवजन्य शास्त्र हें कोमटेपासून निर्माण झालें असें ते मानितात.

धर्मसंस्थाप्रमाणेंच, आपल्या खेरीज इतरांना जें ज्ञान झालें तें चुकीचें आहे, असें हल्लीचे अनुभवजन्य तत्वज्ञानीं ह्मणतात. ज्याप्रमाणें धर्मोपदेशकांच्या बाबतींत ख्राईस्त हा देव आहे. या मताच्या पाठ पुराव्याकरतां नवीन तत्व निर्माण झालें. मनुष्याच्या अधःपात व त्यांस तारण्याकरतां ख्रिस्ताचा जसा अंत झाला. तसा कोमटेच्या अनुभवजन्य तत्वज्ञानचा पाठपुरावा करणेंस उत्क्रांतीवाद पुढें आला. दोघांच्या मिलाफानें हल्लींच्या शास्त्रांचा पंथ निर्माण झाला. दोन्हींतही नव्या तत्वानें जुन्याचा पाठ पुरावा केला, व एक दुसऱ्याच्या मदतीनें अधिक स्पष्ट झाला.

—o—

# सुधारणेचा मनु

शास्त्रें व कला यांची वाढ आज झपाट्यानें चालू आहे. सर्व जग आज निरानिराळ्या शोधांनीं व साधनांनीं मनुष्याचें जीवित सुखी करूं पहात आहे. सुधारणेच्या उत्तुंग भागीं आज आपण उभे आहोंत. पूर्वकाल व सद्य:काल यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. सृष्टी नवी शोभूं लागली. जर कोणीं या शास्त्राच्या व कलांच्या विरुद्ध ब्र काढील तर तो मनुष्यच आहे किंवा नाही अशी शंका घेण्यांत येईल. कोणीही त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यास तयार होणार नाहीं. त्यांच्याशीं प्रतारणा ह्मणजे रानटी स्थिती परत आणणें असाच अर्थ जग करील.

पण हा अन्याय नाहीं काय ? विचार विनिमय करण्यास सवड देणें व चुकीचे विचार असतील तर ते सुधारण्याचा प्रयत्न करणें ह्यांत मनुष्यत्व आहे ना ? मी शास्त्रें, कला यांचा अभिमानी आहे. त्या विरुद्ध मी बोलत नाहीं. पण आज जग ज्या रानटी मार्गांनीं चाललें आहे. त्याबद्दल मला सुचवावयाचे आहे. जें भ्रामक शिक्षण दिलें जात आहे त्याविरुद्ध माझी तक्रार आहे.

अन्नवस्त्रांपेक्षांही शास्त्रें व कला यांची जरूरी मनुष्यमात्रांस आहे व तें मलाही कबूल आहे. पण आज त्यांस आपण हीं नांवें देतो तीं सार्थ आहेत काय व त्यांची जरूर आहे काय हाच विवादित प्रश्न आहे. अन्नाऐवजीं जर माणसास गवत अन्न ह्मणून खाण्यास दिलें व कितीही कंठशोष करून त्यास अन्नाची कल्पना आणून देण्याचा प्रयत्न केलात

कितीही पांडित्य व यत्न केलात तरी जसें त्याला अन्नपण येणार नाहीं व कोणीही तें स्वीकारणार नाहीं तद्वतच हें आहे. अन्नमय प्राण हें खरें पण जें अन्न म्हणून देण्यांत येतें तें अन्न नसण्याचा संभव आहे. हाच प्रकार शास्त्रें व कला यांचा झालेला आहे.

जगाच्या उत्पत्तीपासून शास्त्र आस्तित्वांत आहे. आरंभी त्याचें स्वरूप अत्यंत साधें व स्पष्ट होतें. परंतु ज्ञानाचा पसारा अत्यंत मोठा असल्यानें, मनुष्य या अवडंबर पसाऱ्यांत भांबावून जातो, व त्याला जरूर गोष्ट कोणती केली पाहिजे व कोणती अधिक महत्वाची आहे हें कळत नाहीं. ज्यामुळें ही निवड करतां येईल तें ज्ञान आधीं होणें जरूर आहे व हेंच मनुष्यांच्या सर्व प्रयत्नाचें सार आहे. हें श्रेष्ट ज्ञान, ज्यावर बाकींच्या गोष्टी अवलंबून आहेत त्यांस शास्त्र ह्मणुन सर्व जाणते लोक समजतात. मानवजातीच्या उत्पतीपासून मनुष्यांस या ज्ञानाची जरूर आहे असें सर्व जातींतील ज्ञाते सांगत आले आहेत मनुष्याचें व्यक्तिशः व समाजाचे संघटीत अंतीमकल्याण कशांत आहे व त्याचें उद्दीष्ट कोणतें आहे याचें ज्ञान करून देणें हेंच शास्त्राचें खरें काम आहे. याच शास्त्राच्या द्वारें इतर ज्ञानाचें तरतमभाव जाणतां येतील व कलासंबंधी ज्ञान अजमवतां येईल. मनुष्यमात्राचें कल्याण साधणाऱ्या या शास्त्रांस अर्थांतच प्राधान्य मिळून बाकींचीं शास्त्रें व कला मागें राहिलीं. लोकांचा आदर त्यांच्याबद्दल कायम राहिला. कानफ्युसियस, बुद्ध, साक्रेतीस, ख्राईस्त, महमद पैगंबर वगैरे महात्मे हीच शिकवण जगास शिकवीत आले व याच शास्त्रांचा त्यांनीं पुरस्कार केला. हलींच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांनींच आपली कल्पना विपरीत करून घतली.

या शास्त्राखेरीज, उत्क्रांति शक्य नाहीं, कोणत्याही शास्त्राची अगर कलांची वाढ शक्य नाहीं. शास्त्रें असंख्य आहेत. मनुष्याचें अंतिम कल्याण कशांत आहे व त्याच्या जीविताचें ध्येय काय आहे, हें जाणल्याशिवाय इतर शास्त्रें म्हणजे करमणुकीची व वेळ घालविण्याचीं साधनें होत व तीं आज तशीं झालीं आहेत निरनिराळ्या इसमांनीं, निरनिराळे नमुने पुढें ठेवून थोड्या फार फरकानें इमारती बांधल्या तरी त्यांचें उद्दिष्ट जसें एकच, त्याचप्रमाणें नीतिशास्त्रांचा पुरस्कार करण्यांत वरपांगी कांहीं किरकोळ मतभेद बुद्ध, ख्राईस्ट, महमद, साक्रेतीस, वगैरे महात्म्यांच्या शिकवणींत असला तरी त्यांचें अंतिम ध्येय व शिकवण मनुष्यमात्राचें अंतिमकल्याण व त्यांच्या जीविताचें साफल्य यांतच होते. मनुष्यजात निर्माण झाल्यापासून, जे थोर बुद्धिमान, कर्तृत्ववान पुरुष होऊन गेले त्यांना आपल्या सदसद्विवेक बुद्धीची व अंतर्यामीची गरज, याच तत्वांचा पुरस्कार करण्यांत वाटली व त्यांनीं आपला सर्व जन्म त्यांत खर्चला.

ज्या परमेश्वरानें मला व सर्व मनुष्य जातीला निर्माण केलें त्याचे उद्दीष्ट काय? माझ्या अंतरात्म्याची, व्यक्तिवीषयक व जगाचें हित साधण्याची तळमळ, कशाने शांत होईल? मी परमेश्वराचा अंश आहे. अगाध व अपरीमित अशा शक्तीचा एक मी घटक आहे. इतर घटकांशीं माझे संबंध कसे आहेत, त्या अनंत शक्तीशीं माझा संबंध कसा आहे, व्यक्तिशीं कसा आहे, वगैरे प्रश्न त्याच्यापुढें उभे होते. आपल्या अंतरात्म्यांस साक्ष ठेऊन व सदसद्विवेक बुद्धीस जागून, पूर्वीं झालेल्या व असणाऱ्या महात्म्यांची मदत घेऊन त्यांनीं हा प्रश्न सोडविला व सर्व लोकांना अनुसरतां येईल असा साधा व स्पष्ट मार्ग त्यांनीं

घालून दिला. आपल्या वैयक्तिक सुखाची जोड सर्व मनुष्यजातीच्या कल्याणाशी कशी घालावयाची यांतच निरनिराळे पंथ उत्पन्न झाले.

मनुष्याचें जीवित व त्याचें कल्याण यांची तळमळ बाळगणारे व अंतरआत्म्याची जाणीव असणारे थोर पुरुष; आजवर या गोष्टींची कळकळ बाळगून, फसवणुकीस आळा घालून. पापाच्या व विपत्तीच्या वाढीस एकसारखा प्रतिकार करीत आले आहेत व उत्कंठेनें आत्म-कल्याणाची मार्गप्रतिक्षा करीत आहेत. खऱ्या कलेनें आजपर्यंत योग्य शिकवण दिली व याच शिकवणीस धर्म ही संज्ञा मागाहून देण्यांत आली. परंतु जशी याची जाणीव मागें पडून हातांस येईल त्याची शास्त्रें बनूं लागली, खरा उद्देश व अर्थ नाहींसा झाला व खऱ्या ज्ञानाची 'धर्म' ह्मणून हेटाळणी सुरूं झाली. त्या वेळेपासून कलेचें खरें महत्व नाहींसें झालें. नीतीशास्त्राचा पाठपुरावा जों पर्यंत कला करीत होती व जों पर्यंत हें शास्त्र मनुष्यमात्राचें ध्येय व कल्याण चिंतींत होतें तोंपर्यंत सर्व ठीक होतें.

हजारों वर्षें होऊन गेलीं तरी मागील, साक्रेतीस, कानफ्यूकस, बुद्ध, होमर वगैरे लोकांची स्मृती अद्यापी ताजी आहे. असे महात्मे अर्थात क्वचितच निर्माण होतात. जनता त्यांच्या पाठीस लागते, परंतु आज ते हल्लींच्या शास्त्रानीं निरुपयोगी ठरविले आहेत. हल्लीं शास्त्रकार आपल्या श्रम विभागाच्या कारखान्यांत शास्त्रज्ञ तयार करीत आहेत. व त्यांची वाढ इतकी झपाट्यानें चालू आहे कीं, आणखी दहा वर्षांत, आज जगाच्या आरंभापासून जितके शास्त्रज्ञ निर्माण झाले नाहींत, तितके होतील. याची प्रगती इतकी झपाट्यानें होत आहे कीं, पुर्वींचे सारे थोर व विद्वान लोक निरूपयोगी झाले. एका जर्मनयुनिव्हरसिटींत

आजपर्यंत झाले नाहींत इतके विद्वान तयार झाले आहेत. शास्त्रेंही सुदैवानें इतकी काढलीं आहेत कीं, एकास तीं सर्व अवगत असणें शक्यच नाहीं. त्यांचीं नांवेंसुद्धां लक्षांत रहाणें शक्य नाहीं. दिवसेंदिवस या शास्त्रांची संख्या वाढतच आहे.

या शास्त्रांचा उपयोग काय, याची अद्यापीं लोकांना कल्पना नाहीं यांचें महत्व अद्यापी लोकानां समजत नाहीं लोकांच्या मनावर अद्यापी वेदांतकालाचा परिणाम आहे; हिंदू, हेब्रू, ग्रीक या लोकांमध्यें आजपर्यंत मोठमोठें महात्में होऊन गेले. त्यांची शिकवण लोकांना समजली. आणि आतांच मात्र आधुनिक शास्त्रें कळेनाशी झाली. हल्लींची शास्त्रे व कळा, शास्त्र या नांवालाचमुळी योग्य नाहींत. तीं शास्त्रें नसून केवळ थोतांड आहे, लोकांना एक आमिष आहे, असें म्हटले तर ते खोटे आहे काय ? याच आपल्या शिक्षणानें ही हक्कांची जाणीव, ही काम न करण्याच्या वैशिष्ट्याची जाणीव करून दिलेलीं आहे याच शिक्षणाच्यापायीं आह्मी वेडे बनत चाललो आहोंत. आमच्या बुद्धीस श्रम पडत आहे. आह्मी आपल्या बांधवांवर अधिकार गाजवतो आहोंत, जुलूम करीत आहोंत. तरीही आपण आपणांस ख्रिश्चन, उदारमतवादी, सुशिक्षीत व न्यायीं ह्मणविण्याचा प्रयत्न करतो !

—o—

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं.
ता.

# श्रमविभाग.

श्रमविभागाचे तत्व जगाच्या आरंभापासून अस्तित्वात आहे व अखेर पर्यंत राहील. विचार हाच करावयास पाहिजे कीं ही विभागणी योग्य तऱ्हेनें होत आहे काय? वरवर पाहूं लागलों तर बाकीच्या सर्व कसोटी बाजूस राहतील व सकृत्दर्शनी जी गोष्ट सोईची दिसेल तीच पत्करून मनुष्य वागूं लागेल. हाच दोष हल्लींच्या शासनपद्धतींत आहे. कांहीं लोक बौद्धिक उद्योग करतील, कांहीं आत्मिक दिशेनें आपला मार्ग आंखतील व कांहीं शारीरिक कष्ट स्वीकारतील. पण सर्व लोक या प्रमाणें कामें करतीलच याची खात्री काय? कांहीं म्हणतील हा विश्वासाचा प्रश्न आहे व ही श्रमाची देवघेव योग्य रीतीनें चालली आहे; पण वस्तुस्थिती तशी नाहीं. हा एकप्रकारचा जुलुम समाजांत वावरत आहे. माझ्या पोटापाण्याची, कपड्यालत्याची वगैरे सर्व व्यवस्था लहान पणापासून इतर लोक करीत आले व तशीच व्यवस्था पुढें करतील व मी त्यानां माझ्या बुद्धिचा उपयोग देईन; ही देवघेव जर स्वभावसिद्ध, व खुशीनें असेल, व जर बौद्धिक मदत मिळण्यापुर्वी हे शारीरिक कष्ट करणें भाग पडणार नाहीं, तरच ती योग्य होईल. शारीरीक कष्ट करणरानें अगाऊ आपले देणें द्यावयाचे व मागाहून शक्य असल्यास

बौद्धिक श्रमानें फेड करावयाची, अशी विषमता काय कामाची. आत्मिक कल्याण हें शारीरिक कल्याणा इतकेच महत्वाचे आहे हे कबूल, पण जर त्या करितां शारीरिक कष्ट करणारा मजूर, आपणांस बौद्धिक ऋण आधीं मिळणें जरूर आहे त्या शिवाय मी आपले कष्ट दुसऱ्यांस देत नाहीं असें म्हणाला तर त्यांत काय गैर आहे ? बौद्धिककष्ट करणारा पांढरपेशा जर आपणांस शेतकरी, सुतार, लोहार कोष्टी वगैरेची जरूर प्रथम आहे त्याशिवाय मला माझ्या उद्योगास सुरवातच करतां येणार नाहीं असें म्हणेल, तर तितक्याच अधिकारानें एखाद्या मजुरालाही हें म्हणतां येईल. आपलें कष्ट योग्य दिशेनें होण्यास त्यांसही शास्त्राची व कलांची मदत आधीं पाहिजे. त्याचें आयुष्य सुखमय होण्यास काव्य, इतिहास वगैरे गोष्टींची अवश्यकता आहे. मानासिक समाधान कर्तव्य-जागृती व मनोधैर्य हीं येण्यास धार्मिक व नैतिक शिक्षणाचीं जरूर त्यालाही आहे हे सर्व उद्योग त्यानें करणें शक्य नाहीं व त्याला तितका वेळही नाहीं. आधीं मला या सर्व गरजा पुरवा, व मग मागाहून आपलें उपकार माझ्या शारि-रिक कष्टानें मी फेडेन असें जर तो म्हणाला तर त्यांत अयुक्त काय आहे ?

शारिरिक कष्ट करणारा मजूर जर हें म्हणेल तर तें अधिक न्यायाचें नाहीं काय ? कारण त्याचे कष्ट अधिक महत्वाचे व अधिक जरूरीचे आहेत. बौद्धिक श्रमाचा मोबदला केव्हांही देतां येईल. पण मजुराला हें शक्य नाहीं. आजच्या परिस्थितींत त्यांजजवळ इतकें सामर्थ्य उरलें नाहीं. निरनिराळ्या कादंबरीकारांचीं पुस्तकें, गणित

शास्त्रांतील शोध, निरनिराळ्या कमेट्यांचे रिपोर्टस, कमिशनें, भूमितिशास्त्र, परलोक विद्या हीं सर्व मजूरवर्गाची गाऱ्हाणीं दूर करू शकतील काय ? होत असलेला त्यांच्यावरील सामाजिक जुलुम यानें दूर होईल काय ? काव्य व कला, नर्तकीचीं चित्रें व चित्रपट, गायन, वादन वगैरेनीं त्यांचें समाधान होणार नाहीं. जोंपर्यंत आह्मी त्यांच्या श्रमाचा गैरवाजवी फायदा घेत आहोंत, व त्याना त्याबद्दल मोबदला देण्याची जबाबदारी घेत नाहीं, तोंपर्यंत त्यांच्याबद्दल आमची समजूतच चुकीची आहे. त्यांचा जीवितक्रम व त्यांची राहाणी, याबद्दल आम्हीं गाढ अंधकारांत आहोंत. त्यांचे उपकार आह्मांवर अत्यंत झाले आहेत. त्या उपकाराची जाणीव आम्हीं पार विसरलों आहोंत. त्यांचे उतराई होण्याऐवजीं त्यांचींच चाकरी आह्मी घेत आहोंत. आम्हीं राष्ट्राचे धुरीण ह्मणवितो त्यांनीं आम्हांस पोसावयाचे व आम्ही त्यांना योग्य शिक्षण द्यावयाचे. केवळ या सबबीवर आह्मी आपले शारीरिक कष्ट चुकविले आहेत. आजपर्यंत आह्मी त्याना काय शिक्षण दिले व आतां देत आहोंत! वर्षानुवर्षे त्यानीं दम काढला तरी अद्यापी आमची चर्चा व वादविवाद थांबत नाहीं. आह्मी त्यांच्याबद्दल इतके निष्काळजी बनलो आहोंत कीं त्यांच्या अस्तित्वाची जाणीव विसरून गेलो. श्रमविभागाची हीच आमची कळकळ काय ? केवळ आमच्या उपयोगाच्या नावाखाली आह्मी आमचे ज्ञातीबांधव राबवीत आहोंत. त्यांच्या श्रमावर चैन करीत आहोंत. धन्य आमची व आमच्या बौद्धिक श्रमाची !

एक काळ असा होता कीं धर्मसंस्था या आमच्या आत्मिक कल्याणाची कळकळ बाळगीत होत्या. लोकांचे कल्याण हे त्यांच्या

डोळ्यापुढें उभें होते व ह्मणुनच लोकही शारीरिक श्रमाची सूट त्यांना देत होते. ते आपल्या मार्गापासून परावृत्त झाले बरोबर त्यांच्या बद्दलची सहानुभूती नाहींशी झाली. सरकारच्या पाठिंब्यानें ज्या वेळी त्यांनीं आपलेवरील जबाबदारी झुगारून दिली त्याच वेळीं धर्मसंस्थांचा अंतकाळ जवळ आला. त्यांचा आळस व चैन ही त्यांच्या नाशास कारण झाली ज्यांच्याकरितां या धर्मसंस्था निर्माण झाल्या त्या बहुजन समाजाच्या कल्याणाची बाब बाजूस राहून; धर्मसंस्था ह्याच मुख्य होऊन बसल्या अर्थातच त्यांतील नोकर हे आपले वैशिष्ट्य आळस व चैन यातच आहे असें मानूं लागले.

सरकार हें लोकांच्या रक्षणास व त्यांच्या आयुष्यास योग्य वळण लावण्यास निर्माण झाले. स्वास्थ्य, शांतता, आरोग्य, सुरक्षितता न्याय वगैरे देणेंची हमी सरकार या संस्थेनें घेतली व ह्मणुनच या सबबीवर या संस्थेंत भाग घेणाऱ्यांना शारीरिक कष्टाची माफी देणेंत आली. त्यांनीं ती घेतली. परंतु संधि मिळतांच धर्मसंस्थाप्रमाणेंच यांतील नोकरशाहीनेंही लोकांच्या श्रमाची लूट चालविली. लोककल्याण बाजूस राहून वरच्या दर्जाचे नोकर हेच प्राधान्य मिळवून बसले. सर्व खटाटोप व खर्च त्यांचा इतमाम व बडेजाव राखण्याकरितां होऊं लागला. राजापासून प्याद्यापर्यंत, इंग्लंड, फ्रान्स, रशिया, हिंदुस्तान वगैरे सर्व राष्ट्रांत, ही नोकरशाही आळसांत व चैनीत दिवस काढूं लागली अर्थातच शासन संस्थावरील विश्वास उडाला व अराजतता बरी वाटूं लागली. दुसऱ्यांचे श्रम बिन मोबदला घेऊं लागतांच

राजसत्ते वरील विश्वास उडाला.

हीच स्थिती शास्त्रें व कला यांची झाली आहे. राजसत्तेच्या पाठिंब्यावर त्यांनीही हाच क्रम सुरूं केला. श्रमविभागाच्या तत्त्वाशीं प्रतारणा करून, लोककल्याणाचा मार्ग सोडून शास्त्रें व कला यांच्या अभिमान्यांनीं आपलीच महती गाण्यास सुरवात केली. अर्थातच बुद्धिमान वर्ग म्हणून जी जबाबदारी त्यांजवर आहे, ती त्यांचे हातून निभावेनाशी झाली व त्यांचा काळ निरुद्योगांत व अनवश्यक गोष्टी करण्यांत जाऊं लागला.

शास्त्रें व कला यांनीं मनुष्यजातीची वाढ केली आहे. त्यांच्या प्रगतीस मदत केली आहे ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे. धर्मसंस्था, राजसत्ता, शास्त्रें व कला यांनीं जी प्रगती केली ती त्यांतील कर्तव्यपराङ्मुख झालेल्या नोकरशाहीनें अगर आपला डौल मिरविणाऱ्या अभिमान्यांनीं नव्हे. लोकांच्या श्रमाचा अपहार करणाऱ्या बांडगुळांनीं नव्हे तर त्यांतील **महात्म्यांनीं.** त्यांनींच मनुष्यत्त्वाची प्रगति केली व या मिळालेल्या संधीचा गैरवाजवी फायदा न घेतां आपले श्रम, बुद्धि व कर्तृत्त्व लोककल्याणाकरितां जनतेच्या चरणीं सादर केलें. "खोट्यांतून खरें कधींच निर्माण होणें शक्य नाहीं."

" श्रमविभागाच्या जोरावरच आज सुधारणेचे शिखर आम्ही गांठले आहे. आमच्या कर्तृत्त्वाचा जो फायदा लोकांस मिळतो तो मिळाला नसता. यास कारणीभूत श्रमविभागच आहे " असें पांढरपेशे लोक म्हणतात.

वादाकरितां आपण हे सत्य मानूं पण याची खरी कसोटी श्रमविभागाच्या तत्वावरच अजमावून पाहूं. ज्यांच्याकरितां व ज्यांच्या

श्रमावर जगून आम्हीं ह्या गोष्टी केल्या, ते मजूरलोक यामुळें कितीसे सुखी झाले? सत्य स्मरून जर सांगावयाचे तर दिवसेंदिवस त्यांची स्थिती खालावतच चालली आहे, हें आपणांस कबूल करणें भाग आहे.

आगगाडीनें त्यांचा प्रवास सुखाचा झाला हें खरें पण त्यास मिळणारें मुबलक अरण्यांतील लांकूड नाहींसें झालें, स्वस्ताईमुळें मिळणारे पोटभर धान्य, परगांवीं जाऊं लागले, व पूर्वीची गुलामगिरी श्रीमंतांचे नोकर बनल्यानें नव्या रूपांत नांदूं लागली. स्वतःच्या गांवीं जे अंगभर वस्त्र त्यास सुखानें मिळत होतें ते यंत्रानें व गिरण्यानीं नाहींसें झाले, व व्यापारी लोकांची गुलामगिरी करणें त्यानां भाग आले. तारायंत्रे वगैरेचे फायदे त्यांच्या परिस्थितिच्या मानानें त्याला मिळणें मुष्कील पडते. तीच स्थिती नाटकें, सिनेमा, टेलिस्कोप वगैरेंची आहे. या गोष्टी त्यांच्या अवांवया बाहेर आहेत. कशाहि कारणानें असो या गोष्टींमुळें मजूर वर्ग सुखी झाला नाहीं खास. त्याची स्थिती मुळींच सुधारलेली नाहीं. यावरून आपण मानतो तशी वस्तूस्थिती नसून ती विपरीत आहे असे मानावे लागते. आयुष्याची रहाणी बदलली पण त्यापासून त्यांचा फायदा काय? गिरण्या अगर कारखानें हे मजुरांच्या सुखाकरितां मुळी सुरूच केलेले नाहींत मग त्यांत होणाऱ्या सोईंचे इतके समर्थन कशाला? त्यांच्या उत्पत्तीचे कारण मजुरांचे सुख नसून त्यांचे श्रम घेवून आपला फायदा जास्तींत जास्त कसा करतां येईल हे आहे. व सुधारलेल्या राष्ट्रांनीं हे पूर्णांशानें साधले आहे. प्रत्येक वाईट गोष्टींत कांहीं चांगला अंश असतोच आग लागली तरी त्यांत उष्णता असल्यानें शेकण्याचा उपयोग होतोच त्या पैकींच

हे फायदे होत. रेल्वे रस्ते कशा करितां बांधण्यांत येतात ! सैन्याची सोय व्हावी म्हणून अगर धनिकांचे उत्पादन सोपे व्हावे म्हणून शास्त्रज्ञ बुध्दिकौशल्य खर्च करून तोफा, टारपेडो, विषारी धूर वगैरे मनुष्याच्या नाशाची साधनेच निर्माण करितो अगर ज्या गोष्टींची त्यांस उपयुक्तता नाहीं त्या तयार करण्यांत त्याचा काळ खर्च होतो. चैनीच्या वस्तु निर्माण करून, दारु, अफू, तंबाखू वगैरेच्या तो नादीं लागतो व शेवटीं आपलें अंतिम साधन जे श्रम तो ते व्यर्थ घालवितो.

श्रीमंत वर्गास व सरकारास ज्या प्रमाणांत शास्त्रज्ञांचे व कलावंताचे श्रम अगर उद्योग उपयोगी पडतात त्याच प्रमाणांत जर त्यांनीं मजूर वर्गाची काळजी वाहिली असती तर त्यांचा उपयोग जनतेस झाला असतां. त्यांचें साध्य जर लोक कल्याण असतें तर त्यांच्या बद्दल आदर वाढला असतां. परंतु वस्तुस्थितीं विपरीत आहे. नेहमींच्या उपयोगाच्या जिनसामधें सुधारणा करणें, कुऱ्हाडी, विळे, कोयते, नांगर वगैरे हत्यारें अधिक सोईची व कमी किंमतीची कशी निर्माण करतां येतील, खाणें पिणेंत नित्य येणारे जिन्नस नेहमीं अधिक रुचकर व साधे असून कमी दरांत कसे परवडतील, कोणते जिन्नस नेहमीं उपयोगांत आणल्यास खालच्या वर्गांतील लोकांना पोष्टिक अन्न मिळून त्यांचे जीवित सुखाचें होईल. पेय पदार्थांत काय सुधारणा करतां येईल, व मादक पदार्थांचे दुष्परिणाम कसे नष्ट करतां येतील. इत्यादि अनेक गोष्टींचा अंतरभाव शास्त्रांत होतो पण त्याचा कितीसा विचार शास्त्रज्ञांनीं केलेला आहे. शास्त्र हें लोकोपयोगासाठीं आहे. प्रत्यक्ष नित्याच्या आयुष्यक्रमांत आम्ही काय

फरक करूं शकलो? निरनिराळें जंतू शोधून काढले. पण माणसाळ-लेल्या जनावरांत अद्याप पर्यंत कोणी भर घातली आहे काय? पूर्व काला पासून जेवढी जनावरें मनुष्यानें आपल्या उपयोगी आणलेली आहेत तेवढीच आजही समाजांत उपयोगांत आणलेली दिसतात. तीच स्थिती उपजीविकेच्या साधनांची; गहूं, बाजरी, जोंधळा वगैरे धान्यें व बटाटे, कांदा लसूण वगैरे भाजीपाला आहे त्याच स्थितीत आहे. नवीन कांहीं भरती त्यांत झालेली आहे असें अपवाद म्हणून दाखवि--ण्यासही उदाहरण नाहीं. व जी ही साधनें निर्माण झाली ती 'शास्त्र' निर्माण होण्याच्या आधीं पासूनच अस्तित्वांत आहेत. युद्ध शास्त्रांत प्रगतीची अखेर झाली, पण आमच्या बारड्या व बकेटें, जूं व नांगर, कुऱ्हाड व कोयते, चरखा व माग हे सर्व आहेत त्याच स्थितींत कायम आहेत. कित्येक शतकांपूर्वीं त्यांचे अस्तित्व निर्माण झाले व ते निर्माण करण्याचें श्रेय या शास्त्रज्ञांस खास नाहीं. जर कांहीं त्यांत सुधारणा झाली असेल तर वरील शास्त्रज्ञ म्हणविणाऱ्या लोकांनी ती खास केलेली नाहीं.

हीच अवस्था कलेची आहे. हजारों लेखक निर्माण करण्यांत आले, वेगवेंगळ्या टीका तयार झाल्या, चित्रकला अस्तित्वांत आल्या नाटकें व सिनेमागृहें असंख्य तयार झाली, पण त्यांचें गरीब मजुरांना काय? त्यांच्या उपयोगास येणाऱ्या गोष्टी, कथा वगैरे कितीशा निर्माण झाल्या? ह्या शास्त्रांचा व कलांचा लोककल्याणा-करितां उपयोग तर नाहींच पण जर कांहीं उपयोग होत असेल तर त्यांचें नुकसान करण्याकडेच होत आहे. इंजिनियर, डॉक्टर, शिक्षक, ग्रंथकार वगैरेंचे धंदेच मुळीं लोकोपयोगी आहेत पण त्यांचा कितीसा

उपयोग सामान्य जनांना होत आहे. सद्यःस्थितींत त्यांच्यामुळें जनतेची विघातकच कामगिरी होत आहे.

उदाहरणार्थ इंजिनियर घ्या. त्याला धंदा करावयाचा म्हणजे प्रथम भांडवल पाहिजे. भांडवलाशिवाय त्यांस अस्तित्व नाहीं. त्याचें मिळालेलें शिक्षणच अशा प्रकारचें आहे कीं, मोठें भांडवल व मोठें मनुष्यबल या शिवाय त्याचा उपयोगच नाहीं त्याच्या संबयीच अशा असतात कीं लठ्ठ पगाराशिवाय त्यांचें भागत नाहीं. मोठ्या प्रमाणांत धरणें बांधणें, त्यांचा उपयोग वीज निर्माण करण्याकडे करणें, वाफेच्या व धुराच्या गाड्या तयार करणें वगैरे त्याला शक्य आहे. पण शेतकऱ्यांचा नांगर अधिक कार्यक्षम कसा होईल, त्याची बैलगाडी कशी सुधारतां येईल. पाटस्थळें कशीं निर्माण करतां येतील, वगैरे साध्या गोष्टी त्याच्या पेक्षां एखादा अडाणी शेतकरी अधिक चांगल्या तऱ्हेनें करूं शकेल. द्रव्य, कारखाने, मनुष्यबल व यंत्रसामुग्री यांच्या जिवावरच त्याला जगलें पाहिजे. परंतू सद्यःस्थितींतील मजुरवर्गाची कुचंबणा त्यांस दूर करतां येणार नाहीं. त्याचा पेशा त्यांस या गोष्टीस आड येईल. वैद्याची स्थिती याहूनही विषाद वाटणारी आहे. त्यांची यंत्रसामग्री व औषधें इतकी महाग असतात कीं, एखादा रोगी बरा करण्याकरतां जो खर्च येतो तेवढ्यांत शेंकडो जणांचें अन्न भागेल. त्यांची विचारसरणी व रोग्यांस जरूर ती रहाणी इतकी महाग आहे कीं, त्या सर्व खर्चापुढें रोग्यास मरण पुरवलें असें होऊन जातें. **जीवित वांचवण्यास जावें तो जिवंत होऊन दारिद्र्यानें मरण्याचा प्रसंग.** यांत हाल कमी कोणते हें ज्यानें त्यानें ठरवून डॉक्टरचें औषध सुरु करावें.

'श्रमविभाग' या नांवाखालीं तुम्ही या लोकांचा योगक्षेम चालवा ह्मणतां, पण सर्व शास्त्रें, कला व शिक्षण ह्या गोष्टी श्रीमंताच्या पाठीस आहेत. ज्यावेळीं आपल्या विशिष्टत्वाच्या भावना बाजूस ठेवून श्रीमान वर्ग शेतकरी व मजुरवर्गांत मिळून मिसळून वागूं लागेल, त्यांच्या ऐपतीचा व रहाणीचा विचार करून त्यांची दुःखें व रोग नाहींसे करण्यास स्वार्थत्यागानें आपल्या ज्ञानाचा उपयोग करील, त्याच वेळीं त्यांजबद्दल पूज्य भाव व पवित्र भावना तयार होतील. ज्या वेळीं दुसऱ्याच्या श्रमांचा गैरवाजवी फायदा घेऊन समाजावर आपलें जीवित ते लादणार नाहींत त्याच वेळीं बहुजन समाजांत त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न होईल.

कलाभिज्ञ, ग्रंथकार, कवी, वगैरे सर्वांची हीच स्थिति आज आहे. अवास्तव खर्च व विनाकारण डामडौल यांच्यापायींच तो सामान्य जनांस निरुपयोगी व त्यांच्या जिवावर जगणारा असा होतो. जोंपर्यंत हे लोक श्रमविभागाच्या भ्रामक-कल्पनेनें दुसऱ्यांचे श्रमरूपी वित्त हरण करितात, तोंपर्यंत हाच दुःखाचा, हालाचा व कष्टाचा अनुभव समाजास येणार.

शास्त्रकार, कलावंत, यांचा खरा उपयोग ज्या वेळीं ते सामान्य जनाप्रमाणें आपली रहाणी ठेवतील व त्यांच्यांत मिसळतील, व कोणताही हक्क न सांगतां आपल्या ज्ञानाचा फायदा जनतेस देतील, व त्यांनीं स्वखुशीनें व संतोषानें दिलेला मुषाहिरा स्वीकारतील, त्याच वेळीं होईल.

'श्रमविभाग,' ज्यावर आमच्या शास्त्रज्ञांची व कलावंतांची भिस्त तो श्रमविभाग, मनुष्यजातीच्या प्रगतीस अडथळा करीत आहे.

त्यामुळें प्रगतीचा गाडा मंद गतीनें चालला आहे, सामान्य जनतेस द्रव्याच्या अभावी ह्या शोधांचा फायदा मिळत नाहीं. ही संपत्तीची विषमता, शोधांनीं अगर शास्त्रांच्या पद्धतीनें कमी होत नसून ती वाढतच आहे. केवळ ' श्रमविभाग ' ज्याचा पुरस्कार आज कंठ-रवानें करण्यांत येतो, तो ' श्रमविभागच ' या सांपत्तिक विषमतेस कारणीभूत आहे.

सांपत्तिक विषमता ही या श्रमविभागावर अवलंबून आहे. व ही चालू राहिली तर जगाचें त्यांत कल्याण आहे असें शास्त्रज्ञ प्रतिपादितात. ही गोष्ट टिकणार कशी ?

स्वच्छ निर्झरावर उभें राहून त्याचें पाणी तान्हेल्या लो-कांना न मिळेल अशी व्यवस्था करावयाची व त्या लोकांना हा आमचा उद्योग सफल झाला म्हणजे जिकडे तिकडे पाणीचपाणी होईल व तुम्हांला मुबलक पाणी तहान भागविण्यास मिळेल, असें सांगण्यांतलाच हा प्रकार नव्हे काय ?

# आतां काय केलें पाहिजे ?

आमचें कर्तव्य काय ? हा प्रश्न म्हणजे आपण करीत आहोंत त्या गोष्टी कर्तव्यांत नाहींत व त्या होणें कठीण, या दोन्ही गोष्टींची स्पष्टताच होय. यासंबंधींची तळमळ, उत्कट प्रयत्न व त्याबद्दल माझें झालेलें मत हीं मी मागेंच दिलेलीं आहेत. मीही मनुष्यच असल्यानें इतराप्रमाणें माझ्यांतही दोष आहेत. इतरापेक्षां शिक्षणाचे दुष्परिणाम अधिक झालेले आहेत. म्हणूनच माझे विचार दुसऱ्यास अधिक पटतील असें मला वाटतें.

काय केलें पाहिजे ? हा प्रश्न उभा रहातांच, जगाची भिती बाजूस ठेवून सत्याचाच मार्ग अवलंबिला पाहिजे असें ठरतें. असत्य ह्यांत दोष काय हें माहित असूनही नित्याचाक्रम त्यांतच आहे. गोष्ट पसंत नसतांना ' बरी आहे ' ह्मणतो, नको असतांना तोंडावर 'होय' ह्मणतो, द्वेष करीत असतां प्रेमाचा भाव दाखवितो, अशा अनेक गोष्टी नित्यशः घडतात. दुसऱ्या संबंधीं खोटें बोलणें आपण वाईट मानतो तर स्वतःलाच फसविणें, अधिक वाईट नव्हे काय ? याचा परिणाम आपल्यावर सहस्रपटीनें घडतो याची जाणीव आपणांस कोठें आहे.

भ्रामक गोष्टींवरच जर माझें सर्व आयुष्य रचलें आहे. जर तेंही दुसऱ्यांस व स्वतःस सत्य ह्मणून मानावयास व मानण्यास लावतो तर हा प्रश्न मला उत्तरता येईल काय ? हें धैर्य माझ्यांत आले

पाहिजे. सत्य मग ते कितीही अप्रिय असो, सद्सद्विवेक बुद्धीस व विचारांस पटलेली गोष्ट दृष्टी आड न करितां व दुसऱ्यांच्या सबबी-वर ती दूर न करितां, आचरणांत आणण्याचे मनोधैर्य पाहिजे. सत्याचा मार्ग आपलें अंतिम कल्याण करील हा आत्मविश्वास बाळगा, व या प्रश्नाचें उत्तर द्या.

पांढरपेशा वर्गास, याचें उत्तर देणें म्हणजे आपण समाजाचे अत्यंत ऋणी आहोंत असेच कबूल करणें होय. आपण उपकाराने इतके मारले गेलों आहोंत कीं ते फिटणें अशक्यच आहे. तथापि खरी स्थिती माहित असणें श्रेयस्कर, ह्मणूनच हा प्रश्न सोडविणें भाग आहे. चुकीची दुरुस्ती करणें यांतच मनुष्यत्व आहे. दुसऱ्यांशीं वागण्यांत असत्य अवलंबणें गैरमोईचे होईल. प्रत्यक्ष उलगडा झाल्यास गोष्टी ताबडतोब जुळतात. पण लबाडीनें त्या संशयांत राहातात. स्वतः संबंधींच जर मनुष्य लबाडीनें वागू लागेल तर आयुष्याचा सत्यानाश झाला असें समजावें.

चुकलेला मार्ग सोडून खऱ्या मार्गास येण्यास मनुष्यांस मनो-धैर्य पाहिजे. तें नसेल तर त्यांतील आपत्ति भोगूनच तो शहाणा होणार. आपण भ्रामक कल्पनांना इतके बळी पडलों आहोंत, विशे-षतः सुखवस्तु व सुशिक्षितवर्ग या मार्गावर इतका पुढें गेला आहे कीं, त्याला परत फिरणें ही कल्पना रुचणार नाहीं. तसें करण्यांस मनोभूमिका तयार केली पाहिजे अगर अनुभव इतके कटु पाहिजेत कीं त्यानें आपला मार्ग बदलला पाहिजे. स्वतःबद्दल व स्वतःच्या दर्जाबद्दल असलेला भ्रम दूर केला पाहिजे. स्वतःच्या ज्ञानाबद्दल अभिमान न धरतां स्वतःचे अज्ञान डोळ्यापुढें ठेवा. स्वतःच्या

मोठेपणास विसरून आपण जगाच्या पसाऱ्यांत किती क्षुल्लक प्राणी आहोंत याकडे लक्ष द्या. व आपल्या चाललेल्या दिनक्रमाबद्दल पूर्णपणें पश्चात्ताप पावा.

माझ्या आयुष्याचीं मोलाची वर्षे मीं कशांत घालविलीं ? शिक्षण घेण्यांत, ज्याचा उपयोग मी दुसऱ्यास लुबाडण्यांत करीत आहे अशा प्रकारचे शिक्षण घेण्यांत चैनीचे व करमणुकीचे खेळ खेळण्यांत आळसांत, व चैनींत, कादंबऱ्यांचा व नाटकांचा अभ्यास करण्यांत मीं आपले तारुण्य घालविलें. माझ्या बुद्धीस मालिन्य आणलें, व विचारास भलतीच दिशा लाविली. ज्यांनीं मजकरितां श्रम केले, माझें संगोपन करून रक्षण केलें, त्यांजकरितां मी काय केलें याचा विचार केला तर पश्चातापच वाटण्याची स्थिती आहे.

ज्या समाजघटकांनीं मला पोसलें त्यांचा मी उतराई कसा होईन ! माझे शरीर, माझी बुद्धी, व माझे विचार मी प्रामाणिकपणें स्वतःच्या चरितार्थास लावले पाहिजेत. दुसऱ्यांवर जगण्याची संवय पार मोडिली पाहिजे खालच्या मजूर-वर्गाच्या डोक्यावर बसून मी जी चैन करतो ती नाहींशी केली पाहिजे. तरच आम्हांस सुखानें जग जगू देईल व आमच्याकडे प्रेमानें पाहील. नाहीं तर समाजाचें रक्त शोषणारी जळू याच अनुदार भावनेनें समाज आमचेकडे पाहात राहील. स्वतःची बुद्धि शरीर व अंतःकरण जर आम्ही समाजाच्या हिताकडे लावूं तरच तो आम्हांस दुवा देईल. स्वतःच्या मोठेपणाचा, स्वतःच्या शिक्षणाचा, स्वतःच्या इभ्रतीचा डौल न मिरवतां जर आम्ही आपल्यास सुधारण्याचा प्रयत्न

करूं, समाजाला न दुखवतां व त्याला न नागवतांना आपला आयुष्य-क्रम काढूं तरच त्यांत समाजाचें खरें हित आहे.

अशा स्थितींत ' मी काय करावें, ' काय केलें असतां माझा व माझ्या शिक्षणाचा उपयोग होईल ! असे प्रश्न विचारणेंत येतात. माझें शिक्षण या भ्रममूलक कल्पनेच्या तळाशींच याचे उत्तर आहे. ज्या शिक्षणाचा ते अभिमान मिरवतात त्याचा उपयोग लोकांना कितपत होतो याचा विचार जर त्यांनीं केला, जर तें शिक्षण खरोखरी किती उपयुक्त आहे व निर्वाहाच्या साधनीं तें कितपत इष्ट आहे. याचा विचार जर ते करतील तर जो अभिमान, जी प्रौढी ते आपल्या शिक्षणाची मिरवतात तीं तर नाहींसी होईलच पण आपण आपला कालक्षेप यांत व्यर्थ केला असेंच त्यांना वाटेल. व याच गोष्टीची खरी जरूर आहे.

' काय करावें ' हा प्रश्न त्यांना सुटतच नाहीं. जोंपर्यंत त्याचा अभिमान गळला नाहीं तोंपर्यंत हा प्रश्न असाच रहाणार. स्वतःच्या मोठेपणाविषयीं, शिक्षणाविषयीं व स्वतःच्या विशिष्ट हक्काविषयीं ज्या भ्रामक कल्पना तयार झाल्या आहेत त्या घालवून, आपलीं कर्तव्यें व निसर्गानें आपल्यास दिलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव आपणांस झाली पाहिजे. निसर्गानें उत्पन्न केलेल्या गोष्टींत भाग घेऊन, स्वतःचें जीवित व दुसऱ्याचें जीवित, खऱ्या श्रमानें सुखी करावें, हेंच प्रत्येकाचें **पहिलें कर्तव्य होय.** व या कर्तव्याची जाणीव म्हणजेच काय करावें, या प्रश्नाचें उत्तर.

प्रत्येकाचें पहिलें व पवित्र कर्तव्यम्हणजे स्वतःचें अन्न, स्वतःचें कापड चोपड, स्वतःचें निवासस्थान स्वतः तयार करणें,व

दुसऱ्यांस तें करीत असतांना मदत करणें, हेंच होय. जगाच्या आरंभापासून मनुष्यावरची हीच मोठी व पहिली जबाबदारीं आहे. यांतच मनुष्यांस शारीरिक, व मानसीक आनंद वाटेल. स्वतःचें अन्न स्वतः तयार करण्यात व स्वतःची काळजी स्वतः करण्यांत शारीरिक समाधान व दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यांत आत्मिक कल्याण आहे. मनुष्य कोणताही पेशा पत्करो, त्याचें पहिलें काम हेंच कीं, स्वतःचा व इतरांचा चरितार्थ चालविण्यांची जबाबदारी त्यानें लक्षांत घेतली पाहिजे. जीवित सुरक्षित व सुखी राखणें हें पहिलें काम. तें जर मी करणार नाहीं, जर दुसऱ्यांच्या श्रमाचा अपहार मी करेन तर तो सुखी कसा होईल ? दुसऱ्याच्या श्रमावरच जर तो जगेल, तर तो दोषी होईल.

## स्वतः जर आपल्या अस्तित्वाचा झगडा चालवणार नाहीं तर त्याला मृत्युवश व्हावें लागेल.

गत आयुष्यांचा मजवर इतका परिणाम झाला कीं ही गोष्ट करण्यांस कांहीं विशिष्ट परिस्थिती निर्माण केली पाहिजे, व कांहीं मंडळींचा पाठिंबा पाहिजे असे वाटूं लागले. नंतर शारीरिक कष्ट करण्यांत मला कमीपणा वाटूं लागला व ते कसे पार पाडावयाचे याचे मला कोडे पडले. परन्तु वस्तुस्थितीचें ज्ञान करून घेतल्याबरोबर, श्रामक मोठेपणाची भावना नाहींशीं झाली. सर्व अड-चणी आपोआप दूर झाल्या. दुसऱ्याच्या संमतीचीं अगर पूर्व तयारीची मुळीं जरूरच नाहीं. कोणत्याही परिस्थितींत स्वतःकरितां व दुसऱ्याकरितां शारीरिक कष्ट करणारे लोक आहेत, व आपणांस ही जर वेळ व ताकद असेल तर या गोष्टी करतां येतील. श्रम

करण्यांत मला कमीपणा वाटेनासा झाला. सदसद्विवेक बुद्धीस पटलेल्या गोष्टी करण्यांत मला आनंद वाटू लागला. अनुभवानें हीं गोष्ट पटल्यामुळें नेहेमीं उभे राहणारे प्रश्न व शंका यांचे निरसन आपोआप होऊं लागले. 'त्यां काय केलें पाहिजे' या प्रश्नांचें उत्तर आपोआपच मला मिळालें. स्वतःच्या शरीर धारणेस लागणाऱ्या सर्व वस्तु निर्माण करणें, त्यांचा सांभाळ करणें, वस्त्रप्रावरण, अन्न-पाणी यांची तजवीज आपली आपण करणें अत्यंत जरूरीचे आहे. ती आपण प्रथम केली पाहिजे. प्रथम हें चमत्कारिक वाटेल पण संवयीनें तेंच अंगवळणी पडेल व पूर्वींची रहाणीच जड व चमत्कारिक वाटू लागेल.

शारीरिक श्रम खेड्यांतून गोळा करणें जरूर नाहीं. एवढेच नव्हे तर दुसऱ्याच्या श्रमाचा अपहार न करतां व त्यामुळें आळसास उत्तेजन न देतां, जर आपल्या गरजा आपण भागवूं लागलों तर शहरांचें रूपांतर खेड्यांत होईल व तेथेंच अशा प्रकारचें उद्योग धंदे भरभराटीस येतील तेथेंच खरा आनंद लोकांस अनुभवावयास मिळेल.

यामुळें माझ्या बौद्धिक उद्योगास अडथळा येणार नाहीं काय ? सर्व वेळ यांतच खर्च होईल असें सकृद्दर्शनी वाटेल पण अनुभव मात्र निराळा आहे. ज्या मानानें शारीरिक श्रम अधिक, ज्या मानानें पाशवी अनुकरण कमी त्या मानानें बुद्धीची शक्ति अधिक. दिवसाचे आठ तास मला बौद्धिक श्रम करण्यास मिळतात पैकीं पांचच तास मी कामाकडे खर्च करतो. दिवसाचे चोवीस तासांपैकीं आठ तास जर शारीरिक श्रमाचे कमी केले तर बाकीचे १६ तास

रहातात. पांच तास बौद्धिक श्रमाचे सोडलें तर राहिलेले ११ तास मी कशांत घालवितो ! याच पांच तासांत नियमितपणानें काम केल्यास काय होणार नाहीं ? शारीरिक श्रमानें बौद्धिक श्रमास अडथळा न होतां उलट मदतच होईल.

स्वतःच्या गरजा स्वतः श्रम करून भागविण्याचा परिपाठ ठेविल्याबरोबर माझ्या गरजा कमी होऊं लागल्या. केवळ शोक ह्मणून आजवर ज्या अनेक गोष्टींची जरूर भासत होती ती भासेना. चैनीनें कपडे लत्ते वापरणें, छांनछुकी करणें, स्वच्छतेच्या भ्रामक कल्पनांना बळी पडणें, वगैरे गोष्टींस मला वेळच राहीना, व त्यांत मला आनंदही वाटेना. त्याचप्रमाणें माझे जेवणाखाणांतही फरक पडूं लागला, जिभेच्या आवडी निवडी कमी होऊं लागल्या. गोड पदार्थ, निरनिराळीं पक्वान्नें व मालमसाल्याचे व तळलेले जिन्नस, ज्यांत मला पूर्वी मजा वाटे, ती आतां वाटेनाशीं झालीं.

साधें अन्नच श्रमानें रुचकर लागूं लागलें, व माझी प्रकृती चांगली राहूं लागली. शेतकरी लोकांच्या प्रमाणें माझी रहाणी साधी व गरजाही थोड्या झाल्या. पूर्वीच्या वेळेच्या मानानें माझे श्रम अधिक उपयोगी होऊं लागले, व दुसऱ्यांच्या श्रमावर जगण्याची अवश्यकता कमी कमी होऊं लागली. सहाजिकपणे माझी रहाणी साधी झाली व खर्चाच्या, डामडौलाच्या व ऐषआरामाच्या भ्रामक कल्पना व संवयी कमी झाल्या. श्रम करूं लागल्यानें हा परिणाम माझ्यावर झाला.

शरीरास माहीत नसलेले मी श्रम करूं लागल्यामुळें माझ्या वयाच्या माणसांना त्रास व दगदग सोसवणार नाही व त्यामुळें

जिकीर व अपाय होईल असें सकृद्दर्शनी वाटले. पण अनुभव मात्र निराळा आला. शरीर व्यवस्थित ठेवण्यास ज्या यांत्रीक गोष्टींची मदत द्यावी लागे, मर्दन करणे, रक्तभिसरणा करितां विजेचा उपयोग करणें अन्नांत व आहारांत फरक करणें हवा व उजेड भरपूर मिळण्याकरतां व निरनिराळे वायु घेण्याकरितां शास्त्रीय दृष्ट्या घराची रचना करणे वगैरे अनेक आनुषंगिक गोष्टींची गरज भासेनासी झाली निसर्गसिद्ध रहाणीच्या अभावीं या सर्व गोष्टींची गरज उत्पन्न होते. ही रहाणी इतकी साधी व सहज असतांना मनुष्यानें हा अवाढव्य व्याप व संताप कां करून घ्यावा हेंच समजत नाहीं. कांचेच्या बंदिस्त खोल्यांतून झाडें जगविण्याकरितां बाष्पबिंदूंची व प्राणवायूची योजना करणें व जवळ असलेलें पाणी व मोकळी हवा यांच्या निसर्गदत्त साठ्याचा अव्हेर करणें या प्रमाणेंच वरील गोष्ट हास्यापद आहे. मनुष्यांस व वनस्पतीस दोघांसही स्नायूचें श्रम जरूर आहेत व अन्नाचा उपयोग याच श्रमाकडे होणें जरूर आहे.

या गोष्टी ज्या वेळीं मला पटल्या त्या वेळीं खरोखरच जगाच्या चालू रहाटी बद्दल हसूं आलें. विचारांती मला असें आढळून आलें कीं सर्व कर्मेंद्रीयांना त्यांची कर्मे व व्यापार करावयास लावणें अपरिहार्य आहे व त्यांना योग्य संधि दिली नाहीं तर मात्र मनुष्याचे अनहित आहे.

घोडा कितीही जातिवंत असो, चलाख व उमदा असो, त्याची दाणापाण्याची निगा कितीही उत्तम ठेविलींत व त्यास जिवापेक्षांही अधिक जपलात तरी तो फेरफटक्याच्या व अभावीं, पायांत निरुपयोगी होतो व त्याचें आयुष्य जसे फुकट जातें तद्वतच श्रमाच्या

अभावी मनुष्याची स्थिती आहे.

मनुष्यानें स्वाभाविक असणाऱ्या आत्मिक व शारीरिक उन्नतीच्या गोष्टी बाजूस सारून आपल्या भोंवती आततायीपणानें कृत्रीम मोहजाल निर्माण केले आहे व संस्कृती, कला, शास्त्र, वगैरेच्या नावाखाली तो भुलत आहे. परंतु या पाशवी शक्तिंचा मोह आतां अखेरीला आला आहे, त्याची जाणीव अम्हांस होऊं लागली आहे. अशा मोहजालांत जगण्यापेक्षां मरण बरें असें शॉपेन होअर, हार्टमन वगैरे तत्वज्ञान्यांनीं अनेकवेळां म्हटलें आहे. आज प्रत्यक्ष होत असलेल्या वरील वर्गांतील आत्महत्त्या याच गोष्टीस पुष्टी देत आहेत. स्त्रियांच्या गर्भधारणेवर निघालेले प्रतिबंधक उपाय याच गोष्टीस प्रोत्साहन देतात व जगण्यांत सुख नाहीं असें कंठरवानें सांगतात.

निढळाच्या श्रमानें अन्न मिळवा व कष्टाची परिणती करून संतति वाढीस लावा असेंच आपलें पवित्र धर्मशास्त्र सांगत नाहीं काय ?

' आम्ही काय केलें पाहिजे ' असा ज्यावेळीं प्रश्न येतो त्या वेळीं त्याच्या अंतर्यामी आम्हांस काहींही करावयाचे नाहीं असाच ध्वनी उमटत असतो. कोणीही विचारी माणूस असा प्रश्नच करणार नाहीं. कारण एक तर आपल्या कृतीनें हें सर्व मायाजाळ आपल्या भोंवतीं आपण निर्माण केलें आहे हें त्याला माहीत असतें व दुसरें असें कीं निरोगी व सुबुद्ध मनुष्यानें अन्न ग्रहण केलें कीं, त्याला व त्याच्या कर्मेन्द्रियांना काम करण्याची अवश्यकता भासूं लागते. ज्याला श्रम करण्यांत लाज वाटते त्यांच्याच पुढें हा प्रश्न उभा आहे.

माझ्या सुखाकरितां मी खातों पितो व आराम करण्याकरितां झोंप घेतों, या कल्पनेच्या मुळाशीं असलेलें राक्षसी तत्त्व नाहींसे झाल्याशिवाय, ही सुधारणा घडणें शक्य नाहीं. मनुष्य हा यंत्राप्रमाणें आहे व ज्यामानानें तो अन्न सामुग्री घेतो त्या मानानें त्याचें श्रम झालें पाहिजेत, **ऐदखाऊपणा म्हणजे शरमेची गोष्ट आहे.** हेंच पटलें पाहिजे. हीच अत्यंत जरूरीची पहिली गोष्ट आहे. ऐदखाऊ-पणा हा भयंकर रोग आहे. ही जाणीव जर उत्पन्न झाली तर प्रत्येकाला आपल्या हाताशीं फार काम आहे असें आढळून येईल. व तें करण्यास त्याच्या मनास व शरिरास आनंद वाटेल.

मला स्वतःला याबद्दल असें वाटतें कीं, आपण आपल्या दिनक्रमाचे चार भाग करूं. ( १ ) सकाळीं १० वाजेपर्यंतचा वेळ. ( २ ) दोनप्रहरचा २ वाजेपर्यंतचा वेळ. ( ३ ) दोन ते पांच तिसरा प्रहर. (४) सायंकाळ व नंतरचा वेळ याचप्रमाणें मनुष्याच्या श्रमाचेही चार भाग पाडतां येतील. ( १ )अंग मेहनतीचीं कामें ज्यांत स्नायूंना वगैरे अधिक जबर श्रम पडतात असे. ( २ ) कलांचीं कामें, ज्यांत बोटें वगैरेना ताण पडतो तीं. ( ३ ) मानसीक व बौद्धिक श्रम. [ ४ ] समाजकार्य.

मनुष्याचीं उत्पादन शक्तिही चार प्रकारची आहे. अधिक श्रमाची कामेंकरून धान्यधून्य निर्माण करणें व इमारती, विहीरी पाटस्थळें वगैरे बांधणें. [२] कापड चोपड, कातडीं, लोकर वगैरे निर्माण करणें. [३] कला व शास्त्रें यांच्या सहाय्यानें सोई निर्माण करणें. [४] समाजाच्या स्वास्थ्यास जरूर त्या गोष्टी घडवून आणणें. या प्रमाणें चार प्रकारच्या वेळांत वरील चार प्रकारचें उद्योग मनुष्य करीत राहील तर त्यापासून

त्यांस लाभ होऊन करमणूकही होईल. असें केलें तरच समाजांत वावरत असलेला **असंतोष व विषमता नाहींशी होईल.**

बौद्धिक श्रमाची वाटणी माझी आहे. अन्यशारीरिक श्रम इतरांनीं माझे करितां करावे व असे श्रमविभाग केले तर फार सोईचें होईल असें मला वाटत होतें, पण माझ्या बौद्धिक श्रमाच्याच दृष्टीनें तें गैरसोईचे आहे असें ठरलें. आयुष्यांतील बाकीचा सर्व काळ मी या माझ्या बौद्धिक उद्योगानुरूप आखला व मी याशिवाय दुसरें कांहींही केलें नाहीं. त्यामुळें माझ्या दृष्टी संकुचित झाल्या, माझें ज्ञान व माहिती अपुरी वाटूं लागली व आयुष्यांची कल्पना बरोबर ठरेना. उद्योगांस आरंभ केला कीं, अंतर्यामांतील उत्साह नाहींसा होई. मनांस हुरहुर व कंटाळा वाटे. माझ्या हातून खाणें पिणें व आळसांत दिवस काढणें याखेरीज कांहींच होईना. हें पाप, माझ्या हातून नित्य घडूं लागलें. पण ज्यावेळीं मला शारीरिक श्रमाची खरी जाणीव झाली, मी शेतकऱ्यांतून वावरूं लागलों त्यावेळीं मला माझ्या आयुष्याची खरी कल्पना आली. जीवनांत राम वाटूं लागला व जीवनाची आस्था वाढूं लागली. लिहीण्याचा व्यवसाय मला करण्याची स्फूर्ती होऊं लागली व यांतच माझ्या धंद्याचें वैशिष्ट्य मला पटु लागलें. अशा तऱ्हेनें **बौद्धिक धंद्याची सांगड शारीरिक श्रमाशी घालणें हिताचे आहे,** हें मला अनुभवास आलें व त्याप्रमाणें सहाजीकच माझी राहणी बदलली. मला त्यांत खरें सुख व समाधान वाटूं लागलें ज्यांस शारीरिक श्रमाची खरी कल्पना आहे तो याच मार्गाचा अवलंब करील, व त्यांत त्यांस सुख (शारीरिक व मानसिक) मिळेल वरील प्रमाणें श्रमविभागणी केल्यास त्यास कंटाळा वाटणार नाहीं व

शरीराच्या सर्व गरजा पुरवल्या जातील भ्रामक कल्पनेला बळी पडून विशिष्ट प्रकारचाच उद्योग करण्यांत व दुसऱ्याचे श्रमाचा मोबदला घेऊन एकच धंद्यात सर्व आयुष्य घालविणें, 'श्रमविभाग' नांवाखालीं दुसऱ्यांस लुबाडणें, या गोष्टी हल्लीं चालवल्या जातात. पण विचारी मनुष्य त्यांस फसणार नाहीं, ज्यानें त्यानें आपआपलें जरूर तें शरीरकष्ट केलेंच पाहिजेत. विशिष्ट बौद्धिक उद्योग हें समाजाचें व आपल्यास दिलेल्या सामर्थ्याचें ऋण आहे, तें आपण फेडणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

आयुष्याचें सार व आनंद ही शारीरिक श्रमांतच साठविलेली आहेत असें ज्याना पटेल ते लोक शेतांतून कामें करतील, हस्तकौशल्याचीं कामें करण्यांत आनंद मानतील, बौद्धिक व सामाजिक कार्य करण्यांत त्यांना उत्साह वाटेल. वरील निरनिराळी कामें सोडून जर आपल्या विशिष्ट प्रकारच्या बौद्धिक जीवनाचाच कोणाला अत्यादर असेल तर त्यानें लोकांची मागणी त्याबद्दल कितपत आहे याचा विचार करावा व आपल्या सर्व सुखाचा त्याग करून आपलें बौद्धिक ज्ञान जनतेच्या चरणीं अर्पण करावें, तरच ही गोष्ट समाजास कल्याणप्रद होईल.

मानव व त्याचें अंतीम कल्याण हीच आपणास पहावयाची आहेत. **हें कल्याण जीवनांत आहे व हें जीवन त्यांच्या उद्योगांत आहे.** कांहीं मर्यादित लोकांचेंच हिताहित आपणांस पहावयाचें नाहीं. सर्वांचें हित सारखें पहावयाचे आहे. एकाचा फायदा गैरवाजवी रीतीनें दुसऱ्यांस देणेंचा नाहीं. मला जसें माझें कल्याण व्हावें व सुख मिळावें असें वाटतें तसेंच दुसऱ्याचेंही आहे. माझ्या शारीरिक

बौद्धिक व आत्मिक कल्याणाची त्याचप्रमाणें माझ्या आवडी निवडीची काळजी जशी मी वहातों तशींच ती दुसऱ्याबद्दलही पाहिजे.

हें शक्य आहे. माझ्या गरजा मी भागविल्या पाहिजेत.

माझा प्रश्नः- ' आम्हीं काय केले पाहिजे ? ' ' आमचे कर्तव्य काय ? ' हा आहे व त्याचा निर्णय वरील विवेनांवरुन झाला आहे.

(१) प्रथम स्वतःचीं फसवणूक सोडून दिली पाहिजे. मार्ग चुकून कितीही दूर गेलों असलों तरी सत्य सोडतां कामानये. ( २ ) स्वतःच्या विशिष्ट हक्कांच्या कल्पना झुगारून देऊन आपण सामान्य मनुष्य आहोंत व आपल्या हातून प्रमाद होणें शक्य आहे ही भावना जागृत ठेविली पाहिजे.

( ३ ) जगाचे त्रिकालाबाधित तत्व जें स्वावलंबन, तें पाळलें पाहिजे व स्वतःचें व दुसऱ्याचें जीवित सुरक्षित राखण्यासाठीं श्रमाच्या जोरावर निसर्गाबरोबर झगडत राहिलें पाहिजे.

**सामाजिक व आर्थिक विषमता नाहींशी करण्यांस रामबाण उपाय** म्हणजे **स्वावलंबन**, स्वतःचे श्रम स्वतः करणें **हा आहे**. काल झपाट्यानें बदलत आहे. भ्रामक कल्पनांची स्पष्टता होऊन त्या विराम पावूं लागल्या आहेत. अशावेळीं आपणांस हितकारक व परिणामीं इष्ट अशाच गोष्टींची जाणिव जनतेस करून देणें जरूर आहे. हें काम समाजांतील वजनदार लोकांनीं हातीं घेतल्यांस व विशेषतः स्त्रियांनीं हातभार लावल्यांस सुलभ होणार आहे; या योगानें समाजाची विस्कळीत झालेली घडी सुधारेल व **समाजांतील असंतोष नाहींसा होऊन त्यास कायमचें स्वास्थ्य मिळेल.**

# स्त्रियांचे कर्तव्य.

निसर्गानें पुरुषांस श्रमाची व स्त्रियांस अपत्य संगोपनाची जबाबदारी दिलेली आहे. ही जबाबदारी पार न पाडल्यांस समाजास वाईट अनुभव येतात. पुरुषांपेक्षां, स्त्रियांच्या गैर वर्तणुकीचें दुष्परिणाम अधिक उशीरा अनुभवास येतात येवढाच फरक. पुरुष काय अगर स्त्री काय, कर्तव्यच्युत झाल्यास समाजाच्या ऱ्हासास कारण होणार.

फार पूर्वीपासून, दुसऱ्यांवर सत्ता गाजवूं पहाणाऱ्या वर्गास श्रमाची खरी किंमत कळेनाशी झाली. निसर्गाचे नियम तो मोडूं लागला. आजच्या युगांत मनुष्य यंत्राधीन झाला, व तो आपले वैशिष्ट्य पार विसरून गेला आहे.

स्त्रियांच्या बाबतींत ही कर्तव्यच्युति फारशी प्रगमनशील नव्हती, क्वचित प्रसंगीं गर्भपात व वेश्यांचा धंदा एवढीच मजल आजपर्यन्त त्यांनीं गांठलेली होती व विचार करणारांस प्रत्यक्ष नाश अद्याप डोळ्यापुढें दिसत नव्हता. संपन्न समाजांत पुरुष जरी श्रमाच्या खऱ्या किंमतीस मुकलेले होते तरी स्त्री मात्र कर्तव्यच्युत झालेली नव्हती व म्हणूनच त्यांचेबद्दल आदर वाटत होता.

पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून सर्व कलांत स्त्री ही त्यांच्या बरोबरीनें काम करूं लागली व सर्व सुधारणा तिनें आपल्याशा करून घेतल्या. पुष्कळ वेळां असें म्हणण्यांत येतें कीं, तिनें पुरुष हा आपले वर्चस्वाधीन केला, परंतु वस्तुस्थिती निराळी आहे. मुलांचें संगोपन

करून मातृदेवता या नांवास सार्थ झालेल्या स्त्रियांच आपल्या योग्य व शुद्ध आचरणानें पुरुषांस अभिमानानें आपल्या म्हणविण्यांस लावतात व त्यांचेंच खरें वजन समाजांत असतें व तें चिरकाल टिकतें. पुरुषी बनून अपत्य प्रेमास पारख्या होऊपाहणाऱ्या स्त्रियां या समाज कंटक होत, त्या नियमभंग करणाऱ्या पुरुषाप्रमाणेंच, त्याज्य संसारसुखास मुकलेल्या व अधोगतीस लागलेल्या होत. याच जाणिवेच्या अभावीं स्त्रियांच्या हक्कांची ओरड आज नाहक करण्यांत येत आहे.

स्त्रियांचे हक्क स्वातंत्र्य म्हणजे काय ? तर पुरुषांप्रमाणेंच दुसऱ्याच्या श्रमावर चैन करणें; बौद्धिक श्रेष्ठत्वाच्या मिषानें ज्याप्रमाणें पुरुष शास्त्र, कला, सरकार दरबार वगैरेच्या सबबीवर खालच्या वर्गावर अधिकार गाजवतो व त्याच्या श्रमावर जगतो, त्याचप्रमाणें स्त्रियांसही दुसऱ्याच्या श्रमावर आपला स्वार्थ साधून आपल्या विषय-वासना यथेच्छ तृप्त करतां आल्या पाहिजेत. हेच त्यांच्या हक्काच्या मुळाशीं असलेलें कारण आहे. कर्तव्यास पारखे झालेल्या पुरुषांनाच या हक्कांचें स्तोम माजवावेसें वाटतें व त्यांच्यांतच या चळवळीं उगम पावतात. अपत्य प्रेमाची जाणीव झालेल्या व असलेल्या स्त्रियांना आपण पुरुषांबरोबर अंग मेहनतीचीं कामें करावींत, खाणींतून व शेतांतून त्यांच्याबरोबर श्रमविभागी व्हावें असें मुळींच वाटणार नाहीं. जे कष्ट, व जी जाणीव निसर्गानें त्यांना दिलेली आहे, त्यांतच त्यांचें खरें हित आहे. आपल्या जीविताचीही पर्वा नबाळगतां, आमच्या स्त्रियांनीं कर्तव्य म्हणुन जे कष्ट व जी श्रम सोसण्याची तयारी आज-पर्यंत दाखविली आहे ती स्पृहणीय आहे. त्यांतच त्यांच्या मनाची बळकटी दिसून येते .

आज सभोंवतालीं दृष्टी टाकली तर काय दिसून येते? आपल्या कर्तव्यास स्त्रिया पारख्या होऊं पहात आहेत व दिवसेंदिवस हा दुर्गुण समाजांत पसरत आहे. त्याना स्वाभाविक असलेली मातृपदाची भूमिका नकोशीं झालेलीं आहे, चटोरपणा, नटणें मुरडणें व पुरुषी कल्पनांची आवड यांतच त्या भूषण समजूं लागल्या आहेत, व हें साध्य साधणेस त्यांना अर्थातच संततीची आडकाठी होऊं लागली.

ही आपत्ती टाळण्या करितां शास्त्राची मदत घेऊन संततीप्रतिबंधक उपाय योजना होऊं लागली व त्याचीं उपकरणें व साधनें नित्याचीं होऊन बसली. वरच्या समाजांत, सांसर्गिक रोगा-प्रमाणें याची वाढ फार झपाट्यानें होत आहे; व ही वाढ अशीच अप्रतिबद्ध राहिल्यास सर्व समाजास ग्रासून टाकेल. पुरुषांप्रमाणेंच सांसारिक बाबतींतील उत्साह व संसारोन्मुखता नाहींशीं होईल; ही स्थिती वेळींच आवरणें जरूर आहे. पुरुषांच्या मानानें स्त्रियांच्या बाबतींत नियम मोडणारांचें प्रमाण अद्यापि कमी आहे व ही समाधानाची गोष्ट होय, म्हणूनच अद्यापि प्रयत्नांस वाव व आशा आहे.

मातृपदाची जाणीव असणाऱ्या स्त्रियां, आपल्या मुलांबाळांना पुरुषांना व मैत्रिणींना, ह्या पवित्र कर्तव्याची जाणीव करून देतील तरच तरणोपाय आहे! संपन्न वर्गांतील मातांच ही गोष्ट करूं शकतील व त्यावरच समाजांतील दोष नाहींसे होणें बऱ्याच अंशी अवलंबून आहे.

मातृपदाचा लाभ झालेल्या उच्च वर्णीय स्त्रियांनो! तुम्हींच आतां काय तें करूं शकाल? तुमच्या कडेच सर्व समाज उत्कंठेनें पहात आहे. पोशाखांत व नटण्यामुरडण्यांत दंग झालेल्या, व पुरुषांचें

चित्त आकर्षून कसे घेतां येईल येवढेंच पाहणाऱ्या स्त्रियांच्या हातून हे होणें नाहीं. स्वार्थत्याग करून, आपल्या विषयोपभोगाच्या अत्यंत दुर्दमनीय आकांक्षा ताब्यांत ठेऊन केवळ कर्तव्य म्हणून ज्या स्त्रियांनीं मातृपद स्वीकारलें, त्या खरोखर धन्य होत. निसर्गसिद्ध स्त्रियांचे कर्तव्य त्यांनींच बजावलें व त्याच अधःपतनाच्या मार्गावर असलेल्या समाजास सांवरतील. त्यांचेच मनोधैर्य व स्वार्थत्याग, विस्कटलेली समाजाची घडी सुधारतील व त्यांस सुख संपन्न करतील. मातांनो, तुम्हींच आम्हाला सत्याचा मार्ग दाखवून मनुष्यत्व आमचे अंगी आणाल. तुम्हीच त्या दयावन परमेश्वराची आज्ञा अक्षरशः पाळत अहां. परमेश्वराची आज्ञा पाळण्यांत किती आनंद, समाधान व अंतीम कल्याण आहे, हे तुम्हींच एक जाणतां. दांपत्यसुखाचा विकास अपत्य प्रेमांत विकसित झालेला तुह्मासच अनुभवावयास मिळतो. इतरांप्रमाणें तुमचें दांपत्य सुख छचोर व मर्यादित नाहीं. विजेच्या चकचकाटा प्रमाणें आपल्या उंची पोशाखानें डोळे दिपवून सोडणाऱ्या स्त्रियांपेक्षां खरें समाधान व खरें सुख तुम्हींच अनुभवित अहां.

गरोदरपणांत व बाळंतपणांत होणाऱ्या यातनानींच तुमची स्वार्थत्यागाची कसोटी लागत नाहीं ह्मणून या यातना भोगून तुह्मी परमेश्वरी उद्दीष्ट साधण्याकरितांच याहूनही मोठी जबाबदारी आपलें अंगावर घेतां. व ती ह्मणजे अपत्य संगोपनाची. रात्रीचे दिवस करून मनुष्यांस अत्यंत जरूर व हितावह, क्षणभर विसांवा देणारी झोंप, तिलाही प्रसंगी अंतरून तुम्हीं हें आपलें कर्तव्य पार पाडतां. या कष्टाबद्दल तुह्मांस काय मिळणार ! लोकांची सहानुभूती तर नाहींच, पण प्रसंगीं ज्याच्या कल्याणाकरितां तुम्हीं ही दगदग सोसलींत,

तुम्हीं आपल्या जिवाचें रान केलेंत व आपल्या सुखसोयींना तिलांजली दिलीत त्या अपत्याकडून मानहानी, दुखः व प्रसंग विशेषीं तुमचाच त्याग, हीच तुम्हांस देऊन ते तुमचे उतराई होणार ? हा अनुपमेय स्वार्थत्याग कशाकरितां ! एकाच गोष्टीकरितां व एकच उद्दीष्ट साध्य करण्याकरितां. तें उद्दिष्ट म्हणजे परमेश्वरी इच्छा पार पाडणें व आपलें कर्तव्य बजावणें. त्यातच जो अत्यंत उच्च कोटींतील आनंद अनुभवास येतो व जो सर्व विषयानंदापेक्षां श्रेष्ट व चिरकालीन असतो तोच लुटण्याकरितां. हा आनंद बाजारी प्रेम पैशाकरितां विकणाऱ्या स्त्रियांना कोठून मिळणार ! तो आनंद व तें समाधान इतकें स्वस्त खास नाहीं. सदसद्विवेक बुद्धीची अंतर्यामांतील कर्तव्याबद्दल जाणीव व ती सफल झाल्याबद्दलचा स्वर्गीय आनंद ही अत्यंत दुर्मिळ आहेत. त्याकरितां इतका स्वार्थत्याग करणें जरूरच आहे. दुसऱ्याच्या श्रमावर आपण चैन मारतों आहोंत व यांत आपला पुरुषार्थ नसोन ही शरमेची गोष्ट आहे याची जाणीवही आम्हांस नाहीं.

स्त्रियांत अद्यापी ही अवस्था आलेली नाहीं. त्यांच्यांत अद्याप मनुष्यत्वाचा अवशेष आहे. कांहीं स्त्रिया ज्यांनीं आपले विषयविकार अखेरच्या पायरीस नेलेले आहेत व आपले विषयीं जीवित म्हणजेच सारसर्वस्व असें मानलें आहे त्या अधम कोटींतील स्त्रियां सोडून दिल्या तर, बाकीच्यामध्यें आपल्या कर्तव्याची व ईश्वरी इच्छेस मान देण्याची तयारी अद्यापी दिसून येते. स्त्री वर्तनानें कशीही असो, जो पर्यंत तिला अपत्य-संगोपनाची आवड आहे तोपर्यन्त तिच्यांत मनुष्यत्व आहे, असें मानण्यास जागा आहे. परंतु विषयवासना अत्यंत प्रबळ व ती तृप्त करण्यांतच ज्यांचें आयुष्य जातें व त्याबरो-

बरच संततीप्रतिबंधक योजना, आपल्या विषयसुखाच्या आड संतती येऊं नये म्हणून ज्या करतात त्या केवळ राक्षसी वृत्तीच्या नीच स्त्रियां होत. त्यांचें अस्तित्व हेंच स्वाथ्याच्या नाशाची पायरी होय. खऱ्या मातेस, आपल्या अपत्याची जबाबदारी दुसऱ्यांवर टाकवणार नाहीं तसें करण्यांत वृत्तीची हीनता आहे. असेंच त्यांना वाटेल.

स्त्रियां, ज्यांना प्रसूत होण्याची आवड नाहीं, ज्यांना तें नको आहे, त्या कितीहि थोर असोत, विद्वान व संपन्न असोत; त्यांना खऱ्या स्वार्थत्यागाची कल्पनाच आपल्या बरोबरीच्या मंडळींना व मुलांना आणून देतां येणार नाहीं. आपल्या परिस्थितीच्या व बुद्धी-च्या जोरावर त्या त्यांना उच्च शिक्षण देतील, कलांमध्यें व व्यवहारांत त्यांना प्राविण्य देऊं शकतील पण **आयुष्याचें खरें ध्येय काय? मनुष्यास जन्म देण्यांत ईश्वरी संकेत काय आहे व खरें सुख** कशांत आहे या गोष्टी त्यांच्या मनावर त्यांना खास बिंबवता येणार नाहींत.त्या आपल्या स्वतःच्या आचरणानें परोपजीवित्व, मानमरातब व पैसा यानांच आयुष्यांत प्राधान्य देण्यास शिकवतील.

खऱ्या स्वार्थत्यागाची, प्रसंगीं जीवही धोक्यांत घालून ईश्वरानें नेमून दिलेल्या कर्तव्याची पूर्तता कशी करावी हें त्यांना खास शिक-वतां येणार नाहीं, त्यांच्या स्वतःच्या आचरणाशिवाय त्या गोष्टीं दुस-ऱ्यांस पटणारही नाहींत. ही गोष्ट, खरी माता, जिनें स्वानुभवानें ईश्वरी प्रेरणा जाणली आहे, तीच करूं शकेल व आपल्या मुलांना व आप्तेष्टांना त्यांचे धडे देईल. तिला आपल्या मुलांना चैनींत वाढलेले, ऐदी बनलेले पाहवणार नाहीं. खरे श्रम ह्मणजे काय व त्यांचें महत्त्व किती आहे, दुसऱ्यास लुबाडून, त्यांच्या श्रमावर जगण्यांत काय

समाधान आहे, यांची यथार्थ कल्पना ती आपल्या मुलांना पटवून देईल व त्यांना श्रम करण्यास उद्युक्त करील !

नित्याच्या वेळांपैकीं आपल्या भावी पिढीच्या कल्याणाकरितां, त्याचें संगोपन करण्याकरितां, आपण आपला कितीसा वेळ खर्च करतां ? त्यांना काय खावयास मिळतें, त्यांची जोपासना कशी होते, त्यांच्या मनावर संस्कार कशा प्रकारचे होतात व त्यांची नैतिक वाढ कशी चाललेली आहे याचा विचार आपण कितीसा करतां ? आपलें जीवनसर्वस्व – राष्ट्राचें भवितव्य – भावी पिढी, आपण दुसऱ्याच्या, प्रसंग विशेषीं भणंग भिकाऱ्याच्या स्वाधीन करून त्यांच्यावर त्यांच्या जोपासनेची जबाबदारी टाकतां व आपला वेळ दुसऱ्या कामांत घालवून त्यांच्याच कल्याणाची बढाई मारतां ! शाबास तुमची ! परमेश्वरानें तुमच्या अंगावर जी भावी पिढी तयार करण्याची जबाबदारी टाकिली आहे ती तुम्ही अशाच तऱ्हेनें पार पाडणार काय? अशा तऱ्हेनें त्यांची हेळसांड करून, केलेल्या पापाची फेड तुम्ही कशी करणार ? याचा विचार तरी तुमच्या मनांस कधीं शिवला आहे काय ?

त्यांच्या करितांच आपण इतर पुरुषी उद्योग करीत आहोंत असे तुम्ही म्हणतां पण ते तुम्हांस कितपत शोभेल. ही अपत्य संगोपनाची जबाबदारी नको - हे श्रम नकोत म्हणुनच तुम्ही वाममार्गास उद्युक्त होना. **तुम्हांला वाईट मार्गाची चट लागली म्हणूनच तुम्हांस त्या गोष्टी आवडूं लागल्या.** मग अपत्य कल्याणाच्या गोष्टी कशाला. ?

खरी माता या कल्पनेला बळी पडणार नाहीं. परमेश्वरानें

नेमून दिलेलें काम **भावी पिढीची जोपासना** ती सत्याला स्मरून करीत राहील. त्यांना जन्म देईल, त्यांचें संगोपन करील, स्वतः त्यांच्या खाण्यापिण्याची, कपडेलत्त्याची, शिक्षणाची वगैरे सर्व जबाबदारी ती आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर पार पाडील. जीविताची सुरक्षितता ही श्रमांत आहे, याची जाणीव तिला असल्यानें, आपल्या नवऱ्याच्या पैशावर अगर बाहेरील मदतीवर अवलंबून न राहतां आपल्या मुलांना स्वार्थत्याग, निरपेक्ष स्वार्थत्याग करण्याला व करविण्याला लावील व प्रसंगी आपल्या आयुष्याचें मोल देऊनही ईश्वराज्ञा कशी पार पाडावी याची योग्य शिकवण त्यानां देईल. दुसऱ्यांच्या मतांचा किंवा त्यांच्या प्रोत्साहनाचा विचार ती मुळीं करणार नाहीं. आपल्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून निर्भय वृत्तिनें व शांत अंतःकरणानें ती आपलें कर्तव्य पार पाडील. मनुष्य जातीची परिणती हीच माता होय.

**माता ही जगाला आदर्श म्हणून परमेश्वरानें निर्माण केली आहे.**

अशा मातेला शांत अंतःकरणानें मरण समयीं, 'परमेश्वरा मी तुझी आज्ञा अक्षरशः पाळली आहे. व माझें कर्तव्य बजावलें आहे. माझ्या आत्म्यास चिरकाल शांती दे' असें म्हणून सुखानें प्राण सोडतां येईल. यातच मनुष्य मात्राचें उद्दिष्ट ध्येय साठविलेलें आहे.

मातांनो, तुम्हीच समाजास अधोगतीपासून पराङमुख कराल. तुमच्याच हातीं भावी पिढीच्या अंतीम कल्याणाचें सुकाणूं आहे. तुमच्याशिवाय आम्हांस दुसरा तरणोपाय नाहीं.!

—समाप्त—

# दि हिंद बेनिफिट सोसायटी.

## लि० पुणें नं. २

( रजिष्टर्ड प्राव्हिडंट विमा कं. )

मुख्यतः गरीब लोकांसाठी

मासिक हप्ता ८ आणे पासून २ रु. पर्यंत

आमची प्रपंच पॉलिसी पहा.

गांवोगांवी स्त्री-पुरुष एजंट पाहिजेत.

विशेष माहिती साठी भेटा अगर लिहा.

आर. भट,

स्पेशल एजंटस् अन्ड ऑर्गनायझर.

शहापूर ( बेळगांव )


REFBK-0005424

# उपयोग तोच,—

# —पण पैशाची बचत.

कल्चर्ड मोती, इमिटेशन खडे —

**व त्यांचे दागिने** इ. निरनिराळ्या

जातातीचा माल आमचेंकडे माफक दरांत मिळेल

रंग बिघडलेले जुनें मोती साफ व पॉलिश अल्प दरांत नव्या-प्रमाणें करून देऊ.

चतुरभाई पीतांबर शहा. गणपती पेठ, सांगली.

---

सर्व रोगांचे मूळकारण ह्मणजे दांत किडणें व स्वच्छ नसणें !

# दन्त-धावन टूथपावडर्स

काळी, पांढरी, गुलाबी.

टूथपावडर वापरल्यानें दांत व हिरड्या बळकट होतात. तोंडाची दुर्गंधी नाहींशीं होऊन दांत मोत्यासारखे स्वच्छ होतात.

तयार करणारः— दन्त धावन डेपो, पुणें नं. २.

सांगली एजंट कवठेकर आणि कंपनी हायस्कूल रोड, सांगली.

लिमये मोती भांडार. सांगली.

# खऱ्या मोत्यांचे व्यापारी.

सर्व जातीचे खरे मोती, बागायती व जिरायती

( कल्चर्ड व वाईल ) व मोत्यांचे दागिनें

यांचा भरपूर संग्रह आमचेकडे

आहे. समक्ष चौकशी करा.

किंमती फारच माफक आहेत.

पत्ताः— लिमये मोती भांडार.

मारवाड पेठ सांगली.

कमालीची मळणी केलेला उत्कृष्ट असा

# इंजिनचे घाणीनें मळलेला

# -चुना.-

— किती उत्तम आहे तो पाहून घ्या.—

उत्तम तांबडा खडा, पुलाचें कामास वापरलेल्या नमुन्याचा येथें भाजून इंजिनवर चालणारें घाणीनें, बैलाचें घाणाचे मळणीपेक्षां दुप्पट तिप्पट जास्ती मळणी केलेला, चुना घरपोंच करूं व आर्डरप्रमाणें पाहिजे त्या नमुन्याचा चुना तयार करून देऊं.

दर माफक, विशेष माहिती समक्ष मिळेल.

दत्तात्रय विनायक खाडिलकर.
श्री गणपती मळा सांगली

मागणी कोठें करावी :—

१ श्री गणपती मळा. २ पां. कृ. दांडेकर,
लोखंडी दुकान, सांगली.